मूल्य १ रुपया
(वार्षिक वर्गणी ६ रु.)


Reg. No. B. 3434
Licence No. 53.
Licenced to Post
without prepayment

# अर्थ

नोव्हेंबर १९६६

दिवाळी विशेषांक

प्रगतीचे ३२ वे वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे
सौख्याचे संचित
इथे हो सर्वांचे स्वागत!

तुमची जिल्हाळ्याची बँक

आपल्या ११० शाखांनिशी तुमच्या सेवेस सिद्ध

बँक ऑफ महाराष्ट्र लि.

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं !

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये है।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है : १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : [illegible]

## दिवाळी शुभेच्छा

परकीय चलन मिळविण्याकरता साखरेच्या निर्यातीची राष्ट्राची गरज भागविण्याच्या दृष्टीने एकरी जास्तीत जास्त साखरेचे उत्पादन काढणारा आणि परकीय चलनाची बचत करण्याकरता देशांतील ज्वारी, बाजरी, गहू आदी भुसार पिकांत एकरी जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचा उच्चांक गाठण्यांत आघाडीवर असलेला आमचा ● ऊस उत्पादक सभासद तसेच देशातील औद्योगिक विकासांत परिश्रमांची पराकाष्ठा करणारा आमचा ★ कारखान्यांतील कामगार आणि संस्थेची प्रतिष्ठा सांभाळणारा आमचा ● सेवक वर्ग या सर्वांच्या वतीनें आमच्या शुभेच्छा—

श्री. पंढरीनाथ हणमंत गिरमे चेअरमन

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि.

तारेचा पत्ता : 'माळी शुगर' माळीनगर ★ टेलिफोन : २१ ★ स्थापना १९३२ ★ रजिस्टर्ड ऑफिस : माळीनगर, सोलापूर

शेतकऱ्यांनी चालविलेला नि शेतकऱ्यांच्या मालकीचा सहकारी तत्त्वावरील भारतांतील पहिला कारखाना

संचालक मंडळ

१. श्री. कृष्णकांत लक्ष्मण गिरमे, व्हा. चेअरमन, २. श्री. हरीभाऊ बळवंत गिरमे, ३. श्री. म. गे. गिरमे. ४. श्री. शं. मा. गिरमे, ५. श्री. शं. मा. राऊत, ६. श्री. रा. ब. ना. सो. बोरावके, ७. श्री. ज. ग. रासकर, ८. श्री. चं. शं. कुवळे, B.Sc (Agri.),
ऑफिस मॅनेजर : श्री. के. एन्. पाटील, बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम., एल्एल्. बी,



# इचलकरंजी जनता सहकारी बँक लिमिटेड

स्थापना : ७ फेब्रुवारी १९६३ ] इचलकरंजी [ फोन नंबर २१३

जनतेचे प्रेम ] ह्याचे प्रतीक [ जनतेचा विश्वास

केवळ ३½ वर्षाचे अवधीत नेत्रदीपक प्रगती

| | | |
|---|---|---|
| खपलेले शेअर भांडवल | रु. | ३,१५,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर फंडस् | रु. | १,४०,००० |
| ठेवी | रु. | १२,५०,००० वर |
| खेळते भांडवल | रु. | २२ लाखांवर |
| ता. ३०-६-६६ अखेर निव्वळ नफा | रु. | ५१,२२२·७१ |

घरोघरी बचत पेट्या ठेवून बँकेने बचतीसाठी नवीन दालन उघडले.
ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर. सभासदांना विविध कारणांसाठी पतपुरवठा.
बँकिंगचे सर्व व्यवहार माफक दरात केले जातात.

अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा.

आर. पी. कुलकर्णी, मॅनेजर. के. बी. आवाडे, चेअरमन.

भारतात प्रथम श्रेणीत व महाराष्ट्रात अग्रेसर असलेला

★ अद्ययावत व सुसज्ज साखर कारखाना ★

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.

## राष्ट्राच्या औद्योगिक उत्पादनात भर घालीत आहे.

(१) १९६५–६६ च्या हंगामात ४,३२, ३२० क्विंटल पोती साखर उत्पादन करून महाराष्ट्रातील साखर कारखान्यात प्रथम क्रमांक.

(२) अद्ययावत डिस्टिलरीतून प्रथम श्रेणीच्या रेक्टीफाईड व डिनेचर्ड स्पिरिटचे मोठ्या प्रमाणात उत्पादन

(३) ॲबसोल्युट अल्कोहोलचे महाराष्ट्रातील एकमेव निर्मिति.

★ या विक्रमानंतर ★

आपल्या केमिकल डिव्हिजनमधील नवीन सुसज्ज कारखान्यातून उत्कृष्ट प्रतीचे

(१) ॲसेटिक ॲसिड

(२) एन्. ब्युटेनॉल

(३) ब्युटाईल ॲसिटेट

**ही कॅमिकल्स राष्ट्राच्या औद्योगिक सेवेस सादर केली आहेत.**

# गिरणा सहकारी साखर कारखाना

## लिमिटेड, दाभाडी (भाऊसाहेब हिरे नगर)

यंदाची दीपावली आपणा सर्वांस सुखाची व समृद्धीची जावो.

* कारखान्याची शुभ्र व दाणेदार साखर दीपावली निमित्त आपल्या पक्वान्नांना गोडी व शोभा आणील.

* आपली आवड व रुचि टिकविण्यासाठी यंदाही शुभ्र व दाणेदार साखर निर्मितीस सुरुवात करण्यात येणार आहे. आपण ऊसाची लागवड केली असल्यास तो सर्व ऊस व्यक्तिशः अथवा सोसायटीमार्फत आमचे कारखान्याकडे नोंदून सहकारी चळवळीचे प्रगतीस हातभार लावून सहकारी साखर धंद्याचे बाबतीत महाराष्ट्राचे नाव भारतात अग्रेसर टिकण्यास सहाय्य करा.

| जे. सी. पंत | लालजी दौलत पाटील | व्यंकटराव भाऊसाहेब हिरे |
|---|---|---|
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

गिरणा सहकारी साखर कारखाना लि., दाभाडी, ता. मालेगाव, जिल्हा नाशिक

(भाऊसाहेब हिरे नगर)

ही दिवाळी
साठे
बिस्किटस्
कोको व
चॉकोलेटस्
घेऊन अधिक उत्साहानें
व आनंदानें साजरी करा.
साठे बिस्किट अ‍ॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणें-२
heros' SBC-275 MAR

उत्पादन आघाडीचा आधारस्तंभ
शेतकरी!

शेतमालाचें अधिकाधिक उत्पादन
राष्ट्रोन्नतीचा आत्माच !
शांततेचा काळ असो वा आणीबाणीची
युद्धजन्य परिस्थिती असो, अन्नधान्याचें
उत्पादन वाढविणें हा राष्ट्रधर्मच !
उत्पादन आघाडीचा आधारस्तंभ शेतकरी !
त्याला सर्वतोपरि सहाय्य करून देशाच्या
प्रगतिचा पाया रचणें हेंच ह्या अग्रगण्य
सहकारी बँकेचे ध्येय ! !



महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.-मुंबई



—श्री महावीर को-ऑप. बँक लि. कोल्हापूर—
हेड-ऑफीस-कोल्हापूर (फो. नं. १९५)
शाखा-जयसिंगपूर. (फो. नं. ३७६)

तुमच्या गरजेच्या वेळी———
तुमचे असंख्य अज्ञात मित्र
तुम्हाला आपला पैसा देऊन
मदत करतात.
त्यांत आम्ही करतो ती केवळ
सदभावपूर्ण मध्यस्थी.

—प्रगतीचे बोलके आंकडे—

| | |
|---|---|
| ◎ अधिकृत व रोख भरलेले भांडवल. | १,८२,००० चे वर |
| ◎ रिझर्व्ह व इतर फंडस्. | २,३२,००० चे वर |
| ◎ ठेवी | ४७ लाखाचे वर |
| ◎ खेळते भांडवल | ५४ लाखाचे वर |

नवीन शेअर्स विक्री सुरू आहे.
पिग्मी डिपॉझिट योजना चालू आहे.
आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात.
बँकींगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

ए. डी. पाटील — मॅनेजर
द. य. मँच — प्रेसिडेंट



जय जवान जय किसान

- किसानाची अस्मिता,
- किसानाची उत्पादनशीलता,
- संरक्षण आघाडीचे सामर्थ्य ठरते.
- या जागृततेत—उत्पादनशीलतेत
- आम्ही सहभागी आहोत...
- आणि हेंच आमचे
- कर्तव्य आहे...हीच आमची निष्ठा !
- सामर्थ्य आहे चळवळीचे ! ! सहकाराचे...

के. के. पबरत — जनरल मॅनेजर
शंकरराव मोहिते पाटील — M.L.A. — चेअरमन

दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह
बँक लि.
सोलापूर

( स्थापना : १९२१ )

# गरगट्टी अँड सन्स

शहापूर - बेळगांव

**धोबी, फॅमिली व शिंपी**

**पेटंट**
**इस्त्रीचे**
**कारखानदार**

आमचे देशबांधवास
हें वर्ष सुखाचे जावो !

# कुलकर्णी इन्डस्ट्रीज

डायमेकर्स, फोर्जिंग्ज
व
प्रेसवर्क प्रॉडक्शन

रजिस्टर्ड ऑफिस : ६३० सदाशिव पेठ, पुणे २

फोन : ५६४३०

४२ वर्षांच्या अविरत सेवेने
सर्वांच्या विश्वासास पात्र झालेली

# सन्मित्र को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड

२२, तात्या घारपुरे पथ, मुंबई, ४.

★

- सकाळ संध्याकाळ अशा कामाच्या सोईस्कर वेळा
- आत्मोन्नति साधणारी आवर्तक ठेव योजना
- बचत ठेवींवरील व्याजाचा दर ४%
- सर्व प्रकारच्या ठेवींवर व्याजाबरोबरच अधिलाभांश

★

अधिक माहितीसाठी मॅनेजिंग डायरेक्टर यांना भेटा.

कार्याध्यक्ष : शं. ना. कानडे, एम्. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर : द. ना शितूत

शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र रॉय यांनी सर्टिफिकेट दिलेले




– मुख शुद्धी म्हणजेच –

# चमन

चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.
बा. किंमत रु. १-२५

**स्टार कंपनी, बेळगाव.**

स्थापना : १९३५
संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे



# अर्थ

दिवाळी अंक
१६ नोव्हेंबर १९६६

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

## संपादकीय

आर्थिक परिस्थिति सुधारण्यावरच देशाचे स्वास्थ्य आणि समृद्धि ही अवलंबून असतात. अन्नटंचाई, महागाई, ह्यांचे दुष्परिणाम अस्वास्थ्य निर्माण करतात, एवढेच नव्हे तर सामाजिक जीवन उद्ध्वस्त करून आर्थिक व औद्योगिक उत्पादनात व्यत्यय आणतात. त्यामुळे, परिस्थिति अधिकच बिघडते. शांतता निर्माण करण्याच्या प्रयत्नास दूरगामी उपयांची जोड देण्याचे महत्त्व पटूनहि त्या दिशेने प्रयत्न होणे कठीण होऊन बसते. लोकसंख्या वाढीचाच प्रश्न घ्या. ह्या प्रश्नाचे गांभीर्य लक्षांत येऊनहि त्याकडे कानाडोळा करण्यात येत आहे. शेतीच्या उत्पादनांत वाढ होत नाही आणि परदेशांच्या मदतीचा ओघ आटत चाललेला स्पष्ट दिसत आहे. देशाच्या संरक्षणाची समस्या उग्रतर होत आहे. अशा प्रसंगी सामान्य माणसाला देशाच्या दूरगामी प्रगतींत रस वाटला नाही, तर सर्व उपाययोजना त्याच्या नैराश्यामुळे आणि असहकारामुळे फोल ठरतील. अशा प्रसंगी मालक वर्गावर उत्पादन वाढीबरोबर ह्या समस्येकडे जाणतेपणाने पहाण्याची फार मोठी जबाबदारी येऊन पडते. राज्यकर्ते व आर्थिक संस्थांचे चालक ह्या कसोटीस उतरायलाच हवेत. ह्या दृष्टीने प्रस्तुत अंकातील लेख मार्गदर्शक वाटतील.

" अर्था "च्या स्थापनेपासून " अर्थ " आर्यभूषण मुद्रणालयात छापला जात आहे, आणि मुद्रणालयाचे व्यवस्थापक आणि कामगार वर्ग ह्यांचे " अर्था "ला सतत आपुलकीने सहाय्य होत आले आहे. आतापर्यंत " अर्था "चे सुमारे १,४५० अंक प्रसिद्ध झाले, त्यापैकी एकाहि अंकाला एक दिवसहि उशीर झाला नाहीं. कोणतीही वैयक्तिक वा कौटुंबिक आपत्ती असो, मंगळवारी अंक टपालांत गेला नाही असे कधीहि झाले नाहीं. ह्या अखंड सेवेत ह्या वेळीं मात्र खंड पडला, ह्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहो. आर्यभूषण मुद्रणालयांतील प्रदीर्घ संपामुळे आम्ही आमच्या वाचकांची सेवा नित्याप्रमाणे २ नोव्हेंबर, १९६६ रोजीं बजावू शकलो नाहीं.

हा दिवाळी अंकहि आम्ही वेळेवर प्रसिद्ध करू शकू किंवा नाही, ह्याच्या काळजींत आम्हीं होतो. तथापि, साधना प्रेसच्या चालकांनीं अवघ्या चार दिवसांत " अर्था "चे काम अत्यंत आपुलकीने, सौजन्याने, कार्यक्षमतेनें पार पाडलें, ह्यामुळेंच हा अंक आपल्या हातीं पडू शकत आहे. त्याबद्दल त्यांचे मानावेत तेवढे आभार थोडेच आहेत.

" अर्था"वरील आमच्या हितचिंतकांचे प्रेम आणि सक्रिय लोभ हाच आमचा आधार आहे; त्यामुळेच आम्हांस विकट परिस्थितींतहि हें व्रत चालू ठेवणे शक्य होत आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. प्रस्तुत अंकाच्या यशास आमचे प्रतिनिधी श्री. द. रा. कुलकर्णी ह्यांचे परिश्रमही नेहमीप्रमाणें कारणीभूत झालेले आहेत.

— ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांस व वाचकांस सुखाचे जावो. —

# दि ॲग्रिकल्चरल प्रोडयूस मार्केट कमिटी, पुणे

तर्फे

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

या संस्थेतर्फे सध्या गूळ हा शेतीमाल नियमित केला असून त्यामुळे उत्पादकांस त्याचे शेतीमालाची किमान खर्चात त्वरीत विक्री, चोख वजनमाप, त्वरित हिशेब व रक्कम मिळण्याची सोय झालेली आहे व या सोयीच्या आकर्षणामुळे मालाची आवक वाढून व्यापारही वाढला आहे.

आणि आता अधिक आत्मविश्वासाने भावी विकास कार्यक्रम हाती घेत आहोत.

### जादा शेतीमालांचे नियमन

गुळाखेरीज फळे, भाजीपाला, धान्ये, कडबा, जनावरांचा बाजार या बाजारपेठांसही हा कायदा लागू करून उत्पादकांस वरील सोई उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

### मार्केट यार्डची उभारणी

वर नमूद केलेल्या सर्व बाजारपेठा पुणे शहरात सध्या ज्या अस्ताव्यस्त विखुरल्या आहेत, त्याकरिता गुलटेकडीचे आसपासच्या परिसरात १५० एकरांचे भव्य व आधुनिक सुखसोईंनी परिपूर्ण असे मार्केट यार्ड उभारले जात आहे.

जी. के. शिंदे, बी. ए. — सेक्रेटरी
एम्. डी. मगर, बी. एससी. (ॲग्रि.) एम्. एल. ए. — व्हाइस चेअरमन
स. ना. सणस — चेअरमन


---


# दि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धुळे

स्थापना : १३–९–१९५७

मुख्य कचेरी —: गरुड बाग, धुळे (पोस्ट बॉक्स नं ३)

चेअरमन — श्री. पुरुषोत्तम काळू पाटील, बी. कॉम्. एल. एल. बी.

व्हा. चेअरमन — श्री. शिवसिंग हाटेसिंग राजपूत

ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.
बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारते.
बँकेत वाढत्या प्रमाणात ठेवी ठेवून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहाय्य करण्यास आम्हास मदत करा.

ऑडीट वर्ग "अ"

तारीख २६–८–१९६६

| | | |
|---|---|---|
| (१) | अधिकृत भांडवल | ७५ लाख |
| (२) | भरपाई झालेले भाग भांडवल | ७० लाख |
| (३) | ठेवी | २ कोटी, ४४ लाख |
| (४) | कर्जे | ५ कोटी, ३८ लाख |
| (५) | खेळते भांडवल | ६ कोटी, ८५ लाख |

जिल्ह्यात ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३३ शाखा अविरत कार्य करीत आहेत.
नूतन वर्ष आमचे बँकेचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना सुख समृद्धीचे व भरभराटीचे जावो.

एम्. एस्. कुलकर्णी
ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी

# मालक-कामगार संबंधांचा नवा दृष्टिकोन

**लेखक : विजय मर्चंट**

**" फासे उलटे पडले असते तर ? " ह्याची जाणीव ठेवून, उत्पादनवाढीच्या अपेक्षेने नव्हे तर मनुष्यत्वाच्या जाणीवेने कामगारांच्या सुखदुःखांत सहभागी झाल्यास आणि त्यांच्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करून दुःखनिवारणास हातभार लावल्यास फार मोठे हित घडणार आहे. कर्तव्य-पूर्तीचे समाधानहि लाभणार आहे. प्रत्यक्ष अनुभवहि तसा आहे.**

मुंबईमधील कापडाच्या गिरण्यातून कामगार आणि मालक ह्यांचा प्रत्यक्ष संबंध कुठेच येत नाही. गिरणीमालक कामगार संघाशी संबंध ठेवतो; आणि कामगार संघ कामगारांशी बोलणी करतो. आपल्या कामगाराशी प्रत्यक्ष बातचीत करण्याची मालकाला संधीच मिळत नाही. अशा परिस्थितीत, मालक आणि कामगार ह्यांच्यात जिव्हाळा तो काय असणार ? आपण कामगारांना जवळ कसे आणू शकू ? आमच्या हेल्थ ऑफिसरना (त्या हुशार आणि उत्साही आहेत) ह्या प्रश्नाचे उत्तर सापडले. "कामगार हाहि माणूसच आहे; ह्या दृष्टीने त्याला वागवा; उत्पादन वाढ आणि उत्पादनात सुधारणा ह्याचे एक साधन म्हणून नव्हे. त्याच्या अडचणी समजून घ्या आणि त्या सोडविण्याची शिकस्त करा. त्याच्या मोबदल्यात तुमची काही अपेक्षा आहे, अशी त्याला शंकाही येऊ देऊ नका. त्याची प्रतिक्रिया दिसू लागण्यासाठी काही वेळ वाट पहा. त्यांचेवर होणारा सुपरिणाम पाहून तुम्ही आश्चर्यचकित व्हाल !" ही कल्पना मला आवडली पण ती प्रत्यक्षात कितपत उतरविता येईल, ह्याबद्दल माझी खात्री नव्हती. आम्ही त्यावर पुन्हा पुन्हा चर्चा केली आणि खालीलप्रमाणे ती अमलात आणली. गिरणीचे अधिकारी, नोकरवर्ग आणि जॉबर्स ह्यांना सुमारे २५ च्या गटागटाने चहापानास बोलावून आम्ही प्रारंभ केला; हेतू हा की मला प्रत्येकाची वैयक्तिक विचारपूस करता येऊन मला त्यांच्या अडचणी समजाव्या. उत्पादन, त्याचा दर्जा, खराबीचे प्रमाण, इत्यादींचा ह्या सभांशी काहीही संबंध नाही, हे मी प्रथमच स्पष्ट करून सांगितले. प्रत्येकाची व्यक्तिगत माहिती व्हावी आणि त्यांना जरूर ती मदत करता येईल का हे पहावे, ह्यासाठीच केवळ हा संपर्क साधला जात आहे; जॉबर्सनी स्वतःच्या हाता-खालच्या कामगारांना आमचा हा उद्देश समजावून सांगावा आणि त्यांना आम्ही करण्याजोगी काही मदत हवी आहे का ह्याची त्यांनी चौकशी करावी, असे जॉबर्सना समजावून सांगण्यात आले.

आमच्या कचेरीतील काही नोकरांना व जॉबर्सना राहाण्याची जागा मिळवून देण्याचे कामी आम्ही मदत केली. मिल्सनी ५,००० रुपयांचे डिपॉझिट भरावे आणि भाडेकरूने दरमहाचे सुमारे ३५ रुपये भाडे द्यावे, अशी ही योजना. काही कामगारांची तक्रार होती, की त्यांचे घरमालक त्यांना निष्कारण सतावून त्रास देतात; त्यांची बिऱ्हाडे त्यांच्या स्वतःच्या नावावर करून घेण्याचे कामी मिल्सच्या कायदेविषयक खात्याने मदत केली. आणखी काही जणांना तात्पुरती तीन ते सहा महिन्यांपुरती-राहाण्याची जागा आम्ही उपलब्ध करून देऊ शकतो; त्यामुळे त्यांना स्वतःच्या कुटुंबीय मंडळींना मुंबईत आणवून तेवढे तरी एकत्र राहता येणे शक्य होते. राहाण्याच्या जागेच्या अभावामुळे कितीतरी जणांना आज कुटुंबीयांना गावी ठेवून येथे एकटे रहावे लागते. त्यांच्या सोईसाठी आम्ही जागांच्या शोधात आहोत.

गिरणी कामगाराला भरपूर वेतन दिले जाते आणि त्यांच्या कुटुंबातील लोकही कुठल्या तरी गिरणीत काम करून उत्पन्नात बरीच भर घालीत असतात, अशी सर्वसाधारण समजूत आहे. हे खरे असले तरी सुद्धा त्यांना अडचणी येतातच. त्यातली मोठी समस्या म्हणजे कर्जबाजारीपणाची. ते कर्ज काढतात त्यावर त्यांना ३६% ते ७५% व्याज द्यावे लागते. आम्ही चौकशी करून जेथे जेथे अशा भारी व्याजाचा आकार आढळून आला, तेथे आम्ही बिनव्याजी कर्जे दिली आहेत — उद्देश हा की त्यांची सावकाराच्या मगरमिठीतून सुटका व्हावी. अशा रीतीने दिलेल्या कर्जाची रक्कम सुमारे ६०,००० रुपये आहे.

मिल्समध्ये कामगारांच्या दैनंदिन घडामोडींची माहिती देण्या-साठी एक खास मोठा नोटिस बोर्ड ठेवलेला आहे. सर्व आनंददायक घटना त्याचप्रमाणे दुःखकारक हकीकती त्यावर लिहिल्या जातात; व्यवस्थापकांतर्फे संबंधित कामगारांचे अभिनंदन केले जाते, दुखवटा व्यक्त केला जातो. त्या खाली माझी सही असते-साधी, विजयभाई अशी; विजय मर्चंट, मॅनेजिंग एजंट, डायरेक्टर-इन-चार्ज, अशी नव्हे. प्रत्येक कामगाराने आपल्या कौटुंबिक सुखदायक वा दुःख-कारक घटनांची माहिती आम्हांस देत जावी, म्हणजे मला आणि व्यवस्थापनाला त्यांच्या आनंदात किंवा दुःखात सहभागी होता येईल, अशी आम्ही कामगारांना विनंती केली आहे.

कामगारांच्या ज्या मुलांना तांत्रिक शिक्षण घ्यावयाचे असेल त्यांना ते घेण्यास त्या शिक्षणाची सर्व फी देऊन कंपनी प्रोत्साहन देते. अशा शाळांतून प्रवेश मिळण्यास अडचण भासली, तर आम्हीं स्वतः प्रयत्न करून ती मिळविण्यास मदत करतो. त्यांचे शिक्षण पुरे झाल्यानंतर मिल्समध्ये नोकरीचे बाबतीत त्यांना प्राधान्य दिले जाते. जी मुले उच्च तांत्रिक शिक्षण घेण्यास विशेष पात्रता दर्शवितील, त्यांच्या कॉलेज शिक्षणाचा खर्चही आम्हीं देऊ. शिक्षण पुरे झाल्यावर त्यांनी आमच्याकडे विशिष्ट काळ काम केले पाहिजे, असे त्यांच्यावर कोणतेही बंधन आम्ही घालीत नाही; त्यांच्या इच्छेप्रमाणे कुठेही उत्कर्ष साधण्यास त्यांना पूर्णपणे मोकळीक देण्यात येईल.

आमच्याकडील ३,००० कामगार आणि त्यांचे कुटुंबीय, ह्या सर्वांच्या आरोग्याची आम्ही काळजी वहातो. कामगार राज्य विमायोजना किती ' चांगली ' काम करीत आहे हे आपणा सर्वांना माहीत आहेच. त्यांत डॉक्टरांचा फायदा होतो का कामगारांचा, ह्याचीच आम्हांस कधीकधी शंका वाटू लागते. आमच्या मिल्स-मधील स्त्री कामगार आणि पुरुष कामगाराची पत्नी गर्भार राहिल्या-पासून तिचे अपत्य पाच वर्षाचे होईपर्यंत तिची काळजी आमच्या आरोग्य केंद्रातर्फे घेतली जाते. ह्या मुलांना सर्व इंजेक्शने-पोलिओ थ्री-इन-वन आणि इतरही—मोफत दिली जातात.

एका उपयुक्त कामगिरीचे उदाहरण मी येथे सांगतो. दोन महिन्यापूर्वी, एका कामगाराने आमच्या हेल्थ ऑफिसरकडे २०० रुपयांचे कर्ज मागितले. सखोल चौकशीनंतर त्याने कबूल केले, की त्याच्या आईच्या उत्तरक्रियेसाठी कर्ज लागणार होते. आपली आई उपचारांच्या पलीकडे गेली असून तिला शक्तिपात झाला आहे, असे त्याने सांगितले. सकाळी तिच्या खोलीत काहीतरी खायला ठेवून तो बाहेर पडलेला होता; दहा तासांनीं परत खोलीवर गेल्यावर खोलीतील सर्व घाण काढून तिला पुनः थोडेसे खायला द्यावयाचे, अशी परिस्थिति होती. आमच्या हेल्थ ऑफिसर तिला खोलीवर जाऊन भेटली, तेव्हां ती मरणोन्मुख असलेली त्यांना आढळली. तिला खरी गरज होती शुश्रूषेची, चांगुलपणाची,

जिन्हाळ्याची. तिला मोटार गाडीत बसवून भाटिया जनरल हॉस्पिटलमध्ये हेल्थ ऑफिसर घेऊन गेल्या आणि काही सज्जनांच्या मध्यस्थीने तिला प्रवेश मिळवून दिला. योग्य काळजी घेतल्यामुळे आणि थोड्याशा औषधोपचाराने, जी मृत्यूच्या दाराशी पोचली होती तीच आतां दोन महिन्यांनी सिस्टरच्या साह्याने वॉर्डात चालू शकते. ह्या लहानशा घटनेनें कामगार वर्गावर किती चांगला परिणाम झाला असेल. त्याची तुम्हाला सहज कल्पना येईल कारण, ह्या सर्व गोष्टी आमच्या बोर्डावर लिहिल्या जातात. त्याचा उद्देश अर्थातच आम्ही कामगारांसाठी काय करतो ह्याची जाहिरात करणे हा नसून, आम्हीं त्यांचेसाठी जरूर पडली तर काय काय करण्यास तयार आहो ह्याची त्यांना कल्पना यावी, हा आहे.

तिघांचें प्रत्यक्ष नेत्रदान झाले आहे. एका कामगाराने हेल्थ ऑफिसरांना येऊन सांगितले, " माझी १८ वर्षांची मुलगी ऑर्थररोड इस्पितळांत आसन्नमरण आहे. तेथे जाऊन, मृत्यु घडल्यास नेत्रदान करण्यास कृपया मदत करा. " त्याप्रमाणे नेत्रदान झाले.

दुसऱ्या नेत्रदानाचा प्रसंग म्हणजे आमच्या एका कामगाराचा ३३ वर्षांचा धाकटा भाऊ मरण पावण्याच्या स्थितीत होता. मिल्समध्ये काम करणाऱ्या थोरल्या भावाने हेल्थ ऑफिसरांस भेटून अशीच विनंति केली आणि त्याप्रमाणे नेत्रदान घडून आले.

आमच्या कचेरीतील एका तरुणाने व त्याच्या पत्नीने २२ दिवसांच्या आपल्या पहिल्याच, छोट्या मृत बालिकेस नेत्रपेढीत नेले. हेल्थ ऑफिसर समवेत होत्याच. त्या छोट्या बालिकेचेही नेत्रदान झाले; त्यामुळे दोन अंधांना आता दृष्टी प्राप्त झाली आहे. डोळ्यांचा कॉर्निया काढण्यापूर्वी दोनच मिनिटे त्या बालिकेचे नामकरण करण्यात आले; कारण नेत्रदात्रीचे नाव नेत्रपेढीला आवश्यक होते.

या सर्व उपक्रमात आम्ही कामगारांकडे मानव ह्या दृष्टीने पाहिले आहे; त्यांच्याकडून अधिक चांगले उत्पादन मिळावे अशा हेतूने नाही. त्यांच्याकडून मिळालेला प्रतिसाद मात्र कल्पनातीत आहे.

त्यांच्यापासून आम्हास काय मिळाले? अधिक उत्पादन? अधिक चांगल्या दर्जाचे उत्पादन? खराबीच्या प्रमाणात घट? ह्या सर्वांचा आम्ही त्यांच्यासाठी जे करतो, त्याच्याशी संबंध ठेवलेला नसल्यामुळे मी त्याची चौकशीच केली नाही. मग, त्यांच्या प्रतिसादाचे मोजमाप कोणते? स्नेह आणि कृतज्ञता ह्यांचे त्यांच्या मुद्रेवर घडणारे दर्शन, खात्यांत गेल्यावर त्यांचेकडून आपोआप व्यक्त केला जाणारा आदर, मिल्समध्ये समाजसेवेसाठी आम्ही जे जे उपक्रम करतो, त्यांत सहकार्य करण्याची त्यांची तत्परता. गेल्या वर्षी आम्हाला स्वेच्छेने रक्तदान करणारे ८०० दाते लाभले; नेत्रपेढीला मृत्यूनंतर आपले डोळे द्यावेत असे लिहून देणारे २१७ नेत्रदाते मिळाले; ३३० जणांनी संततीप्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेतली आणि तिघांनी प्रत्यक्ष नेत्रदान केले. अशा रीतीने, सर्व चांगल्या कार्यात सहभागी होण्याची त्यांनी आत्मीयतेने तत्परता दर्शविली. व्यवस्थापनात कामगारांना सहभागी करण्याच्या घोषणा आपण ऐकत आलो आहो, पण सार्वजनिक क्षेत्रातील किती कारखान्यातून कामगारांना व्यवस्थापनात भाग घेण्याची संधी मिळाली आहे? कामगारांना सहभागी होण्याची जरूर इच्छा असते, ती म्हणजे मालक व कामगार ह्यांचेमधील मानवी नात्याने एकत्र येण्याची; हे पुरेसे नाही काय?

ते संपावर गेले तर? त्यांना संप करावयाचा असेल, तर करू देत. त्यामुळे आमच्या योजनेवर परिणाम होणार नाही. पहिल्याचा दुसऱ्याशी काहीही संबंध नाही. कामगारांकडून कुठल्याच प्रकारे प्रतिसाद मिळाला नाही, तरी सुद्धा त्यांचेकरता शक्य ते सर्व केले, त्यांच्या समस्या समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्या सोडविण्याचा शक्य तो प्रयत्न केला, ह्याच्या समाधानाचा मला आनंदच वाटत राहील. कामगार आणि त्यांचे प्रश्न ह्याकडे पहाण्याच्या दृष्टिकोनात माणुसकीच्या दृष्टीने परिवर्तन होण्याची आवश्यकता आहे.

फासे उलटे पडले असते तर? तुम्ही टेबलाच्या पलीकडे दूर बसला असता आणि कामगार तुमच्या खुर्चीवर विराजमान झाला असता! विचार करण्यासारखा आहे प्रश्न!

---


रौप्य महोत्सवी वर्षातील बँकेच्या यशस्वी पदार्पणाचे प्रसंगी
बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतकांचे
दीपावली शुभचिंतन!!
अचूक मार्गदर्शन व तदनुरूप अपार कष्ट आणि म्हणून भरभक्कम
आर्थिक परिस्थिति असलेली

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगाव

स्थापना : १९४२ ] तालुका बेळगाव [ फोन नं. ५३५

बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांच्या हार्दिक सहकार्याने आम्ही चालू साल "रौप्य महोत्सवी वर्ष" म्हणून साजरे करीत आहोत. या निमित्त कायम ठेवीवर शे. ५ ते ८ टक्के आकर्षक व्याज देण्याचे आम्ही सहर्ष जाहीर करीत आहोत याचा ठेवीदारांनी अवश्य फायदा घ्यावा.

२४ वर्षांची प्रदीर्घ वाटचाल :—

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. २,३१,००० |
| रिझर्व्ह फंड्स | रु. ३,०७,००० |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. ११,६७,००० |
| ठेवी | रु. २८,७८,००० |
| एकूण खेळते भांडवल | रु. ३५,४७,००० |

बँकेची वैशिष्ट्ये :

- आरंभापासून बँकेचा 'अ' वर्ग.
- माफक व्याजाच्या दराने गोडाऊन व इतर तारण कर्जे
- सर्व प्रकारच्या बँकिंगचे व्यवहाराची व्यवस्था.

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे
चेअरमन

# बँकांचे राष्ट्रीयीकरण का करू नये?

## रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण 'सामाजिक नियंत्रण' नाही काय?

श्री. कृष्णराज एम्. डी. ठाकरसी

( अध्यक्ष, इंडियन बँक्स असोसिएशन; चेअरमन, बँक ऑफ इंडिया लि.) ह्यांचे विचार

कॉंग्रेस पक्षांतील काही गट खाजगी व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी मधून मधून करीत असतात. त्यामुळे ह्या व्यापारी बँकांच्या भवितव्या विषयी अनिश्चितता उत्पन्न झालेली आहे. अर्नाकुलम येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीत कॉंग्रस पक्षाचा निवडणुकीचा जाहीरनामा मंजूर करण्यात आला. बैठकीत बँकांवर 'सामाजिक नियंत्रण' असावे अशी मागणी पुन्हा एकदा करण्यात आली आणि त्यावर चर्चाही करण्यात आली. त्यामुळे बँकांच्या भवितव्याबद्दलची परिस्थिती अधिकच अनिश्चित झाली आहे. ही घटना अतिशय दुःखदायक आहे. कारण तीमुळे खाजगी मालकीच्या विभागात होणाऱ्या भांडवलाच्या गुंतवणुकीस जोराची चालना मिळणार नाही. विशेषतः बँकांच्या विस्ताराला तीमुळे उत्तेजन मिळणार नाही.

उद्योगधंद्यांची अगर बँकांची नीट वाढ व्हावयाची असेल तर त्यासाठी भावी कालाबद्दल विश्वास वाटला पाहिजे हे सर्वांनाच माहीत आहे. निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत कॉंग्रेस पक्षावर बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे बंधन घालण्याचे प्रयत्न काही सभासदांनी केले. पण ते यशस्वी झाले नाहीत हे खरे आहे; आणि पंतप्रधानासकट काही प्रमुख पुढाऱ्यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची गरज नाही असेही विचार प्रकट केले आहेत. परंतु, जाहीरनाम्यात सामाजिक नियंत्रणावर जो जोर देण्यात आला आहे, आणि ह्या शब्दप्रयोगाचा जो अर्थ काही जबाबदार पुढाऱ्यांनी लावला आहे, त्यामुळे अनिश्चिततेच्या भावनेला पुन्हा एकदा उठावणी मिळाली आहे. आता 'सामाजिक नियंत्रण' ह्या शब्दप्रयोग संदिग्ध आहे. शब्दार्थाने पाहिले तर त्याचा अर्थ सामाजिक मालकी, म्हणजे सरकारी मालकी असा होत नाही. त्याचा अर्थ नियंत्रणापेक्षा अधिक होत नाही. ज्या अर्थी बँकांवरील सध्याची बंधने खूप कडक आहेत त्या अर्थी ह्याहीपेक्षा अधिक सक्त बंधने असाच त्याचा अर्थ होतो. काही वरिष्ठ कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या मताने 'सामाजिक नियंत्रण' हा शब्दप्रयोग इतका व्यापक आहे की त्याच्या आधाराने सरकारला बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची सत्ता प्राप्त होते.

खुद्द कॉंग्रेसच्या अध्यक्षांनी असा खुलासा केला आहे की, ह्या शब्दप्रयोगामुळे धोरणाचा लवचिकपणा अभिप्रेत आहे. निवडणुकी झाल्यानंतरच्या कालांत जशी गरज पडेल तशी कृति ह्या शब्दप्रयोगामुळे करता येईल. ह्या सर्व अन्वयार्थाच्या खटपटीमुळे बँकवाले आणि उद्योगधंदेवाले ह्यांच्यात पसरलेले चिंतेचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा हा प्रश्न प्रथमच उपस्थित करण्यात आलेला आहे, अशातला भाग नाही. गेल्या काही वर्षांत तो अनेकदा उपस्थित करण्यात आलेला आहे आणि त्याला तपशीलवार व परिणामकारक उत्तरही देण्यात आलेले आहे. तथापि, राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार करणाऱ्यांनी ह्या उत्तराकडे नेहमीच दुर्लक्ष केलेले आहे, आणि सांचेबंद राजकीय विचार व संदिग्ध आर्थिक उपपत्ती ह्यांच्या आधाराने राष्ट्रीयीकरणाची मागणी पुन्हा पुन्हा केलेली आहे, उदाहरणार्थ निवडणुकीच्या जाहीरनाम्यात पुढील विचार व्यक्त केले आहेत.

" आपला समाज हा आर्थिक दृष्ट्या अविकसित अवस्थेत आहे. अशा समाजात राजकीय सत्तेची रचनाच आर्थिक साधनसंपत्तीशी निगडित असते. म्हणून अर्थव्यवस्था नियंत्रण करणाऱ्या नाड्या ह्या खाजगी मालकांच्या हातात असता कामा नयेत. कारण, ज्यांच्या हाती आर्थिक सत्ता असते तेच लोक अखेर राज्ययंत्र राबवीत असतात. "

ह्यावरून हे उघड दिसते की ज्याच्या हाती आर्थिक सत्ता आहे त्यांना राजकीय सत्ता स्वतःच्या हातून जाण्याची भीती वाटते. म्हणून आज सत्तास्थानी असलेला पक्ष बँकिंगच्या धंद्यावर आपली पकड घट्ट करून जरूर पडल्यास तो सर्वच आपल्या हाती घेण्यास सिद्ध झाला आहे. पण ही भीती निराधार आहे.

आजही अशी स्थिती आहे की व्यापारी बँकिंगच्या व्यवसायातील एक तृतियांश हिस्सा सार्वजनिक मालकीच्या म्हणजेच स्टेट बँक व तिच्या उपसंघटना ह्यांच्या हातात आहे. हा विभाग आपले कार्यक्षेत्र झपाट्याने वाढवीत चालला आहे. ग्राहकांना तो अधिकाधिक सोयी उपलब्ध करून देत आहे. एका माजी अर्थमंत्र्याने अशी सूचना केलेली आहे की सरकारने आपले लक्ष आणि बुद्धी ह्या बँकांवर केंद्रीत करावी; खाजगी मालकीच्या विभागांतील बँका पूर्णतः अगर अंशतः आपल्या अखत्यारीत आणून कार्याचा पसारा अधिक वाढविण्याचा खटाटोप करू नये. कॉंग्रेस पक्षाचे ध्येय लोकशाही समाजवादाच्या छायेखाली संमिश्र अर्थव्यवस्था उभारण्याचे आहे. हिंदी बँकिंगच्या धंद्यात सध्या जी द्विदलपद्धती आहे ती हे ध्येय गाठण्यास पुरेशी ठरण्यासारखी आहे. खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या विभागांतील स्पर्धेमुळे समाजाचा फायदा झालेला आहे. कारण, ह्यामुळे बँकिंगच्या धंद्यांतील सोयी-सवलतीत सुधारणा झाल्या असून त्यांचा व्यापही वाढला आहे. तेव्हा सध्याच्या व्यवस्थेत ढवळाढवळ करण्याचे काही कारणच नाही. उलट, दोन्ही विभागाच्या चालकांना पुढाकार घेऊन काम करण्याचे अधिक स्वातंत्र्य देऊन आहे हीच व्यवस्था अधिक भक्कम करणेच अधिक इष्ट ठरेल. बँकिंगच्या धंद्यातील सार्वजनिक विभाग हा स्टेट बँक आणि तिच्या उपसंघटना ह्यांच्या पुरताच मर्यादित नाही. त्याशिवाय पोस्टाचे सेव्हिंग्ज बँक खाते आहे. अल्प बचत करणारांची संख्या वाढत चाललेली आहे. त्यांची बचत एकत्रित करण्याचे महत्त्वाचे काम हे खाते करीत आहे. ३१ मार्च १९६६ अखेर पोस्टातील सेव्हिंग्ज खात्यांत असलेली रक्कम ६४१ कोटी रुपये होती. ही सर्व रक्कम सार्वजनिक मालकीचा विभागच वापरतो. त्याशिवाय औद्योगिक बँका आहेतच. त्यांच्यापैकी बऱ्याच सार्वजनिक विभागातच आहेत. दि इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिआ, दि इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि राज्य सरकारांची फायनॅन्शिअल कॉर्पोरेशन्स ह्या सर्व संस्था सार्वजनिक विभागातच मोडतात. आणखी शिवाय ॲग्रिकल्चरल रिफायनॅन्स कॉर्पोरेशन, फिल्म फायनॅन्स कॉर्पोरेशन, ह्या संस्था आहेतच.

अलीकडे उभारण्यात आलेली युनिट ट्रस्टची द्रव्यविषयक संघटना तर सरकारची मोठीच संघटना आहे. ह्या सर्व संस्थांचे

द्रव्यबळ जवळ जवळ ३६० कोटी रुपयांच्या घरात आहे. त्यांच्या द्वारा सरकार खाजगी मालकीच्या विभागावर जोराचे दडपण आणीत असते. कारण, त्यांच्यामुळे भांडवल बाजार सुकत चाललेला आहे. ह्यावरून असे दिसून येते की बँकिंगच्या धंद्यातील सरकारचा हिस्सा हा वाटतो त्यापेक्षा बराच मोठा आहे. द्रव्यविषयक कारभारात आयुर्विम्यासारख्या संस्था जे कार्य करतात ते लक्षात घेतले तर अर्थव्यवस्थेतील मोक्याच्या जागी सरकारने आपले वर्चस्व आधीच स्थापन केलेले आहे. असे कबूल करावे लागेल. त्यात आणखी भर घालणे फोल आहे. इतक्या उपरही सरकारने खाजगी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे घोडे पुढे दामटले अगर त्यांच्यावरील सध्याच्या नियंत्रणात आणखी भर घातली तर सरकारवर अशी वाजवी टीका करण्यात येईल की उदारमतवादावर आणि व्यवहारवादावर त्याने अलीकडेच जो हक्क सांगितला आहे तो व्यर्थ आहे. उलट, सरकारच्या विचारावर एक प्रकारचा धोकादायक आणि दुराग्रही समाजवादाचा पगडा बसलेला आहे, आणि त्यामुळे अखेर लोकशाहीची लांडगेतोड होऊन कोणत्या तरी प्रकारच्या झोटिंगशाहीला उत्तेजन मिळेल. सत्तेची भूक तिला मिळत जाणाऱ्या आहुतीमुळे अधिकच भडकत जाण्याचा तो एक प्रकार होईल. ह्या संदर्भात लॉर्ड हेलशॅम ह्यांनी आपल्या 'दि केस फॉर कॉन्झरव्हेटिझम' ह्या ग्रंथात व्यक्त केलेले पुढील विचार मनन करण्यासारखे आहेत. "समाजवादाचा हेतू राजकीय आणि आर्थिक सत्तेचे काही थोड्या राजकीय धन्यांच्या हाती केंद्रीकरण करण्याचे असते. समाजवादाच्या बाजूने जो युक्तिवाद करण्यात येतो तो झोटिंगशहा राज्यकर्त्यांनी अनादिकालापासून केलेला आहे. कार्यक्षमता, राष्ट्रीय आणीबाणीची परिस्थिती, श्रीमंतांच्या अगर प्रतिष्ठितांच्या सत्तेपासून बहुजन समाजाचे रक्षण, संपत्तीची कार्यक्षम फेरवाटणी, इत्यादीवर आधारलेला हा युक्तिवाद आहे. समाजवादी हा नुसत्या नियंत्रणाने समाधान पावणारा नसतो; त्याला मालकीच हवी असते.

हे विचार किती यथायोग्य आहेत हे काँग्रेसचा जाहीरनामा वाचणाऱ्या कोणाही माणसाच्या सहज लक्षात येईल. जाता जाता एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. युद्धोत्तर कालात बहुधा अशाच देशातून बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे की, ज्या देशातून लोकशाही संपुष्टात आलेली आहे अगर नाममात्रच शिल्लक आहे. सध्या बँकांवर असलेली नियंत्रणे इतकी व्यापक आहेत की, त्यांच्यात आणखी वाढ करण्यास फारसा वावच राहिलेला नाही. अशी नवी नियंत्रणे घालण्यात आली तर त्यांच्यामुळे बँकांची कार्यक्षमता आणि काटकसरीचा कारभार ह्यांच्यावर वाईट परिणाम होण्याचा धोका आहे. रिझर्व्ह बँकेची बँकांवर इतकी सत्ता स्थापन झालेली आहे की त्यांच्यावर 'सामाजिक नियंत्रण' संपूर्णपणे आजच आहे.

बँकांवर असलेली नियंत्रणे थोडक्यांत अशी आहेत. (१) कारभारावरील नियंत्रणे : रिझर्व्ह बँकेला बँकेच्या चेअरमनला अगर कोणाही डायरेक्टराला काढून टाकता येते; बोर्डावर आपल्यातर्फे डायरेक्टरांच्या नेमणुका करता येतात. बँकेच्या मुख्य पदाधिकाऱ्यांच्या नोकरीबाबत स्वतःच्या अटी घालता येतात. ह्या जागांवर नेमण्यात आलेल्यांना मंजुरी देता येते अगर नामंजुरी नोंदता येते किंवा त्यांना काढून टाकून आपल्या पसंतीचा अधिकारी नेमता येतो. (२) देखरेख : रिझर्व्ह बँकेला कोणत्याही बँकेची, आधी सूचना न देता, संपूर्ण तपासणी करता येते. बँकेचे जे व्यवहार समाजविरोधी, धोक्याचे अगर ठिसूळ वाटतात त्यांचे परिमार्जन करण्याची सक्ती करता येते. मोठ्या रकमेच्या कर्जांच्या व्यवहारावर रिझर्व्ह बँक डोळ्यांत तेल घालून लक्ष देत असते. शिवाय कोणत्याही एकाच ऋणकोला १ कोटी अगर त्याहून अधिक कर्ज द्यावयाचे झाल्यास बँकेला रिझर्व्ह बँकेची आगाऊ परवानगी घ्यावी लागते. (३) विस्तारावर नियंत्रणे : कोणत्याही बँकेला शाखा काढतांना रिझर्व्ह बँकेची परवानगी घ्यावी लागते व तिचे धोरण सांभाळावे लागते. ज्या ठिकाणी बँकिंगच्या सोयी नाहीत अशा ठिकाणी त्यांचा विस्तार करण्याच्या कामी रिझर्व्ह बँकेने ह्या हत्यारांचा अलीकडे कार्यक्षम रीत्या वापर केलेला आहे. काही किमान दर्जापेक्षाही खालच्या दर्जाच्या असलेल्या बँका नाहीशा करण्यासाठी छोट्या बँका मोठ्या अगर मध्यम प्रतीच्या बँकात समाविष्ट करण्याची सक्तीही रिझर्व्ह बँकेला करता येते. त्याचप्रमाणे बँकांचे एकत्रीकरण करणे जर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अगर ठेवीदारांच्या दृष्टीने योग्य वाटले नाही तर रिझर्व्ह बँक अशा एकत्रीकरणाला परवानगी नाकारू शकते. (४) केंद्रीकरणाला अटकाव : बँकांची मालकी काही थोड्या लोकांच्या हाती एकवटू नये म्हणून एखाद्या भागधारकाचा मताधिकार रिझर्व्ह बँकेला मोठ्या प्रमाणावर मर्यादित करता येतो. बँकेच्या एकूण भागधारकांच्या मतांच्या अवघी एक टक्काच मते अशा वेळी देता येतात. बँकिंगच्या कायद्यांत कंपन्यातील डायरेक्टरांची सरमिसळ होऊ न देण्याची व्यवस्था आहे. बिगर बँकिंग कंपन्यांचा ताबा मिळविण्याविरुद्ध कलमे आहेत; सत्तेचा दुरुपयोग आणि पैशाचा गैरवापर ह्यांच्या तपासणीची आणि चेअरमनला अगर डायरेक्टरांना द्यावयाच्या कर्जावर मर्यादा घालण्याचीही व्यवस्था आहे. (५) पतनियंत्रण : पैशाच्या धोरणास अनुसरून रिझर्व्ह बँक बँकांनी ठेवींवर द्यावयाच्या व कर्जावर घ्यावयाच्या व्याजाच्या दराचे नियमन करते. त्याचप्रमाणे ठेवीपैकी किती पैसा कर्जासाठी वापरता येईल त्यासंबंधीचे प्रमाणही ठरवून देते.

ठेवींपैकी किमान २८ टक्के रक्कम तरी रोखींत रूपांतर करता येईल अशा स्वरूपात ठेवावी लागते. त्यांतच सरकारी रोख्यांचाही समावेश आहे. शिवाय मध्यवर्ती बँकेकडून मिळणाऱ्या पतीवरील कर्जावरील व्याज आणि त्याची सुलभता ह्यांच्यावर अंकुश ठेवून इतर बँकांची पतीवर व्यवहार करण्याची शक्ती तिला आटोक्यात ठेवता येते. ज्या हेतूंसाठी कर्ज देता येते त्यांच्यावर रिझर्व्ह बँकेला नियंत्रण ठेवता येते. थोडक्यांत म्हणजे बँकिंगच्या व्यवसायाची अशी कोठलीही बाब नाही की, जी रिझर्व्ह बँकेच्या नियमनाच्या कक्षेबाहेर आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्फत सरकारला मालकीचे सर्व हक्क उपभोगता येतात. पण, बँकांची प्रत्यक्ष मालकी असल्यामुळे ज्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात त्यातून मात्र सरकार मुक्त असते. रिझर्व्ह बँकेच्या आधीन असलेले हे सर्व अधिकार केवळ कागदी आहेत असे नाही, तर त्यांचा वापर चालू आहे ही महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवणे महत्त्वाचे आहे.

खाजगी मालकीच्या बँका गडगंज नफा मिळवीत असून त्यांच्या राष्ट्रीयीकरणामुळे सरकारच्या तिजोरीत द्रव्याची मोठी भर पडेल असे म्हणणे फोल आहे. बँकांच्या व्यवहारावर जी नियंत्रणे घालण्यात आलेली आहेत, त्यांच्यामुळे नफा मिळविण्याच्या बँकांच्या कुवतीवर आपआपच मर्यादा पडतात. बँकांच्या नोकरावर होणारा खर्च हा बँकांच्या खर्चाचा एक मोठा घटक आहे. हा खर्च ट्रायब्यूनल्स ठरवीत असतात. एकसारख्या वाढत जाणाऱ्या राहणीच्या खर्चामुळे नफ्याचे प्रमाण साहजिकच उतरते. खर्च वजा करून बँकांना जो नफा राहतो त्यापैकी फार मोठा वाटा सरकार कराच्या रूपाने स्वतःच घेते. उरलेल्या नफ्यापैकी २० टक्के नफा बँकांना कायद्याप्रमाणे रिझर्व्ह फंडाला बळकटी आणण्यासाठी उपयोगांत आणावा लागतो. नफ्यावर ज्या प्रमाणात व जेव्हा कर घेण्यात येतो त्या प्रमाणात सरकारचा बँकांच्या नफ्यातील वाटा आणखीच वाढतो. तेव्हा राष्ट्रीयीकरण केल्यामुळे सरकारला होणाऱ्या निव्वळ फायद्याचे प्रमाण फार मोठे असणार नाही. उलट, किती तरी वर्षे सरकारला तोटाच होण्याचा संभव आहे. कारण, बँकांच्या भागधारकांना नुकसानभरपाई देण्यासाठी जो भांडवली खर्च करावा लागेल त्यावरील व्याजाच्या रकमेचा

हिशेबही सरकारला करावा लागेल. काही थोडे मोजके धंदेवाले बँकांच्या व्यवहाराच्या नाड्या आपल्या हातात ठेवतात आणि फार मोठा आर्थिक सत्ता वापरतात असा आरोप करण्यात येतो. पण तो खोटा आहे. प्रत्येक बँकेचे हजारो ऋणको असतात. देशात ७६ शेडयूल्ड बँका असून त्यापैकी ६८ बँकांच्या सुमारे ४ हजार शाखा खाजगी मालकीच्या विभागात आहेत.

ह्या सर्वच बँका काही थोडया लोकांच्या हुकमतीत असतात असे म्हणणे म्हणजे कल्पनेची भरारी मारण्यासारखे आहे. खरी परिस्थिती अशी आहे की, भारतासारख्या विस्तीर्ण देशात बँकिंगचे व्यवहार अनेक ठिकाणी विखुरलेले व विकेंद्रित असतात. सर्व देशभर पसरलेले अनेक अधिकारी व्यवहाराबाबतचे निर्णय स्वतंत्रपणे घेत असतात. राष्ट्रीयीकरण करण्यात आल्यास मात्र ह्याच्या उलट परिस्थिती निर्माण होईल. कारण अधिकाराची सूत्रें एकाच कॉर्पोरेशनच्या डायरेक्टरांच्या हाती एकवटतील आणि काही थोडया लोकांच्या हाती प्रचंड आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होईल. त्यामुळे विरोधी राजकीय पक्षांना नाना तऱ्हेचे खरेखोटे दोषारोप करण्याची महान् संधि प्राप्त होईल आणि परिणामी काँग्रेसचे भवितव्यच धोक्यात येईल. हा भाग सोडला, तरी प्रत्येक ऋणकोला बँकेच्या नोकरशाहीच्या तालावर नाचावे लागेल आणि मोठी कर्जे मागणाऱ्यांना सत्ताधाऱ्यांपुढे मान तुकवावी लागेल. ठेवीदारांना पोस्ट ऑफिस छापाच्या समाजवादाची गोड फळे चाखावयास मिळतील. राष्ट्रीयीकरणामुळे, बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची पात्रता आणि पुढाकार घेण्याची वृत्ती ह्यांचाही लोप होईल. बँकिंगच्या व्यवसायाची जोरदार वाढ होण्यास ह्या गुणांची फार आवश्यकता असते. बँकांच्या डायरेक्टरांच्या हुकमतीखाली असणाऱ्या कंपन्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाबद्दल बरीच टीका करण्यात येत असते. खाजगी मालकीच्या विभागाबद्दल लोकांचा गैरसमज करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या युक्तिवादाचा हा एक नमुना आहे.

व्यापार आणि उद्योगधंद्यातील पुढारी बँकांच्या संचालक बोर्डावर असतात. कारण बँकांचे कारभार यशस्वीपणे चालविण्यासाठी ह्या पुढाऱ्यांच्या त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांतील अद्यावत् ज्ञानाची आणि अनुभवाची अतिशय गरज असते. अशा लोकांच्या कंपन्यांना ते केवळ बँकांच्या बोर्डावर आहेत म्हणून कर्जे न देणे कितपत योग्य ठरेल? दुसरे असे की, ह्या कंपन्यांचे अस्तित्व व विस्तार ही दोन्ही सरकारच्या औद्योगिक धोरणाच्या व योजनांच्या चौकटींत सामावलेली आहेत. ह्या कंपन्या राष्ट्रीय संपत्तींत मोलाची भर घालीत असतात आणि अनेक लोकांना रोजगार पुरवीत असतात. त्यांची कर्जाविना उपासमार करण्याचे परिणाम कल्पनेपलीकडे वाईट होतील. डायरेक्टर्स अगर डायरेक्टरांच्या अखत्यारातील कंपन्या ह्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाबाबत गुप्तता अशी नसतेच. ही कर्जे रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली असतात आणि त्यांची सर्व माहिती बँकांच्या ताळेबंदात द्यावी लागते. ती व्यापारधंद्याच्या रोजच्या व्यवहाराचाच एक भाग असतात. शिवाय ऋणकोपैकी बहुतेकांची पत इतकी अवल प्रतीची असते की त्यांचे गिऱ्हाइक घालविणे कोठल्याही बँकेला आवडणार नाही. सार्वजनिक विभागातील बँका सुद्धा डायरेक्टरांच्या हुकमतीखालील कंपन्यांना हमेशा का कर्जे देतात, ह्याचा ह्यावरून खुलासा होतो. ते कसेही असले तरी त्यांना देण्यात येणारी कर्जे दाखविण्यात येतात तेवढी मोठी नसतात.

चौथ्या व पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी बँकांच्या राष्ट्रीयकरणाची आवश्यकता आहे, ह्या युक्तिवादांत काहीच तथ्य नाही. लोकांची बचत एकत्रित करण्याच्या कामी खाजगी विभागांतील बँका सार्वजनिक विभागांतील बँकांच्या मागे आहेत असे नाही. त्यांचा पैसा पडून आहे अगर तो बिगर-किफायती मार्गांने वापरण्यात येत आहे असेही नाही. मागे सांगितल्याप्रमाणे बँकांजवळील पैसा रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे वापरण्यात येतो. सरकारच्या विकासाच्या हेतूंची पूर्तता करण्यासाठीच तो गुंतविण्यात येतो. अशा मर्यादा असून सुद्धा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या गरजा लक्षांत घेऊनच बँकांच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती व विविधता वाढविण्याचे प्रयत्न बँकांचे चालक व्यक्तिशः व संघटित रीत्या करीत असतात. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे समर्थन करण्यासाठी दोन मुद्दे मांडण्यात येत असतातः-(१) छोटया उद्योगधंद्यांच्या कर्जाच्या गरजांकडे खाजगी विभागांतील बँका दुर्लक्ष करतात आणि (२) शेतीला लागणारा पैसा पुरविण्याची कोशीस त्या मुळीच करीत नाहीत. ह्या युक्तिवादात असे गृहीत धरण्यात आलेले आहे की, एकदा बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले म्हणजे अर्थव्यवस्थेच्या ह्या भागांना पतीवर भरपूर पैसा मिळेल आणि त्यांची प्रगति वेगाने होईल. हे गृहीत विधान बरोबर आहे की नाही ते भावी घटनाच ठरवितील, परंतु बँकिंगच्या धंद्यांतील सरकारी विभागाचा अनुभव लक्षांत घेता ह्या समजुतीत अनेक गोष्टी अमुक तऱ्हेनेच घडतील असे मानण्यात आलेले आहे. ह्या प्रश्नांत अनेक व्यावहारिक अडचणी आहेत आणि त्यांचा परिहार हा फक्त बँकांच्या प्रयत्नांनी होण्यासारखा नाही.

ग्रामीण भागांतील कर्जे पुरवठ्याचे व्यवहार संस्थेमार्फत व्हावेत, लोभी सावकारांच्या पाशांतून शेतकऱ्यांची सुटका व्हावी आणि छोटया उद्योगधंद्यांना उत्तेजन मिळावे ह्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन स्टेट बँक आणि तिच्या सात उपसंघटना ह्यांची उभारणी करण्यात आली. ही सर्व उपाययोजना अंमलात येऊन १० वर्षांचा काळ लोटला आहे. पण ह्या बाबतीत विशेष प्रगति झालेली नाही. ह्या क्षेत्रांत व्यापारी बँकांच्या कर्तृत्वाला मर्यादा आहेत. त्यांच्या कसोशीच्या व सदिच्छेच्या प्रयत्नांना सुद्धा ह्या मर्यादांच्या कक्षेतच राहावे लागते. कारण, प्रश्नाचे स्वरूपच जगड्व्याळ आहे असाच त्याचा अर्थ आहे. प्रथम छोटया उद्योगधंद्यांचा प्रश्न पाहू. ह्या बाबतीत कर्जे देण्यापूर्वी वैयक्तिक ऋणकोच्या पतीची कसोटी कशी पाहावी आणि संबंधित धंद्याचा आर्थिक पाया भक्कम आहे की नाही हे कसे ठरवावे हा प्रश्न फार अवघड होऊन बसतो.

बँका जी कर्जे देतात, ती देतांना पतकऱ्याच्या लागणाऱ्या जोखमीची पैशाच्या सुरक्षिततेशी व तरलेपणाशी सांगड घालणे त्यांना आवश्यक असते. कारण, अखेर शेवटी लोकांनी बँकाजवळ ठेवलेल्या पैशाच्या विश्वस्त म्हणूनच बँकांना काम करावे लागते. ही अडचण आणि छोट्या खातेदारांची खाती ठेवण्यासाठी येणारा जबर खर्च सोसून सुद्धा अलीकडील काहीं वर्षांत खाजगी विभागांतील बँकांनी छोट्या उद्योगधंदेवाल्यांना दिलेल्या कर्जांत वाढ केलेली आहे व करत आहेत. ह्या बाबतींत स्टेट बँकेशी तुलना करता त्यांना खाली मान घालण्याची जरूरी नाही. ह्यासंबंधी उपलब्ध असलेले आंकडे पुढीलप्रमाणे आहेत. मार्च १९६५ अखेर छोटया उद्योगधंद्यांना स्टेट बँक सोडून इतर शेडयूल्ड बँकांकडून मिळालेल्या कर्जाची रक्कम ५५ कोटी रुपये होती. स्टेट बँकेने दिलेल्या कर्जाची रक्कम १९ कोटी रुपये होती. १९६२ सालच्या आकड्यांशी तुलना करता ह्या रकमा अनुक्रमे ३३ कोटी रुपयांनी व १३ कोटी रुपयांनी अधिक आहेत. स्टेट बँकेच्या उपसंघटनांनी दिलेल्या कर्जाचे वेगळे आकडे मिळत नाहीत. परंतु वर दिलेल्या आंकड्यांत त्यामुळे काहीशी भर पडली तरीसुद्धा खाजगी विभागांतील बँकांचा कर्जपुरवठ्यांतील वाटा खूपच मोठा असेल. छोटया उद्योगधंद्यांना अधिक कर्जे देण्यास आता अधिक वाव नाही असे सूचित करण्याचा उद्देश नाही. परंतु उद्योगधंद्यांच्या ह्या भागाला अधिक प्रमाणांत पैसा पुरविण्याची आवश्यकता आहे ही गोष्ट पूर्वीपेक्षा आता बँकांना जाणवू लागली आहे हेच ह्यावरून सिद्ध होते.

त्यामुळे कित्येक बँकांनी आता त्यासाठी स्वतंत्र खातीच काढली असून कर्जे देण्याची आपली पद्धत व तंत्र अधिक उदार केली आहेत. ह्या दिशेने होणारी प्रगती अधिक वेगाने करण्यात आली पाहिजे.

हे कसे करता येईल ते पाहण्यासाठी बँका एकजूट प्रयत्न करतील अशी आशा करण्यास हरकत नाही. शेतीसाठी पतीवरील कर्जपुरवठा करण्याचा प्रश्न व्यापारी बँकांच्या दृष्टीने अशक्य नसला तरी बऱ्याच अडचणीचा आहे. प्रथम ह्या प्रश्नाचे स्वरूप स्पष्ट समजावून घेतले पाहिजे. व्यापारी बँका शेतीसाठी कर्जपुरवठा करीत नाहीत अशी टीका जेव्हा करण्यात येते, तेव्हा टीकाकारांना काय म्हणावयाचे असते? त्यांच्या मनांत छोटया शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणाऱ्या कर्जाची बाबच मुख्यतः असते. व्यापारी पद्धतीवर चालविण्यात येणाऱ्या मोठया अगर मध्यम आकाराच्या मळ्यांना अगर शेतीच्या मालाला बाजारपेठ मिळवून धावयासाठी लागणारा कर्ज पुरवठा त्यांच्यासमोर नसतो. ह्या दोन शेतीच्या विभागांना बँकांकडून भरपूर प्रमाणावर पैसा पुरविला जात आहेच, आणि पुरेसा पैसा उपलब्ध झाल्यास त्यांना अधिकही पैसा पुरविणे फारसे कठीण जाण्याचे कारण नाही. सार्वजनिक मालकीच्या विभागातील अग्रिकल्चरल रिफायनॅन्स कॉर्पोरेशन ह्या बाबतीत मोठी मदत करू शकेल.

लक्षावधी शेतकऱ्यांना वैयक्तिक रीत्या शेतीसाठी पैसा कसा पुरवावा हा खरा प्रश्न आहे. ह्यापैकी बहुसंख्य शेतकरी आपल्या तुटपुंज्या गरजा जेमतेम भागविण्याइतकी शेती करीत असतात. पाऊसपाण्याच्या अनिश्चिततेच्या धोक्याशी त्यांना नेहमी सामना करावा लागतो. भारतात सुमारे ६ कोटी शेतकरी कुटुंबे असावीत असा अंदाज करण्यात आला आहे. ह्या कुटुंबांना कसण्यासाठी सरासरी प्रत्येकी ६ एकर जमीनच उपलब्ध आहे. त्यांतही ७० टक्के कुटुंबांची जमीन ह्या सरासरीपेक्षाही कमी असते. ही सर्व शेतकरी कुटुंबे देशभर विखुरलेली आहेत. ज्यांच्या पैशाच्या साठ्यावर आधीच खूप ताण पडलेला आहे, अशा मूठभर व्यापारी बँकांनी ह्या कोट्यवधी शेतकऱ्यांच्या गरजा कशा भागवाव्या हा प्रश्नच आहे. टीकाकारांपाशी ह्या प्रश्नाचे काही उत्तर असेल तर बँक-चालकांना ते जाणून घेण्याची इच्छा आहे. केवळ मालकीत बदल करणे म्हणजे प्रश्नाची सोडवणूक करणे नव्हे. असे म्हणणे म्हणजे लोकांची दिशाभूल करण्यासारखे आहे.

व्यापारी बँकिंगच्या विभागांतील एकतृतियांश विभाग आजच सरकारच्या मालकीचा आहे; पण त्यामुळे ह्या प्रश्नाला हात सुद्धा लागलेला नाही. शेतीसाठी पैसा उपलब्ध करून देण्याचा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न करण्यात भारतामधील अनेक बुद्धिमान लोकांनी आपल्या आयुष्याचा फार मोठा भाग आजवर खर्ची घातलेला आहे. व्यापारी बँकांच्या संघटनेच्या मर्यादा आणि ठेवीदारांची त्यांच्यावर असलेली जोखीम लक्षांत घेता ह्या बाबतीत त्यांचा फारसा उपयोग होणार नाही असा निष्कर्ष वरील अभ्यासकांनी काढलेला आहे. त्यांच्या मताने सहकारी बँकाच हा प्रश्न सोडवू शकतील. सहकारी बँका ह्या बाबतीत जरूर ते प्रयत्न करीत आहेत. त्यांनी कांही प्रगतीही करून दाखविली आहे. पण त्याची काहीशी मोठी किंमत लोकांना द्यावी लागली आहे. सहकारी बँकांनी दिलेल्या कर्जांपैकी बरीच रक्कम परत फेडण्यात आलेली नाही. १९६२-६३ साल अखेर बँकांना येणे असलेल्या कर्जांपैकी २२.५ टक्के कर्जे मुदत टळलेली आहेत. शिवाय उत्पादक कामासाठी घेतलेल्या कर्जांपैकी बराच मोठा हिस्सा अनुत्पादक कामासाठी वापरण्यात आल्याचाही बोभाटा आहे. ह्यावर उपाय म्हणजे सहकारी चळवळीची सुधारणा करून तिची व्याप्ती व बळकटी वाढविणे हा आहे. ग्रामीण भागांत पतीवर कर्जपुरवठा करण्याच्या कामी व्यापारी बँकांना सहभागी करून घेण्याचा एखादा मार्ग सांपडणार नाही असे नाही. पण त्यासाठी संबंधितांच्या विधायक दृष्टिकोणाची आणि निकटच्या सहकार्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीयीकरणाच्या धमक्या आणि अधिक कडक नियंत्रणाची भाषा ह्यांनी ते साधारण नाही. व्यापारी बँका, स्टेट बँक, रिझर्व्ह बँक आणि सरकार ह्यांनी एकत्रित रीत्या विचारविनिमय करण्याची गरज आहे. ह्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी पूर्वग्रहापासून अलिप्त असलेल्या एखाद्या तज्ञाच्या कमिशनची नेमणूक करण्यास हरकत नाही. द्रव्य पुरविण्याच्या निर्धोक तत्वांना बाध न आणता व्यापारी बँकांना शेतीसाठी पतीवर कर्जे देता येतील की नाही आणि तशी ती देत असतील तर कशी व कोणत्या प्रमाणावर देता येतील ह्या प्रश्नाचा अभ्यास करून कमिशनने मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा. ■

। वरं जनहितं ध्येयम् ।
या तत्वानुसार
गेली २६ वर्षे मोटार विमा क्षेत्रांत मोटार मालकांच्या सेवेत सदैव तत्पर असलेल्या
# दि मोटार ओनर्स इन्शुअरन्स कंपनी लि.
मुख्य कचेरी—बेळगाव
या कंपनीच्या विमेदार व प्रतिनिधींना
## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
नूतन वर्ष सुखाचे आणि समृद्धीचे जावो
आमच्या शाखा—भारतातील सर्व प्रमुख शहरी आपल्या सेवेस तत्पर आहेत.

# आफ्रिकेतील देशांना चीनची अल्प मदत
# पण गाजावाजा फार!

आफ्रिकेमधील देशांच्या बाबतीत आर्थिक आणि मुत्सद्देगिरीच्या आघाड्यांवर चीनने आक्रमक आघाडी उघडल्याबद्दल अलीकडे बराच गाजावाजा करण्यात आलेला आहे. चीनकडून ह्या देशांना देण्यात आलेली मदत त्यांना अमेरिकेकडून अगर रशियाकडून देण्यात येत असलेल्या मदतीशी तुलना करता येण्यासारखी नाही हे खरेच आहे. तथापी चीनने आपल्या सामर्थ्याला पेलेल इतकी मदत केलेली आहे आणि प्रचाराचा भाग म्हणून त्यासंबंधी जितका गाजावाजा करता येईल तितका करण्याचे चालू ठेवले आहे. सध्या चीनचे १७ आफ्रिकन देशांशी राजनैतिक संबंध आहेत. ते देश असे—अल्जीरिआ, बुरुंडी, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, कांगो, इथिओपिआ, घाना, गिनी, केनिआ, माली, मॉरिटानिआ, मोरोक्को, सोमाली रिपब्लिक, टॅनझानिआ, ट्युनिशिआ, युगांडा, यु. ए. आर आणि झांबिआ. ह्यांपैकी अल्जीरिआ, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, कांगो, घाना, गिनी, केनिआ, माली, सोमाली, टॅन्झानिया व यू. ए. आर ह्या देशांना आर्थिक मदत देण्याच्या कामी चीनने विशेष प्रयत्न केलेले आहेत. १९५६ साली चीनने पहिल्या प्रथम युनायटेड अरब रिपब्लिक ह्या देशाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले आणि त्या देशाला ५० लाख डॉलर्सचे कर्ज मंजूर केले. तेव्हापासून अलीकडच्या काळापर्यंत चीनने आफ्रिकेतील देशांना आर्थिक मदत देण्याच्या आपल्या जबाबदारीत ३० पटीने वाढ करून घेतली आहे. गेल्या वर्षी मात्र चीनने नवीन कोणतीही जबाबदारी अंगावर घेतलेली नाही. फक्त टॅनझानिआला मात्र ९० लाख डॉलर्सचे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले आहे. ऱ्होडेशिआंतील वर्णीय राजवटीच्या प्रश्नावर ब्रिटन व टॅनझानिया ह्यांचे बिनसले आणि ब्रिटनचे टॅनझानिआशी असलेले संबंध तुटले. त्याचा परिणाम म्हणून ब्रिटनची त्या देशाला मिळणारी मदत बंद झाली. टॅनझानिआच्या विकासाच्या कार्यक्रमावर मदतीच्या अभावी वाईट परिणाम होऊ लागल्यामुळे चीनने नुकसानी टाळण्यासाठी बरील मदत देऊ केली. तथापी, चीनकडून देण्यात येणाऱ्या मदतीत हळू हळू वाढ होत आहे. १९६० साली गिनी देशाला २·४ कोटी डॉलर्सचे कर्ज चीनने दिले. १९६१ साली घाना आणि माली ह्या देशांना प्रत्येकी १·९६ कोटी डॉलर्सचे कर्ज मंजूर करण्यात आले. दोन वर्षानंतर अल्जीरिआ आणि सोमाली ह्या देशांनाही चीनकडून अनुक्रमे ५ कोटी डॉलर्स आणि २·१६ कोटी डॉलर्स अशी मदत देण्यात आली. ह्याशिवाय ह्या देशांना अंदाजपत्रकी देणग्या म्हणून प्रत्येकी २८ लाख डॉलर्सही देण्यात आले.

१९६४ साली मात्र आफ्रिकेतील बऱ्याच नव्या देशांना मदत देण्याचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक ह्या देशाला ४० लाख डॉलर्स, केनिआ १·५ कोटी डॉलर्स, घाना २ कोटी डॉलर्स, यु. ए. आर ५ कोटी डॉलर्स, टॅन्झानिआ ४·२ कोटी डॉलर्स व कांगो २·५ कोटी डॉलर्स अशी मदत वाटण्यास आली. पुढे दिलेल्या मदतीसंबंधीच्या कोष्टकावरून असे दिसून येईल की चीनची आर्थिक मदतीची आक्रमक आघाडी मुख्यत: कांही थोड्या समाजवादी प्रवृत्तीच्या देशांपुरतीच मर्यादित आहे. आफ्रिकेंत ३६ स्वतंत्र देश आहेत; पण त्यांपैकी यु. ए. आर., टॅन्झानिआ, अल्जीरिआ व घाना. ह्या चारच देशांना आर्थिक मदत देण्यात चीनचे लक्ष केंद्रित झालेले दिसून येते.

आफ्रिका ह्या खंडात केव्हा काय होईल हे सांगणे कठीण असले तरी ह्या खंडात अलीकडे विलक्षण बदल घडून आलेले आहेत आणि त्यांपैकी बहुतेक चीनच्या राजकीय व आर्थिक कारवायांना पायबंद घालणारेच ठरले आहेत. उदा. केनिआ, घाना आणि सेंट्रल अफ्रिकन रिपब्लिक ह्या देशांना चीनकडून मिळणारी अर्थिक मदत त्या देशांची आर्थिक भरभराट घडवून आणण्याच्या प्रामाणिक हेतूने देण्यात येत नाही असा समज पसरलेला आढळून येतो. इतर काही कारणांमुळेही चीनच्या आर्थिक मदतीबद्दल भ्रमनिरास होऊ लागला आहे. चीनकडून मिळालेल्या मदतीच्या आश्वासनांची कसोशीने पहाणी केली तर असे दिसून येते की त्यापैकी बहुतेक अजून अपुरीच राहिलेली आहेत. मदतीच्या ह्या घोषणा केवळ प्रचाराची हत्यारे म्हणून लोकांचे लक्ष वेधण्यासाठीच करण्यात आल्या होत्या असे उघड झाले आहे. चीनकडून देण्यात येणारी मदत ही बहुधा हलक्या उद्योगधंद्यात तयार करण्यात आलेल्या मालाच्या स्वरूपात असते. उदा. कापड, कागद, सीमेंट, साखर, इत्यादी. आफ्रिकेतील देशांचा औद्योगिक विकास साधण्यासाठी भारी उद्योगधंद्यांची गरज आहे. अर्थातच त्यांच्या विकासाच्या कार्यक्रमात ह्या उद्योगधंद्यांना अग्रहक्क मिळणे स्वाभाविक आहे. पण चीनकडून भारी उद्योगधंद्याबाबत मदत देण्यात येत नाही. दीर्घ मदतीच्या भरीव मदतीच्या कार्यक्रमापेक्षा चीन स्वत:च्या प्रचाराला उपयोगी पडेल अशा प्रकारची लवकर फलद्रूप होणारी मदत देण्याच्या बाबतीतच अधिक आस्था दाखवितो असे दिसून येते. रशियाने इजिप्तमधील आस्वान धरण बांधण्यास मदत केली आहे; अमेरिकेने घानामधील व्होल्टा नदी योजनेसाठी मदत केली आहे. अशा प्रकारची दीर्घसूत्री व मोठी मदत चीनने आफ्रिकेतील कोणत्याच देशाला दिलेली नाही हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

चीनच्या मदतीतील आणखी एक दोष म्हणजे तिचा फापटपसारा; अशा मदतीमुळे मदत घेणाऱ्या देशाला स्वत:च्या गरजांप्रमाणे तिचा कार्यक्रमबद्ध वापर करणे अशक्य होऊन बसते. शिवाय चीन स्वत:च्या पसंतीस पडेल अशाच कामांना मदत देतो. त्यामुळे मदत घेणाऱ्या देशाचा गोंधळ उडून जातो. त्याचा परिणाम असा झाला आहे की कित्येक आफ्रिकन देशांनी चीनची मदत हेतुपूर्वक नाकारली आहे. नायजेरिआच्या अध्यक्षांनी चीनच्या मदतीला दिलेले पुढील प्रशस्तीपत्र पहा. ते म्हणतात, "चीनची मदत दिसण्यात मोहक असते; पण तिचा खरा उपयोग होत नाही. पुष्कळदा मदत पैशाच्या रूपात देण्यात न येता यांत्रिक साधनांच्या रूपात देण्यात येते. त्यापैकी बरीच यांत्रिक साधने जुनीपुराणी झालेली असतात. मदतीच्या परतफेडीची पुढे येणाऱ्या पिकांशी सांगड घातली जाते. म्हणजे देशाचे उत्पन्न ते हाती येण्यापूर्वीच गहाण लावून घेण्यात येते." ह्या प्रशस्तीपत्रकाला बऱ्याच आफ्रिकन देशांचा पाठिंबा आहे. चीनच्या आक्रमक मदतीच्या आघाडीचा आफ्रिकेतील देशांवर काय परिणाम झाला आहे? आफ्रिकेतील देशांनी व लोकांनी स्वत:च्या उद्धारासाठी काय करावे हे सांगण्यासाठी चिनी लोकांनी आफ्रिकेत येऊ नये असे त्यांच्या तोंडावर स्पष्ट सांगण्यात आलेले आहे. टँझानिआ ह्या देश चीनचा आफ्रिकेतील बालेकिल्ला समजण्यात येतो. पण, ह्या देशाचे अध्यक्ष स्पष्टच म्हणतात की चीनचा आफ्रिकेतील प्रभाव फारसा नव्हताच; अलीकडे आफ्रिकेतील देशांत झालेल्या लष्करी क्रांत्यांनंतर तर तो अधिकच कमी झाला आहे.

| देश | आंकडे १० लाख डॉलर्सचे कर्ज | देणग्या |
|---|---|---|
| यु. ए. आर | ५५ | – |
| अल्जीरिआ | ५० | – |
| टॅन्झानिआ | ५१ | २·८ |
| घाना | ४० | – |
| कांगो | २५ | – |
| गिनी | २४ | – |
| सोमाली | २०·१६ | २·८ |
| माली | १९·६ | – |
| केनिआ | १५·०० | ३ |
| सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक | ४·० | – |
| एकूण | ३०३·७६ | ८.६ |

विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरंटी' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापडदुकान

**ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स**

'होम ऑफ **क्वालिटी** अॅण्ड **व्हरायटी**'

पेरुगेट रोड, पुणे २.

(फोन नं. ५७३१८)

---

नवीन माल : : 卐 : : योग्य किंमत

★ जरीची लुगडी, ★ फॅन्सी साड्या, ★ सुंदर बनारसी शालू

व

**— सर्व मिलचा माल —**

याकरिता

आमची शाखा कोठेही नाही

**शाहाडे आठवले प्रा. लि., दादर**

मुंबई २८.

(टे. नं. ४५४५५४)

---

**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५) ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. (टेलिफोन ३५६५०२

१) बचत खाते :-व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००

२) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

३) खास बचत योजना :-घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

अधिक तपशीलासाठी लिहा अथवा भेटा.

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

---

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ **माकडछाप** म्हणजेच **काळी टूथ पावडर** ★

# बँकांतील संपावर
# गिऱ्हाइकांचा तोडगा

## आयर्लंडमधील परस्पर-सहकार्याचे उद्‌बोधक उदाहरण

गेल्या मे-जून महिन्यात आयर्लंडमधील बँकात संप झाला होता. संपामुळे तेथील सामाजिक जीवनावर ताण अर्थातच पडला; पण संप संपल्यावर तावडतोब तरी आर्थिक घडीवर फारसे वाईट परिणाम झाल्याचे दिसून आले नाही. सुमारे ४० लाख लोकवस्तीच्या ह्या देशातील लोकांना फारशी गैरसोय सोसावी न लागता निभावून नेता आले ही गोष्ट काहीशी आश्चर्यकारकच म्हणावी लागेल. संपाच्या काळांत नागरिकांत त्यासंबंधी होणारे संवाद गैरसोयीची दखल न घेणारेच होते. संपाच्या काळांत बँकांच्या नेहमी गजबजलेल्या इमारती थंड होत्या; पण ह्याचा अर्थ देशातील आर्थिक व्यवहार बंद पडले होते असा मात्र नाही. आयर्लंडमध्ये पगाराच्या वाटपासाठी दर आठवड्याला ९ कोटी पौंड लागतात. खुद्द सरकारलाच आपल्या ६१ हजार नोकरांच्या पगाराचा बटवडा करण्यासाठी दर आठवड्याला २० लाख पौंडाची गरज लागते. शिवाय देशांतील दुकाने, व्यापारी व इतर संस्था ह्यांचे व्यवहार चालू ठेवणे भागच होते, पतीची व्यवस्था करणे जरूर होते आणि कर्जाची फेड करणेही अगत्याचे होते. आयात-निर्यातीसाठी पैसा पाहिजे होता. हे सर्व कसे करण्यात आले? ह्याचे साधे उत्तर असे की, संपाच्या काळात सर्व संबंधितांनी आपले काम आपणच करण्याचे, आणि अगदीच अडल्यास पैशामुळे नडणारे व्यवहार बंद ठेवण्याचे धोरण स्वीकारले. आयातीच्या मागण्या पुढे ढकलण्यात आल्या, आणि गुदामात आलेला माल सोडवून घेण्याचे थांबविणेही भाग पडले. ज्या लोकांच्या जवळ रोकड पैसा होता पण संपामुळे ज्यांना तो बँकेत जमा करता येत नव्हता, त्यांनी ज्यांना तो हवा होता पण मिळत नव्हता अशा लोकांशी सांगड घालून परस्परांना उपयुक्त ठरणाऱ्या साखळ्याच निर्माण केल्या. सरकारी नोकर, सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यातील नोकर आणि लष्करातील अधिकारी ह्यांना चेकने वेतन देण्यात आले. हे चेक्स वटवून देण्याची व्यवस्था सरकारच्या अर्थखात्याने केली आणि ज्यांना रोख पैसे पाहिजे होते त्यांना ते दिले. त्यासाठी लागणारी रक्कम खात्याने रोजच्या उत्पन्नातून, विशेषतः पोस्टाच्या कचेऱ्यांकडून मिळविली. आयात करणाऱ्यांनी कस्टम्स खात्याची फी रोखीने दिली आणि बंदराच्या व्यवस्थापकांनी हे पैसे आपल्या नोकरांच्या पगारापोटी वापरले. कारखानदार व घाऊक व्यापारी ह्यांनी किरकोळ दुकानदारांकडून शक्य तितकी रोख रक्कम मिळविली. व्यापारी बँका, हप्त्याने वस्तू विकत देणाऱ्या संघटना आणि विमा कंपन्या ह्यांनी दुहेरी कार्य केले. त्यांनी बँकांपेक्षाही अधिक व्याजाच्या दराने नेहमीपेक्षा खूप अधिक प्रमाणात ठेवी घेतल्या आणि हा पैसा मोठ्या आणि मध्यम धंद्यांच्या व्यवहारासाठी कर्जाऊ दिला. एका व्यापारी बँकेला एकाच गिऱ्हाइकाने ५६ हजार पौंडाची रक्कम १ पौंडांच्या नोटांत देऊ केली. त्याचे अर्थातच सहर्ष स्वागत झाले. ज्या कंपन्या आपल्या नोकरांचे पगार नेहमी चेकने देत असत, त्यांनी ते रोखीने देण्यास सुरुवात केली. काही कंपन्यांच्या नोकरांनी स्वतः होऊनच रोखीशिवाय सर्व काही चालू ठेवले. शहरातील आणि ग्रामीण भागातील हजारो मद्यपानगृहातून चेक्सच्या बदला रोख रक्कम देण्यात आली. डब्लिन शहरातील ४८० मद्यपानगृहांतूनच २ लाख पौंडाचे चेक्स जमा झाले. त्याचप्रमाणे शहरातील व खेड्यातील छोट्या दुकानदारांनी आपआपल्या गिऱ्हाइकांची सचोटी जाणून त्यांच्या चेकच्या बदला रोख पैसे दिले, अगर त्यांना उधारीने माल दिला.

त्याच सुमारास आयर्लंडमध्ये नेहमीपेक्षा अधिक रोख रक्कम व्यवहारांत असल्याचे आढळून आले. संपामुळे बँकांचे दरवाजे बंद होण्यापूर्वी १ कोटी पौंडाची जादा रक्कम बँकांतून काढण्यात आली असावी असा अंदाज आहे. दूरदृष्टी असलेल्या खातेदारांनी बँकांकडून अधिक चेकबुके घेतली. ज्यांना हे जमले नाही त्यांना आपले चेक्स आपल्या नावाच्या पत्रावर अगर साध्या कागदावर लिहिणे भाग पडले. ह्या सर्व धांदलीत एका मार्गाने मिळणारी रोकड मात्र खूपच रोडावली. खलाशांचा संप चालू असल्यामुळे आयर्लंडला येणाऱ्या प्रवाशांची ये-जा थांबली आणि त्यांच्यापासून मिळणारी रोख प्राप्ती बंद झाली. आयर्लंडमधील हॉटेल मालकांना सुमारे १० लाख पौंडांना मुकावे लागले. आयर्लंडमधून बाहेर जाणाऱ्या प्रवाशांना रोख रक्कम दिल्याशिवाय प्रवासी चेक्स मिळणे अवघड होऊन बसले. बँकांतील नोकरांना संपाचा तडाखा विशेष जाणवला. आयर्लंडमधील ४,४०० बँक नोकरांपैकी २ हजारांनी इंग्लंडमध्ये अनेक प्रकारची रोजगारी स्वीकारली. मजुरी, कारखान्यातील व कचेऱ्यांतील नोकऱ्या, दुकानातील साहाय्यक, हॉटेलमधील वेटर, अशी मिळतील ती कामे त्यांना करावी लागली. संपाच्या अखेरच्या काळात मात्र अडचणी अधिक जाचक होऊ लागल्या. व्यवहारात आलेल्या जादा १ कोटी पौंड रकमेपैकी अर्धी अधिक रक्कम गुप्त झाली. कारण, काही बड्या उद्योगपतींनी रोख रक्कम सांठविण्यास सुरवात केली आणि काही रक्कम सरळच कपड्याच्या पेटयांतून देशाबाहेर नेण्यात आली. एकदा ह्या रकमा इंग्लंडमध्ये गेल्यावर त्या बँकांतून ठेवी म्हणून ठेवण्यात आल्या किंवा ब्रिटनमधील व परदेशातील कंपन्यांची देणी भागविण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यात आला. पोस्ट ऑफिसांतून मनीऑर्डर्स करण्याची गर्दी उसळली व त्यांचे पैसे रोख मिळावेत म्हणून त्या 'अनक्रॉस्ड' ठेवणे भाग पडले. रोखीच्या पैशाची परिस्थिती अधिक तंग होऊ लागली. व्यापाऱ्यांनी चेक्सबद्दल रोकड देतांना अधिक सावधगिरी बाळगण्यास प्रारंभ केला. कारण एकाने दुसऱ्याच्या नावावर व त्याने तिसऱ्याच्या नावावर केलेल्या चेक्सची संख्या वाढली आणि अर्थात असुरक्षितताही वाढली. म्हणून काही व्यापाऱ्यांनी फक्त खातेदारांनी काढलेले मूळ चेक्सच वटविण्यास प्रारंभ केला; तर काहींनी चेक्स घेण्याचे अजिबातच बंद केले. मोठ्या कंपन्यांनी आगीच्या भीतीने आपल्या जवळील चेक्सचे सूक्ष्मदर्शी फोटो घेतले. डब्लिनमधील एका कंपनीला तर चांगलीच अद्दल घडली. त्या कंपनीने १,५०० पौंडाच्या चेकच्या बदला तेवढी रक्कम रोख दिली होती. पण पुढे असे उघडकीस आले की, ज्या कंपनीने हा चेक दिला होता तिने आपला कारभार स्वेच्छेने गुंडाळलेला होता. डब्लिनमधील तीन कंपन्यांनी काही अटीवरच चेक्स स्वीकारले. चेकची तारीख आणि बँका पुन्हा खुल्या होण्याची तारीख यामधील काळासाठी त्यांनी ७ टक्के वटणावळ आकारण्याची अट घालून मगच चेक घेतले.

संपाच्या ह्या गडबडीत काही कायद्याच्या अडचणी उत्पन्न झाल्या. एका बँकेच्या खातेदाराला आपल्या परदेशीय पुरवठावाल्याला देण्यासाठी बँकेतून १,४०० पौंड काढावयाचे होते. चेक वटण्याची खात्री नसल्यामुळे पुरवठा करणारा आयर्लंडमधील बँकेवरील चेक घेण्यास तयार नव्हता. खातेदाराने बँकेच्या मॅनेजरला लिहून पाहिले; पण त्याने पैसे काढण्यास नकार दिला. तेव्हा खातेदाराने एका नाणावलेल्या वकिलाचा सल्ला घेऊन वकिलातर्फे बँकेला अशी नोटीस दिली की, बँकेने १,४०० पौंड एक आठवड्याच्या आत न दिल्यास बँकेचा कारभार गुंडाळण्याचा अर्ज कोर्टात करण्यात येईल. कारण, रक्कम न दिल्यास बँक आपली देणी देऊ शकत नाही असा त्याचा अर्थ होईल. ह्या नोटिशीचा परिणाम होऊन बँकेने १,४०० पौंडांचा चेक – आणि तोही इंग्लिश बँकेवरील – उलट टपालाने पाठविला. संपाचा परिणाम म्हणून बँकेच्या वरिष्ठ नोकरवर्गात कडवटपणा उत्पन्न झाला. कारण ते संपावर गेले नसतांनाही त्यांना बँकेतर्फे बड-

तर्फीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या. तेव्हा त्यापैकी तिघांनी बँकेशी असलेल्या नोकरीच्या कराराचा बँकेने भंग केल्याबद्दल कोर्टात चाचणी दावेही दाखल केले. काही कनिष्ठ दर्जाचे नोकर इंग्लंडला गेले ते तिकडेच राहण्याचा संभव दिसू लागला. त्यांच्यापैकी कांही मुली होत्या. त्यांना इंग्लंडमध्ये आठवड्याला २५ पौंड मिळू लागले आणि काम मात्र पूर्वीच्या मानाने सरासरी निम्मेच पडले. आयर्लंडमधील बँका ह्या रोजगार पुरविणाऱ्या संस्था हृया दृष्टीने मोठ्यापैकी आहेत, परंतु बँकेत काम करणाऱ्या लोकांची व्यवस्था पहाणारे आणि त्यांच्या रजा-बदल्या वगैरे करणारे तज्ज्ञ कारभारी मात्र बँकांजवळ नसतात. अशा एखाद्याच अधिकाऱ्याचे ह्या बाबतीत प्रशिक्षण झालेले असते. तथापी ह्या सर्व अडचणीतून उत्पन्न झालेल्या कडवटपणात बँकेच्या अधिकारी वर्गात निर्माण झालेली संशयाची भावना तीव्र स्वरूपाची होती. आयर्लंडमधील औद्योगिक अशांततेला आपला निष्कारण बळी देण्यात येत आहे असा त्यांचा समज झाला. आयरिश बँकांच्या बोर्डात बहुतेक उद्योगपति आणि व्यापारी ह्यांचा भरणा आहे. ह्या "होशी" बँकवाल्यांनी संपाचा उपयोग करून आपापल्या उद्योगधंद्यातील कामगारांना संपाविरुद्ध याद राखण्याचा इषाराच देण्याची संधि साधली असा बँकेतील अधिकाऱ्यांचा ग्रह झाला. कारण बँकातील संपाबाबत उद्योगपतीनी व व्यापाऱ्यांनी ताठर भूमिका स्वीकारलेली होती. कारखानदारांनी संपावर गेलेल्या बँक नोकरांना कामावर ठेऊ नये अशा सूचनाही त्यांना करण्यात आल्याची वदंता उठली होती. डलटपक्षी गणक यंत्रांचा व यांत्रिक उपकरणांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यास बँक नोकर अडवणुकीचे व घातपाताचे धोरण स्वीकारत आहेत असा आरोप बँकेचे चालक करू लागले. एका बँकेच्या अध्यक्षाच्या मताने आयर्लंडमधील बँकामधील संप हा त्यांतील कारकुनांनी निश्चयपूर्वक मुद्दाम घडवून आणला होता. आपल्याशिवाय बँका चालू शकत नाहीत हे त्यांना दाखवून द्यावयाचे होते.

सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने संपाचे परिणाम फारसे झाले नाहीत. संपाच्या काळात व्यवहार चालू ठेवण्याच्या दृष्टीने काही नवीन सूचना पुढे आलेल्या नाहीत. संपकालात खाजगी व्यापारी पेढ्यांनी जे नवे गिऱ्हाईक मिळविले ते बहुधा त्यांच्याकडेच राहिले; परंतु बँकिंगच्या दैनंदिन व्यवहारात स्पर्धा करण्याची हृया पेढ्यांची इच्छा दिसून आली नाही. ■ ■


बँकेचे भागधार व ठेवीदार व हितचिंतक यांना यंदांची दिपावली सुखाची जावो.

**दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक-लिमिटेड**

**जमखंडी ( जि. विजापूर )**

**स्थापना : १९४० मुख्य कचेरी! जमखंडी.**

**शाखा :-बनहट्टी.**

लोकांच्या विश्वासास पात्र असलेली
ग्रामीण भागातील जुनी बँक

**[ ३० जून १९६६चे आकडे ]**

◎ वसूल भाग भांडवल :- रु. १,९९,७४०
◎ गंगाजळी व इतर निधि :- रु. ४,५१,३०३
◎ ठेवी सर्व प्रकारच्या रु. २३,५८,६९८
◎ कर्ज व्यवहारातील गुंतवणूक रु. १०,६८,३३१
◎ सरकारी रोखे वगैरेतील गुंतवणूक रु. ६,७५,८१२
◎ ठेवीवरील व्याजाचे दर :- १ ते ७॥ द. द.
◎ डिव्हिडंड :- ६१/२%
◎ ऑडिट वर्ग : "अ"

मध्यवस्तीत स्वतःचे मालकीची भव्य इमारत. सेफ डिपॉझिट व्हॉल्टसची उत्तम सोय व भाडयाचे आकर्षक दर. मार्केट यार्डात स्वतःचे मालकीची प्रशस्त व पुरेशी गोडाऊन्स.

"ठेवीवर आकर्षक व्याज व कर्जावर व्याजाचा माफक दर." हेच आमचे ध्येय

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

म. द. खाडिलकर — मॅनेजर
श्री. म. अथणी — चेअरमन.



**औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. औरंगाबाद.**

टेलिफोन नंबर ४५३ — तारेचा पत्ता
पो. बॉ. नं. ३ — "सहकार बँक"

केन्द्र कार्यालय
गांधी चौक--औरंगाबाद

**बँकेची सर्वसामान्य माहिती २६ ऑगस्ट १९६६**

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. ७८.८८ | ( आकडे लाखात ) |
| गंगाजळी व इतर निधी | १०.०२ | |
| खेळते भांडवल | ७२७.९१ | |
| एकूण दिलेली कर्जे | ६१७.४६ | |
| एकूण ठेवी | १८६.०२ | |

ठेवीचे दर

| | |
|---|---|
| चालू खाते | १/४ टक्का |
| सेव्हिंग्ज खाते | ४ टक्के |
| मुदती ठेवी | ३ १/४ टक्के ते ७ टक्के |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.


बँक आपले मुख्य कार्यालय आणि ३८ शाखाद्वारे जिल्ह्यात कार्य करीत आहे.

डी. ए. कुलकर्णी. बी. ए., एच. डी. सी.. मॅनेजर..
बाळासाहेब पवार चेअरमन..



महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले

**"विजय" नांगर**



वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

**तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्**




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्ट कपल्ड.

शिवाय बोअरिंगचे हॅंड पंप्स्, हॅंड रहाट, इ. इ.

**—न्यू विजय इंडस्ट्रीज लि.—**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

# बँकांची समृद्धी दिसते तेवढी नाही

## ठेवीशीं नफ्याचें प्रमाण घटत चाललें

( श्री. प्रवीणचंद्र व्ही. गांधी, मॅनेजिंग डायरेक्टर, देना बँक लि. )

युद्धोत्तर काळांत बँकिंगच्या व्यवसायाने भारताच्या आर्थिक व औद्योगिक अभिवृद्धीस उत्कृष्ट सहाय्य केलेले आहे. लोकांच्या जवळ अनुत्पादक रीतीने पडून राहिलेला पैसा जमा करून तो उत्पादक कारणी लावण्यांत आला आहे. बँकिंगवरील मर्यादा संभाळून, हिंदी बँकांनी आपले कार्य उत्कृष्ट रीतीने बजावले आहे.

पंचवार्षिक योजना, सरकारने मोठ्या प्रमाणाबर केलेला चलन पुरवठा, बँकांनीं बँकिंगची वाढविलेली सवय, शाखाविस्ताराचे त्यांचे धोरण ह्या सर्वांमुळे ठेवी वाढत गेल्या. कर्ज-पुरवठा वाढत गेला, पूर्वी बँका नसलेल्या ठिकाणीं बँकिंगच्या सोई उपलब्ध झाल्या, बँकांतील नोकर-वर्गाची संख्या झपाट्याने वाढली आणि कारभाराचा खर्च वाढत गेला तरी नफ्याचा आकडाही वाढत गेला.

शेडयूल्ड बँकांकडील ( स्टेट बँक वगळून ) ठेवी १९५५ अखेर ८६४ कोटी रु. च्या होत्या, त्या १९६५ अखेर २,४१८ कोटी रुपयांवर गेल्या: म्हणजे, त्यांत १,५७४ कोटी रुपयांची वाढ झाली. याच मुदतींत त्यांच्या शाखांची संख्या २,०३६ नें वाढली. बँकांचा कर्जपुरवठाही वाढला, एवढेच नव्हे तर नव्या नव्या उत्पादक उपक्रमांना बँका कर्जे देऊं लागल्या. ३१ मार्च, १९५५ अखेरच्या आकडयांप्रमाणे, शेडयूल्ड बँकांनीं ११,२९.३९७ खात्यांवर २,०९४ कोटी रुपयांचे कर्ज दिलेले होते. त्यापैकी १२८७ कोटी रु. ( ६१·५% ) कारखानदारीला मिळाले होते.

हे सर्व आकडे पाहिल्यानंतर सामान्य माणसाला वाटणे स्वाभाविक आहे कीं बँकिंगचा व्यवसाय खूप भरभराटींत आणि प्रचंड नफ्यांत चालू आहे. ही जणू सोन्याची अंडी घालणारी कोंबडी आहे, अशा गैरसमजुतीनें कांहीं जण बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्यात यावे असे आग्रहाने प्रतिपादन करतात. त्यामुळें आपली सर्व आर्थिक दुखणी जादूच्या कांडीप्रमाणें आपोआप थांबतील, अशी त्यांची कल्पना.

आपण काळजीपूर्वक छाननी केली, तर बँकांच्या प्रचंड नफेगिरीबद्दल भ्रम नाहीसा झाल्याविना रहाणार नाही. खरा निकष म्हणजे नफा देण्याची त्यांची पात्रता; ठेवींच्या प्रमाणांत तो मोजला पाहिजे.

ठेवी, कर्जे, खर्च, उत्पन्न, ही सालोसाल वाढत असली, तरी बँकांची नफ्याची क्षमता कमीकमीच होत चालली आहे. भारतातील सर्व उद्योगधंद्यांना भरमसाट नफा होत असतांना त्यांना आर्थिक बळ पुरविणाऱ्या बँकिंगच्या नफ्याचे प्रमाण घटत चाललेले आहे. अखेरीस दिलेले तक्ते हे सर्व स्पष्ट करून दाखवितील.

सत्तावीस बँकांचा एकत्रित विचार करता, १९६० च्या मानाने ठोक उत्पन्न १४८% वाढूनही त्याच्याशी पडणारे निव्वळ नफ्याचे प्रमाण स्टेट बँकेच्या बाबतीत ९% चे ५%, पाच बड्या बँकांचे बाबतींत ७% चे ६% आणि मध्यम व लहान आकाराच्या बँकांच्या बाबतींत ६% चे ४% वर आले आहे. सर्वांचा एकत्रित विचार करता, निव्वळ नफ्याचे ठेवीशी पडणारे प्रमाण ०·३५ चे ०·३० वर उतरले आहे. ह्याचा अर्थ असा की, देखाव्यापेक्षा वस्तुस्थिति वेगळी आहे. विस्ताराच्या गतीप्रमाणे खर्चातही वाढ होऊन, व्याज ज्यास्त द्यावे लागून, बँकिंगच्या व्यवसायाची शक्ती कमी झाली आहे.

आपले व्यवहार वाढत आहेत, नफ्याचा आकडा वाढत आहे, ह्या आनंदात प्रत्यक्ष बँकर्सनाही खऱ्या परिस्थितीची नीटशी जाणीव नाही. नफ्याच्या आकड्यापेक्षा नफ्याची क्षमता महत्वाची आहे, हे विसरले जाते. बँकर्सनी वेळीच जागे होऊन ह्या प्रश्नाकडे काळजीपूर्वक लक्ष देणे अगत्याचे आहे. ह्या संबंधात खालील गोष्टींकडे लक्ष वेधू इच्छितोः—

### व्याजाचे दर

ठेवीवरील व्याजाचे दर वाढविलेले आहेत, त्याचा सर्व बोजा कर्जदारावर टाकणे शक्य झालेले नाही. कर्जमागणीच्या मंदीच्या काळात पैसे किफायतशीर गुंतविण्याचा प्रश्न उत्पन्न होतो. ठेवीवरील व्याजाचे दर उतरविण्याकडे तातडीने लक्ष पुरविणे अगत्याचे आहे.

### शाखाविस्ताराच्या खर्चाचे भांडवली खर्चांत रूपांतर

नव्या शाखा काढणे ही फार खर्चाची व परिश्रमाची बाब आहे. परंतु, राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने ग्रामीण भागात व जेथे शाखा नाहींत अशा ठिकाणी शाखा उघडणे जरूरीचे आहे; तसे राष्ट्रीय धोरणच आहे. नव्या शाखा उघडताना बँका बऱ्याच वेळा मोठा धोका पत्करीत असतात. औद्योगिक क्षेत्रांत डेव्हलपमेंट रिबेटची जशी योजना आहे, तशी बँकिंग क्षेत्रातही हवी; नव्या शाखा उघडण्यावर होणारा खर्च भांडवली खर्च समजला जाऊन तो लिहून टाकण्यास चार-पाच वर्षांची सवड मिळावी. ग्रामीण भागांत नव्याने उघडलेल्या शाखेस पहिली काही वर्षे तरी लेबर अवार्ड किंवा करार लागू होऊ नये. त्यामुळे नव्या शाखेवरील पगार-खर्चात बचत होईल. अशा रीतीने बँकांना उत्तेजन मिळाले, तर शाखाविस्तारास प्रोत्साहन मिळेल आणि किफायतशीरपणावर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

### अंतर्गत गंगाजळी

अनपेक्षित गोष्टींना आणि संभाव्य मंदीला तोंड देता येण्यासाठी बँकांनी अंतर्गत गंगाजळी निर्माण करणे आवश्यक असते. पाश्चिमात्य प्रगत देशातील बँकांनी निर्माण केलेल्या गुप्त रिझर्व्हजशी तुलना करता आणि निर्दोष बँकिंगच्या दृष्टीने विचार करता, हिंदी बँकांनी निर्माण केलेले गुप्त रिझर्व्हज आणि त्यांत वर्ग केलेल्या रकमांचें निव्वळ नफ्याशी प्रमाण भारतात अपुरे आहे, असे दिसून येते. दरसाल अंतर्गत रिझर्व्हजमध्ये भर घालावयाची असल्यास बँकांची नफा मिळविण्याची क्षमता वाढवावयालाच हवी. स्टॅच्युटरी रिझर्व्हज आणि गुप्त रिझर्व्हज ह्यांत वर्ग करण्यांत येणारा नफा करपात्र असणे जरूर आहे; त्यामुळे रिझर्व्हज मजबूत करण्यास बँकांना उत्तेजन मिळेल. ह्याला पर्याय म्हणजे रिझर्व्ह बँकेनें तिच्याकडे ठेवण्यात येणाऱ्या स्टॅच्युटरी शिलकांवर चालू दराने व्याज द्यावे आणि हें व्याज बँकिंगची मजबुती वाढविण्याच्या दृष्टीने रिझर्व्हजमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

### पगाराचा उत्पादकतेशी मेळ

पगारांचे वाढते मान, ही बँकिंगच्या व्यवसायाची आणखी एक डोकेदुखी आहे. इष्ट दर्जाचे वेतन आणि बँकिंग व्यवसायाच्या प्रगतीत व उत्कर्षांत भागीदारी कर्मचाऱ्यांना जरूर मिळायला पाहिजे; पण अधिक कार्यक्षमता आणि अधिक उत्पादन ह्यांचे द्वारा बँकिंग व्यवसायास परतफेड करण्याचीहि त्यांचेवर नैतिक जबाबदारी आहे हे त्यांनी विसरून चालणार नाही. कारखानदारीत उत्पादकता मोजता येते तशी ती बँकिंगच्या व्यव-

# शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें

भारतांतील निरनिराळ्या राज्यांमधून वीज निर्मितीच्या योजना कार्यवाहीत आल्यामुळें शेती आणि औद्योगिक प्रगतीचीं नवीं क्षितिजें खुलीं झालीं आहेत. आज खेड्यापाड्यांतून शेतीसाठीं लिफ्ट इरिगेशन, शहरी व ग्रामीण पाणी पुरवठा व इतर लहानमोठ्या उद्योगधंद्यांना लागणाऱ्या पाण्याचा पुरवठा किर्लोस्कर पंपिंग सेटस कार्यक्षमतेनें करूं शकतात. आपल्या योजनेसाठीं कोणता किर्लोस्कर पंप सेट निवडावा याबाबतचा तांत्रिक सल्ला आपल्याला आमचेकडून विनामूल्य मिळूं शकेल.






वैशिष्ट्यें:

- डबल सक्शन
- मजबूत बांधणी व दीर्घकाल टिकाऊ
- कार्यक्षम व काटकसरी
- झीज कमी व दुरुस्तीस सोपा

किर्लोस्कर



टाइप "यूपी"
५ ते २०० हॉ. पॉ. पंपिंग सेट

## किर्लोस्कर ब्रदर्स लि.

किर्लोस्करवाडी, जिल्हा सांगली

STUSA KM 17/63

शायात योजना येणे कठीण आहे. ही एक मोठीच अडचण आहे. कर्मचाऱ्यांच्या मनालाच ती माहीत असते. कर्तव्यबुद्धी आणि व्यापक दृष्टीची स्वार्थदृष्टी असणाऱ्या कर्मचाऱ्याला नेमके काय हवे हे सहज समजू शकेल. पगाराचा उत्पादकतेशी आणि नफ्याच्या क्षमतेशी संबंध जोडणे बँकिंगच्या व्यवसायालाही शक्य व्हावे.

### बँकांचे सर्व्हिस चार्जेस

सर्व उद्योगधंद्यातून सर्व्हिस चार्जेस लावण्यात येतात; मग बँकांनीच आपल्या गिऱ्हाइकांसाठी मोफत अथवा तोटा सोसून सोई-सवलती का द्याव्यात ? सध्याच्या सर्व्हिस चार्जेसची छाननी करून ते योग्य तेथे वाढविण्यात यावेत; त्यासाठी येणारा खर्च, बँकांना त्यासाठी करावी लागणारी मेहनत आणि घ्यावी लागणारी दक्षता, ह्यास ते चार्जेस साजेसे असावेत

चलनवाढीमुळें बँकांना प्राप्त झालेला चलतीचा काळ संपत येत आहे. ह्यापुढील काळ सोपा नाही; तो बँकर्सचा कस पाहाणारा ठरेल. तेव्हां, झालेल्या उत्कर्षाबद्दल समाधान मानून आराम करण्याजोगी परिस्थिती रहाणार नाही. हिंदी आर्थिक व्यवस्थेला फार मोठ्या दिव्यातून जावे लागणार आहे; स्वयंचलित स्वयंपूर्णता आपणास गाठावयाची आहे. बँकांना ह्या बाबतीत महत्त्वाची कामगिरी बजावावी लागणार आहे, पण बँकांची मजबुती वाढून नफा मिळविण्याची शक्ती कायम राहिली तरच हे शक्य होईल. नफ्याची घसरगुंडी थांबविली पाहिजे; कर आणि बोनस देऊन ठेवींच्या ०·७५% नफा मिळविण्याचे आपले अंतिम ध्येय हवे. आज त्या नफ्याचे प्रमाण ०·३० % आहे.

### ठेवी आणि कर्जे
(आकडे कोटी रुपयांचे)

| वर्ष | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|
| १९६० | १८०७ | ११३० |
| १९६१ | १८३५ | १२७७ |
| १९६२ | २०३९ | १४२१ |
| १९६३ | २२५३ | १५८० |
| १९६४ | २५२४ | १८११ |
| १९६५ | २८८७ | २१०४ |

### एकूण ठोक उत्पन्न

| | १९६० | १९६५ | वाढ |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २० कोटी | ४४ कोटी | १२५% |
| पाच बड्या बँका | ३३ कोटी | ७७ कोटी | १३५ |
| मध्यम आठ | १७ कोटी | ४१ कोटी | १४६ |
| लहान सहा | ४ कोटी | ९ कोटी | १४८ |
| सात सबसिडिअरीज् | ५ कोटी | १५ कोटी | १८७ |

### ठेवींशीं ठोक उत्पन्नाचे प्रमाण %

| | १९६० | १९६५ |
|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ३ | ६ |
| पाच बड्या बँका | ५ | ७ |
| मध्यम आठ | ६ | ७ |
| लहान सहा | ६ | ७ |
| सात सबसिडिअरीज् | ५ | ७ |

### निव्वळ नफा आणि त्याचे ठेवींशी प्रमाण

| | एकूणशी प्रमाण | | % वाढ | ठेवींशी प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|
| | १९६० | १९६५ | १९६०–१९६५ | १९६० | १९६५ |
| स्टेट बँक | ३० | २२ | + १४ | + ०·३१ | ०·२७ |
| बड्या पाच | ४४ | ४९ | + ८८ | + ०·३७ | ०·३९ |
| मध्यम आठ | १८ | २० | + ५९ | ०·३६ | ०·२९ |
| लहान सहा | ३ | ४ | + ६१ | ०·४० | ०·३१ |
| सात सबसिडीअरीज् | ५ | ५ | + ५७ | ०·३३ | ०·२६ |


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक !

**सारस्वत**

**को–ऑपरेटिव्ह बँक लि.**

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगाव मुंबई ४.

★

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | .... रु. ११·९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | .... रु. १६·०८ ,, |
| ठेवी | .... रु. ४३८·०२ ,, |
| खेळते भांडवल | ... रु. ४९०·७३ ,, |

★

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक–गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

दसऱ्याचे सुमुहूर्तावर

५१ व्या वर्षांत पदार्पण

**दि सांगली बँक लिमिटेड**

शेडयूल्ड बँक. (स्थापना १९१६)

रजि. ऑफिस : राजवाडा चौक, सांगली

गेली ५० वर्षे जनतेकडून मिळालेल्या सक्रिय सहकार्याबद्दल बँक सर्वांची ऋणी आहे. सुवर्ण महोत्सवाचे निमित्ताने ठेवलेल्या विशेष आकर्षक ठेवींचे व व्याजाचे योजनांचा जनतेने जरूर लाभ घ्यावा अशी नम्र प्रार्थना. सविस्तर माहितीसाठीं आमच्या ४३ शाखांपैकी कोठेही चौकशी करावी.

एम्. के. गुप्ते
M.A.LL.B., C.A.I.I.B.
जनरल मॅनेजर

## सोलापूर शहरांतील नागरी सहकारी बँक

### दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

स्थापना – ६-६-१९२९

हेड–ऑफिस— नवी पेठ, फोन नंबर ३१७

शाखा—साखरपेठ　(२) अक्कलकोट.

फो. नं. १४२

| | रु. |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० |
| वसूल भांडवल | १,९०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | १,००,९५४ |
| ठेवी | १९,४६,८२५ |
| एकूण खेळते भांडवल | २२,३७,७७९ |

डिव्हिडंड सन १९६५–६६ सालाकरिता ७॥ टक्के प्रमाणे. आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात. सोने–चांदीच्या जिनसांच्या, व्यापारी मालाच्या व मुदत ठेव व गव्हर्नमेंट सिक्यु. तारणांवर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

(१) श्री. ति. वा. बोळा, प्रेसिडेंट (२) श्री. कृ. गो. जानकर ऑ. मॅ. डायरेक्टर (३) श्री. ग. रा. बाळी (४) श्री. मा, ह. कौंतम (५) श्री. ग. रा. खडकीकर (६) श्री. वा.द. आराध्ये (७) श्री. सि. भा. अच्युगटला (८) श्री. सा. ह. साळुंके (९) श्री. ना. वि. उदगीकर.

मॅनेजर—के. एल सिद्धम.

---

## दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

(रजिस्टर्ड ऑफिस : मिरज)

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९२९

| | | |
|---|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : | रुपये सहा लाख |
| खेळते भांडवल | : | रुपये सवा कोटीच्या वर |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : | रुपये सात लाखांच्या वर |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

सेव्हिंग्ज बँक खाते ... व्याज ... ४%

| मुदत ठेव | | दरसाल दरशेकडा व्याज |
|---|---|---|
| (१) मुदत ९१ दिवस | ... | ... ६ % |
| (२) मुदत सहा महिने | ... | ... ६¼% |
| (३) मुदत नऊ महिने | ... | ... ६½% |
| (४) मुदत एक वर्ष | ... | ... ७ % |
| (५) मुदत दोन वर्षे | ... | ... ७⅛% |
| (६) मुदत तीन वर्षे | ... | ... ७½% |
| (७) मुदत चार वर्षे | ... | ... ७½% |
| (८) मुदत पाच वर्षे | ... | ... ७¾% |
| (९) मुदत ६, ७, ८ वर्षे | ... | ... ७¼% |

हेड ऑफिस मिरजमध्ये सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा : **सांगली (गणपती पेठ), सांगली (मार्केटयार्ड) कुर्डुवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा, लक्ष्मेश्वर, माढा व सांगोला.**

के. डी. शिराळकर　　श्री. एन्. पी. कानिटकर
मॅनेजर.　　ॲडव्होकेट, चेअरमन

---

## दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.

### हुपरी (जिल्हा कोल्हापूर)

— अ वर्ग —

★

स्थापना २४–१–५० = र. नं. १८३१०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. | २,२८,०५० |
| फंड्स | रु. | १,४३,७२६ |
| खेळते भांडवल | रु. | २१,९८,९३३ |

बँकेने स्वतः पैसाफंड मिश्रखत उत्पादन करून, भागीदारांना पुरविले आहे.

तसेच

सामुदायिक मोफत लग्न समारंभाची प्रथा निर्माण केली आहे.

अ.बा. नाईक　　एल. वाय. पाटील
मॅनेजिंग डायरेक्टर　　चेअरमन

---

## रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड

आपल्या १८ शाखा व उपशाखांचे द्वारे जिल्ह्याचे सेवेमध्ये सदैव रत आहे.

मुख्य कार्यालय : गुरुकृपा, महात्मा गांधी रोड, रत्नागिरी.

— : सांपत्तिक स्थिती : —

| | | रु. |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | १६,१८,१०० |
| खेळते भांडवल | ... | २,४६,८८,०६९ |

बँकिंगची सर्व प्रकारची कामे केली जातात.

**जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे एकमेव बँकर्स**

राज्य सरकारच्या आदेशानुसार म्युनिसिपल कौन्सिल, शैक्षणिक संस्था, पब्लिक ट्रस्ट, वगैरेंच्या ठेवी स्वीकारण्यास मान्यता मिळालेली आहे.

—:जिल्ह्यांतील अग्रेसर सहकारी बँक:—

म. चिं. सांखळकर,　म. स. साळवी,　शा. ल. पेजे
मॅनेजर　व्हा. चेअरमन　चेअरमन

# लोकसंख्येची भीषण पडछाया

जगातील एकूण लोकसंख्येपैकी दोन तृतीयांश लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही, ही वस्तुस्थिति आहे. त्यांना इतक्या कमी अन्नावर जगावे लागते की, त्यांची गणना उपयुक्त नागरिकांत करणेच चुकीचे ठरेल. दर वर्षी सुमारे अडीच कोटी लोक अपुऱ्या अन्नाच्या परिणामानें मृत्युमुखी पडतात. लोक गरीब असल्यामुळे ते भुकेले रहातात; दारिद्र्यामुळे त्यांना बचत करता येणे अशक्य असते; पैसे वाचले नाहीत तर भांडवलाची वाढ होऊ शकत नाही; भांडवलाच्या अभावी शेती आणि उद्योगधंदे ह्यांचा पाया विस्तारता येत नाही, त्याच्या अभावीं लोकांना काम मिळू शकत नाही. अशा रीतीने दारिद्र्य कायमच रहाते. ह्या दुष्ट चक्रातून वाट काढण्याचा प्रयत्न कित्येक देशातून करण्यात येत आहे; पण लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळे तो प्रयत्न विफल ठरत आहे. विकासाच्या योजना जननसंख्यावाढीमुळे पार कोसळून पडतात.

१९६४ मध्ये जगाची लोकसंख्या ३२० कोटी होती. त्यात दरसाल सहा कोटींची भर पडत आहे. ह्या गतीने जगाची लोकसंख्या वाढत गेली, तर इ. स. २००० चे सुमारास ती ६०० कोटींचे घरांत जाईल. औद्योगिक देशांतील जननांचे प्रमाण मृत्यूच्या प्रमाणापेक्षा किंचित अधिक आहे; पण विकसनशील देशांतील मृत्यूंचे प्रमाण कमी होत आहे आणि जननाचे प्रमाण मात्र पूर्ववत् कायमच आहे. १९६० मध्ये जपान सोडून आशियां, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील लोकसंख्या १४० कोटी होती. १९८० मध्ये ती २३० कोटी होईल; म्हणजे दोन दशकांत लोकसंख्या ९० कोटींनी वाढेल. काही देशांतून लोकसंख्येची स्फोटासारखी वाढ होत आहे. उदाहरणार्थ, भारतामधील लोकसंख्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या पहिल्या १० वर्षांत ४ कोटींनी वाढली. लोकसंख्येची ही वाढ आणि तिचे परिणाम ह्यांची कारणे मात्र चमत्कारिक वाटण्यासारखी आहेत. नवीनवी रोगप्रतिबंधक औषधे आणि आरोग्यदायक भौतिक परिस्थितीं ही त्याची कारणे आहेत. अर्थात्, ह्या शास्त्रीय शोधांचा फायदा घेऊ नये असा मात्र अर्थ नाही. ख्रिस्ताच्या जन्माच्या काळांत दरसाल सुमारे ६० कोटी मुले जन्माला येत होती, असा अंदाज आहे. त्यापैकी निम्मी अल्पवयांतच मृत्युमुखी पडत; आज अवघी १० टक्के बाल वयांत मृत्यू पावतात. बालमृत्यू कमी करण्याच्या बाबतीत पिण्याच्या पाण्याची सोय, संसर्गजन्य रोगांचा प्रतिकार आणि मुलांची अधिक चांगली काळजी ह्या बाबी महत्त्वाच्या आहेत. विकास आणि नियोजन करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हे लक्षात येऊ लागले आहे की, नवीन औद्योगिक प्रकल्प स्थापन करतांना सामाजिक उपयुक्ततेच्या संघटनाही उभारण्यात आल्या पाहिजेत. कारखान्याबरोबरच आरोग्यकेंद्रे, प्रथमोपचार केंद्रे आणि बालरक्षक विभाग ह्यांचीही स्थापना झाली पाहिजे. अल्प वयांत येणाऱ्या मृत्युविरोधी मोहिमेला सीलोन देशात लक्षात भरण्यासारखे यश आले आहे. सीलोनमध्ये हिवतापाविरूद्धची मोहीम इतकी कसोशीने पार पाडण्यात आली की, १० वर्षांच्या अवधींत मृत्यूचे प्रमाण निम्म्याने कमी झाले. वैद्यकीय शास्त्र, आरोग्य शास्त्र आणि आधुनिक रसायन विद्या ह्यांच्या साह्याने अनेक लोकांना रोगरहित भविष्यकालाची आशा वाटू लागली आहे ह्यात शंका नाही. पण, दारिद्र्य आणि भूक ह्यापासून मुक्त असलेल्या भविष्यकालाची ग्वाही मनुष्यजातीला शास्त्र अद्याप देऊ शकलेले नाही. जगातील अन्नपदार्थ आणि कच्चा माल व लोकसंख्येची होणारी वाढ ह्यांच्यात समतोल राखण्याचे आतापर्यंत शक्य झालेले आहे. ह्या बाबतीत पुन्हा भारताचेच उदाहरण पहाण्यासारखे आहे. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात राष्ट्रीय उत्पन्न १० टक्क्यांनी वाढले. पण त्याच अवधीत लोकसंख्येची वाढही निदान १० टक्क्यांनी तरी झाली; ह्याचा अर्थ असा की, भारताची आर्थिक स्थिती सुधारली नाही. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भागांतील अनेक राजकारणी लोकांपुढे हाच प्रश्न उभा आहे. प्रत्येक मिनिटाला १०० मुले जन्म पावत आहेत ही मुले म्हणजे एक मोठी समस्याच आहे. अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, शांतता राखण्याइतकीच हीही फार मोठी समस्या मनुष्यजातीपुढे ठाकलेली आहे.

मुलांच्या ह्या संपत्तीच्या बाबतीत काय करावयाचे ते तातडीने करणे आवश्यक आहे. कारण, आता वेळ फार उरलेला नाही. उपाययोजना त्वरित आणि जोराची झाली नाही तर पुढच्या दशकाच्या आरंभकालातच जगाच्या फार मोठ्या भागातील कायदा आणि सुव्यवस्था भुकेचे भक्ष्य झाल्याशिवाय राहणार नाही. पण ह्या बाबतीत काय करता येईल ? जननाचे प्रमाण घटविण्याचा सर्वांत प्रभावी आणि उघड उघड सुचणारा एकमेव उपाय म्हणून संतति–नियमनाबद्दल आज सर्व जगभर जोराची चर्चा चालू आहे. प्रत्येक कुटुंबाने माणसाला शोभणाऱ्या परिस्थितीत जितक्या मुलांचे संगोपन करता येईल तितकीच मुले जन्माला घालावीत, ह्या मूलभूत तत्त्वाबद्दल मतभेद राहिलेला नाही; परंतु एखाद्या देशाचे सरकार आपल्या प्रजाजनांना ह्या बाबतींत मार्ग दाखवील की नाही हे सांगता येणार नाही. कारण, ह्या बाबतीतील निर्णय ह्या प्रत्येक देशाची परंपरा, धार्मिक समजुती आणि नैतिक कल्पना ह्यावर अवलंबून असतो. आतापर्यंत जपान व भारत हे दोनच देश असे सांगता येतील की, त्यांनी ऐच्छिक निर्बिजीकरणाला प्रोत्साहन दिलेले आहे. बहुतेक इतर अविकासित देशात संततिनियमनाचा प्रसार फारसा प्रगती करीत नाही. म्हणून जननाचे प्रमाणही फार अल्प गतीने कमी होईल आणि १९८० च्या सुमारास त्याचा फारसा परिणाम दिसून येणार नाही. आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका ह्या भागातील सर्वसामान्य कुटुंबे, मुले ही दैवाची देणगी आहे असेच अजूनही मानतात. शिवाय, बरेच आईबाप पुष्कळ मुले असणे ही म्हातारपणची काठी व दारिद्र्याविरुद्ध उतरलेला विमा आहे अशा विचाराने स्वतःचे समाधान करून घेतात. अफाट लोकसंख्या आणि दारिद्र्य ह्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्याचा एकच एक यशस्वी मार्ग म्हणजे अधिक अन्न निर्माण करणे हा आहे, ह्याबद्दल सर्व तज्ज्ञांचे एकमत आहे. अविकसित देशातून १९७५ च्या सुमारास होणाऱ्या वाढत्या लोकसंख्येची तरतूद करणे शक्य आहे; पण त्यासाठी ह्या देशांनी आपले अन्नाचे उत्पादन ४ टक्क्यांनी वाढविणे अगत्याचे आहे. परंतु, गेल्या पांच वर्षांच्या कालांत ह्या देशांतील अन्नपदार्थांचे उत्पादन फक्त अडीच टक्क्यांनीच वाढलेले आहे. ह्याचा अर्थ असा की, शेती आणि उद्योगधंदे ह्यांचा विकास साधण्याचे उपाय सर्व जगभर तातडीने अंमलात आणले गेले पाहिजेत. पण, ह्यासाठी द्यावयाची मदत वाटेल तशी सरसहा देऊन चालणार नाही. जगांतील काही विभागांवर ती केंद्रित करण्यात आली पाहिजे. कारण, भुकेची आग ही सर्व जगावर सारखीच पसरलेली नाही. ज्या ठिकाणी, देशाच्या एकूण श्रम करू शकणाऱ्या माणसांपैकी ७० ते ८० टक्के माणसे शेतीत गुंतलेली असतात अशा ठिकाणी भुकेचा वणवा बहुधा आढळून येतो त्यातही ज्या देशांतून ५ हजार वर्षांपूर्वीची अवजारे व हत्यारे आजही वापरण्यात येतात, त्या देशांतून भूक भडकलेली दिसून येते. ह्या देशांना सर्वांत अधिक मदत देण्यात आली पाहिजे.

ॲमेझॉन नदीच्या जंगलापासून तो तहत गोबीच्या वाळवंटापर्यंत अन्नाची पैदास वाढविण्याच्या दृष्टीने पुष्कळ काम करण्यात

## काशीस जावे — नित्य वदावे

असं म्हणत असतानासुद्धा तीर्थक्षेत्राचे दर्शन घेण्याची तुमची इच्छा कदाचित् अपुरीच राहून जाईल. यासारख्या कार्याकरिता, तुम्ही योजनाबद्ध बचत कराल तर ते यथाकाली सहज शक्य होईल.

बचतीकरिता

**दि विटा मर्चन्टस् को-ऑ. बँक लि. विटा**

बँकेतच खाते सुरू करा.

## दि विटा मर्चन्टस् को-ऑपरेटिव्ह बँक लि., विटा, जि. सांगली

आपले सेवेसाठी आतुर आहे.

**प्रमुख वैशिष्ठ्ये :**

१) बँकेने नवीन वाढविलेले व्याजाचे आकर्षक दर.
२) आकर्षक बचत योजना अर्थात् "जनता ठेव".
३) अल्प भाड्यात लॉकर्सची सोय.
४) महिलांचेसाठी, महिला ठेवीची उपयुक्त योजना.
५) सर्व प्रकारच्या व्यापार व छोटे उद्योगधंदे यांना आर्थिक सहाय्य. ६) बँकिंगचे सर्व व्यवहार. याशिवाय

**ह स त मु ख से वा**

आपले नम्र,

| व. का. बोबडे | च. ग. शहा | स. वि. कोरे |
|---|---|---|
| B. A. (Hon.) B. Com. | | |
| मॅनेजर | चेअरमन | प्रेसिडेंट |



शेती सुधारण्याकरिता व पर्यायाने आर्थिक पातळी उंचावण्याकरिता सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आशास्थान असलेली

## सोलापूर जिल्हा सहकारी भूविकास बँक लि., सोलापूर

र. नं. २४९३० दि. १-१-१९५९

शाखा:—अक्कलकोट, मंगळवेढा, मोहोळ, अकलुज, बार्शी व पंढरपूर.

१) वसूल झालेले भाग भांडवल ... रु. ३४ लाख, ८४ हजार
२) खेळते भांडवल ... रु. ३ कोटी, २३ लाख
३) सभासद संख्या ... १५६६५
४) आतापर्यंत वाटलेली कर्जे ... रु. ३ कोटी, ७७ लाख

| नवीन विहिरी | जुन्या विहिरी | ऑईल इंजिन्स व पंपिंग सेटस |
|---|---|---|
| ७,४५५ | २,५०२ | ४,१५० |

वरील तगाई योजनेशिवाय जमीन सुधारणा, जमीन खरेदी, जुने कर्ज निवारण, ट्रॅक्टर खरेदी, वगैरेसाठीही अल्प दराच्या व्याजात दीर्घ मुदतीचे कर्ज देते.

बँकेच्या आर्थिक मदतीने सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६० हजार एकर जिराईत जमिनीचे बागाईत जमिनीत रूपांतर होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनात सुमारे ६० लाख रुपयांची वाढ झालेली आहे.

| स. ता. पांगळ | शंकरराव नारायणराव मोहिते-पाटील |
|---|---|
| बी. ए., जी. डी. सी. अँड ए. | एम्. एल्. ए. (अकलूज) |
| व्यवस्थापक. | अध्यक्ष. |



सहकारी तत्त्वावर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विशेषतः शेती, मच्छिमारी व फळ बागायतीचे विकासासाठी सदैव निष्ठेने झटणारी व जिल्ह्यातील सर्व थरातील लोकांचा अपार विश्वास संपादणारी जिल्ह्याची अग्रगण्य सहकारी संस्था.

## रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड

१८ शाखा व उपशाखांचे द्वारे जिल्ह्याचे सेवेमध्ये सदैव रत.

मुख्य कार्यालय : गुरुकृपा, महात्मा गांधी रोड; रत्नागिरी

शाखा : (१) सावंतवाडी, (२) कुडाळ, (३) वेंगुर्ला, (४) मालवण, (५) कणकवली, (६) देवगड, (७) राजापूर, (८) लांजा, (९) रत्नागिरी शहर शाखा, (१०) देवरूख, (११) चिपळूण, (१२) गुहागर, (१३) खेड, (१४) दापोली, (१५) मंडणगड, (१६) उपशाखा : दाभोळ, (१७) उपशाखा : खारेपाटण, (१८) उपशाखा : आचरा.

चेअरमन : श्री. शां. ल. पेजे, बी. ए. (एम्.एल्.ए.) रत्नागिरी
व्हा. चेअरमन : श्री. म. स. साळवी, रत्नागिरी

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १६,६८,१०० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २,८१,६७७ |
| ठेवी | रु. | १,८८,७०,५४५ |
| खेळते भांडवल | रु. | २,४६,८८,०६९ |

बँकिंगची सर्व प्रकारची कामे अगत्यपूर्वक केली जातात.

म. चिं. साखळकर,
बी.ए. (ऑनर्स), एच्.डी.सी., जी.डी.सी. ॲण्ड ए.
मॅनेजर



सुवर्ण महोत्सवाची वाटचाल करणारी

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., कराड

**ही दिवाळी आमचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना यशाची व भरभराटीची जावो.**

अध्यक्ष : श्री. विश्वनाथ कृष्णराव तांबवेकर
बी.ए., एलएल्. बी.

| | रु. |
|---|---|
| खेळते भांडवल | ७९,९५,००० |
| ठेवी | ६५,६०,००० |
| रिझर्व्ह व इतर निधी | १०,९५,००० |

सतत ३५ वर्षापेक्षा जास्त 'अ' वर्ग.
सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात.

| | |
|---|---|
| कराड | शं. पु. कुलकर्णी |
| १७-१०-१९६६ | मॅनेजिंग डायरेक्टर |

आले आहे. अनेक ठिकाणी धरणे बांधण्यात आली आहेत; वीज निर्मितीची केंद्रे उभारण्यात आली आहेत आणि कालवे खोदण्यात आले आहेत. ही विकासाची कामे जितकी योग्य ठिकाणी करण्यात येतील आणि त्यांचा वापर जितका चांगला करण्यात येईल, तितक्या प्रमाणांत शेतीचे उत्पादन वाढविण्यात यश येत जाईल. अविकसित देशांत ओलिता खालीं असलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ३३ कोटी, ३५ लाख, ८५ हजार एकर आहे. पण त्यापैकी ८ कोटी, ६४ लाख, ८५ हजार एकर जमिनीलाच पुरेशा प्रमाणांत पाणी मिळण्याची सोय आहे. त्यामुळे एवढयाच जमिनीत अन्नधान्याची वाढ होणे शक्य आहे सुमारे २९ कोटी, ६५ लाख, २० हजार एकर शेतजमिनीला खताचा पुरवठा पुरेसा होत नाही. ह्याचा अर्थ थोडक्यात असा की अविकसित देशांतील भरमसाठ लोकसंख्या आणि दारिद्र्य ह्यांच्या दुष्टचक्राची पाळेमुळे त्या त्या देशांच्या आर्थिक समस्यांशी निगडित झालेली आहेत. मेक्सिको हा देश ह्या बाबतीत उदाहरणादाखल घेता येईल. १९३० ते १९६० च्या दरम्यान मेक्सिकोची लोकसंख्या दुपटीने वाढली. ह्या कालखंडात लोकांना पुरेसे अन्न पुरविणे इतके बिकट झाले होते की १९५२ साली त्या देशाला ४ लाख टन अन्नधान्याची आयात करावी लागली. त्यापैकी काही धान्य अमेरिकेने देणगी म्हणून दिले. पण मेक्सिकोच्या सरकारने अद्यावत शेतीच्या पद्धतीचे ज्ञान करून घेतले आणि आपला अन्नाचा प्रश्न सोडविला. दलदलीच्या प्रदेशांतून पाण्याचा निचरा करण्यात आला, रस्ते बांधण्यात आले आणि पाटबंधाऱ्याची कामे पुरी करण्यात आली. १९५० ते १९६० च्या दरम्यान मेक्सिकोची लोकसंख्या आणखी ३० टक्क्यांनी वाढली; पण त्याच कालांत गव्हाचे उत्पादनही चौपटीने वाढले. मेक्सिकोची सूत्रे आज ज्यांच्या हाती आहेत त्यांना आता अशी खात्री वाटत आहे की पुढच्या १० वर्षांत लोकसंख्येची जी वाढ होईल तिला पुरण्याइतके अन्न मेक्सिकोंत उत्पादन करण्यात येईल. तथापि, मेक्सिकोने योजलेल्या आर्थिक उपायांत काहीं विशेष सामर्थ्य आहे असा मात्र ह्याचा अर्थ नाही. ह्या बाबतींत इतर देशांतही अभिमान वाटण्यासारखी कामगिरी केलेली आहे. मेक्सिकोने आर्थिक उपायांची शिक्षणाशी जी सांगड घातली ती मात्र लक्षांत घेण्यासारखी आहे. जमीन-धारणेच्या कायद्यात सुधारणा करतानांच नव्या ग्रामीण परिस्थितीशी मुकाबला करू शकतील असे शिक्षण घेतलेले शेतकरी मुद्दाम शिकविण्यात आले. मेक्सिकोच्या अंदाजपत्रकांत अधिक उच्चतर ज्ञानाने कारभार चालविण्याच्या तत्वाला प्राधान्य देण्यात आलेले आहे. १९६४ सालच्या अंदाजपत्रकांत १६०० कोटी पेसॉसच्या एकूण खर्चापैकी ४०० कोटी पेसॉस शिक्षण खात्यासाठी मंजूर करण्यात आले. मेक्सिकोत निरक्षरतेचे जवळ जवळ उच्चाटन करण्यात आलेले आहे असे असले तरी मेक्सिकोने मुकेशी जी शर्यत चालविली आहे, तिची पुनरावृत्ति इतरत्र करता येणार नाही. कारण, प्रत्येक देशाला त्या देशाइतकी खनिज संपत्ति आणि तसेच हवापाणी ह्यांची देणगी मिळालेली नाही. परंतु एका बाबतींत मात्र मेक्सिकोचा धडा इतर देशांनी गिरविण्यासारखा आहे. आर्थिक प्रगतिची स्थानिक परिस्थितीशी सांगड घालण्यात आली पाहिजे हे तर खरेच. पण, त्याच बरोबर आर्थिक उपाययोजना आणि शिक्षण ह्यांची जुळणी करण्याचेही तितकेच महत्त्वाचे आहे. जगातील शेतीच्या व्यवसायांकडे नजर टाकली तर असे दिसून येते की ज्या ठिकाणी निरक्षरांची जास्तीत जास्त संख्या असते त्या ठिकाणी शेतीवर कमीत कमी खत वापरण्यात येते. जगांतील लोकसंख्येपैकी जवळजवळ निम्म्या लोकसंख्येला लिहिता आणि वाचता येतं नाही हे लक्षांत ठेवले पाहिजे.

ज्यांना पुरेसे खायला मिळत नाही अशांची जगातील संख्या फार मोठी आहे. तेव्हा ह्या संकटाशी सामना देण्यास माणसाने शिकले पाहिजे असाच ह्याचा अर्थ आहे. अविकसित देशांना जी मदत देण्यात येते तिचा नीट उपयोग होण्यासाठी मदत घेणाऱ्या देशांची स्वतः विचारपूर्वक प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे. सर्वसामान्य शिक्षणाची पातळी वाढविण्यात आली आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले तर आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होण्याची आणि जननांचे प्रमाण घटण्याची चांगली शक्यता आहे. बेलग्रेड येथे १९६५ साली जागतिक लोकसंख्या परिषद भरविण्यात आली होती. त्यात काही तज्ञांनी असे मत व्यक्त केले की, शिक्षणाची व वेतनाची पातळी जसजशी वाढेल तसतशी मुलांची संख्या कमी होत जाते. युरोपमध्ये असे घडून आल्याचा दाखला मिळतो. भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील देशांतून अनेक लोक युरोपातील देशांत जातात व स्थायिक होतात. त्यांच्या मूळच्या देशांत कुटुंबांतील माणसांची संख्या मोठी असते. पण, हे लोक स्वित्झरलँड अगर पश्चिम जर्मनी सारख्या देशांत रुळले की त्यांच्या कुटुंबातही दोन अगर तीन मुलांपेक्षा अधिक मुले दिसून येत नाहींत. भूक आणि दारिद्र्य ह्यांच्या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्याचा मार्ग एकच आहे; आणि तो म्हणजे जननाचे प्रमाण घटविणे. हा मार्ग फार अवघड आणि लांबचा असेलही. पण मनुष्य जातीने आपली सर्व शक्ती एकवटून त्याचा अवलंब केलाच पाहिजे. आता विलंब लावणे परवडण्यासारखे नाही. १९६३ च्या जागतिक अन्न कॉंग्रेसमध्ये प्रेसिडेंड केनेडी ह्यांनी म्हटल्याप्रमाणे ह्या बाबतीत कणखर निश्चयाचीच काय ती आवश्यकता आहे. जगांतील सर्व मुलांचे डोळे चालू पिढीवर खिळून राहिलेले आहेत. ही शांततामय लढाई अधिक नेटाने चालविली जाईल अशी अपेक्षा करण्याचा त्यांना पूर्ण अधिकार आहे.

---


## पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन

### सर्व्हंटस् को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे,

स्थापना १९१४ ] ७३ बुधवार पेठ, पुणे [ फोन नं ५७१५६

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १,५१,००० |
| इन्व्हेस्टमेन्टस् | रु. ६,६२,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. ४,५३,००० |
| ठेवी | रु. ४१,६०,००० |
| खेळते भांडवल | रु. ५७,८०,००० |

**बँकेची वैशिष्ठ्ये**

(१) गेली १५ वर्षे बँक अ वर्गांत आहे. सन १९६५–६६ या अहवालाच्या वर्षी सभासदांना दरसाल दर शेकडा ६.५ टक्के डिव्हिडन्ड व नियमीत व्याज भरणाऱ्या सभासदांना १५ टक्के रिबेट देण्यात आला आहे.

(२) पुणे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बँकेने आपल्या भव्य इमारतीचे बांधकाम सुरू केले असून बँकेची अद्यावत सुखसोयींनी युक्त अशी इमारत लवकरच तयार होत आहे.

(३) बँकेचे ठेवीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| कायम ठेव : मुदत | १ वर्ष | २ वर्षे | ३ वर्षे | ४ वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|---|---|---|
| दरसाल दरशेकडा रु. | ६–०० | ६–२५ | ६–५० | ६–७५ | ७–०० |

सेव्हिंग्ज ठेवीः—दरसाल दरशेकडा चार टक्के

चालू ठेवीः—दरसाल दरशेकडा एक टक्का

हप्तेबंद ठेवीः—दरसाल दरशेकडा पाच ते साडेपाच टक्के

इतर माहितीसाठी समक्ष भेटावे

| ना. कृ. कुलकर्णी | द. ल. भडगावकर, बी.ए. | आ. व. टण्णू |
|---|---|---|
| मॅनेजर | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली.

हायस्कूल रोड, सांगली

फोन नं. — तार : रयत बँक

मॅनेजर : ५४४

अकौन्टंट : ३०

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ७३,३०,९५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४,१४,७७९ |
| ठेवी | रु. | २,६२,५८,९१० |
| खेळते भांडवल | रु. | ६,२२,७२,११० |

१) सांगली जिल्ह्यामध्ये बँकेच्या १९ शाखा कार्य करीत आहेत.

२) सरकारने बँकेचे रुपये १८ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.

३) सहकारी संस्थांना शेतीचे गरजेसाठी प्रामुख्याने कर्जे दिली जातात.

४) कायम ठेव द.सा.द.शे. ४ ते ७–५० टक्के व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

५) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

पंडित भाऊराव ढाकवेकर, मॅनेजर

गुलाबराव रघुनाथराव पाटील, चेअरमन



ही दीपावली व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो ! !

सुखी व समृद्ध भारतीय जीवनाचे स्वप्न साकार करण्याचे कार्यात सदैव तत्पर असलेली व लोकादरास आणि विश्वासास पात्र ठरलेली :—

## कुलाबा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., पेण

मुख्य कचेरी, पेण

तार : सागर बँक — फोन : पेण, ५२

| | |
|---|---|
| एकूण भांडवल | : रु. २६ लाखाचे वर |
| एकूण ठेवी | : रु. १ कोटी ६४ लाख |
| दिलेली कर्जे | : रु. १ कोटी ९० लाख |
| खेळते भांडवल | : रु. २ कोटी ५२ लाख |

आपली ठेव ह्या बँकेतच ठेवा, कारण आपल्या ठेवीचा उपयोग शेती व औद्योगिक विकासासाठी होत आहे, ही गोष्ट आपणांस निश्चितच अभिमानास्पद आहे.

व. त्र्यं. अग्निहोत्री, मॅनेजर — ना. य. नेने, चेअरमन



" दिवाळी अभिष्ट चिंतन "

आपल्या सर्वांच्या आनंदात आम्हीही सहभागी आहोत

## ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, ठाणे

मुख्य कचेरी : १५।४ छत्रपति शिवाजी पथ, ठाणे

दूरध्वनी क्रमांक : ५९१६१८

( जिल्ह्यात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी व अन्य प्रमुख गावी २० शाखा. आणखीही नवीन शाखा लवकरच सुरू होत आहेत )

दि. ३१–८–६६ अखेरची बँकेची सांपत्तिक परिस्थिती

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | ... | रु. २७·६० लाख |
| ठेवी | ... | रु. २८७·४३ लाख |
| कर्जे | ... | रु. २३६·९६ लाख |
| गुंतवणूक | ... | रु. ७२·३७ लाख |
| खेळते भांडवल | ... | रु. ३७१·२७ लाख |

शेती संस्था, सहकारी लहान उद्योगधंदे, मच्छीमार व जंगल कामगार सोसायट्या यांच्या विकासासाठी, अल्पदराने भरपूर प्रमाणात कर्ज पुरवठा केला जातो. आपल्या ठेवी यात्र बँकेत ठेवून, राष्ट्राची सेवा करण्याची आम्हाला संधी द्या. वसूल भाग भांडवलामध्ये सरकारचेही भाग भांडवल असल्यामुळे ठेवीबाबत निश्चित सुरक्षितता.

शा. ह. भिडे, मॅनेजर — वि. द. खाडे, व्हा. चेअरमन — ह. गो. पाटील, चेअरमन



स्थापना : १९०६ — फोन : ५६२८३

## दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड, पुणे २

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे २.

कामाची वेळ सकाळी ९–१५ ते ११–४५

सायंकाळी ५–१५ ते ६–४५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ३,००,००० |
| वसूल झालेले भांडवल | रु. | ३,४४,६९० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २,६७,००० |
| ठेवी | रु. | २७,७१,००० |
| खेळते भांडवल | रु. | ३६,२९,००० |

सल्लागार मंडळ— (१) मा. डॉ. न. का. घारपुरे, अध्यक्ष (२) मा. गं. मो. भणगे, उपाध्यक्ष (३) मा. रा. द. भट (४) मा. द. ग देव (५) मा. वि. ल. हर्डीकर.

कार्यकारी मंडळ—(१) मा. ह. गो. महाजन, कार्याध्यक्ष (२) मा. स. स. देशपांडे, उपकार्याध्यक्ष (३) मा. अ. बा. देहाडराय (४) मा. म. ना. परांजपे (५) मा. डॉ सु. मा. कुलकर्णी (६) मा. डॉ. का. रा. कापरे (७) मा. द. मो. पाटसकर (८) मा. म. ग. खांडेकर (९) मा. म. भ. राडकर (१०) मा. भा. ग. रवडे (११) मा. स. ब. भागवत.

स्थानिक आयव्यय निरीक्षक—(१) मा. के. शं. कुलकर्णी (२) मा. म. ज पेठे

बँकिंगचे व कलेक्शनचे सर्व व्यवहार केले जातात.

य. श्री. शाळीग्राम, कार्यवाह

## अविकसित देशांच्या प्रगतीचे मर्मस्थान : निर्यात

# निर्यात वाढविण्यास भरपूर वाव

आर्थिक विकासाची गति आणि व्याप्ती ठरविण्यात निर्यातीला महत्त्वाचे स्थान आहे. कारण, अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या प्राथमिक अवस्थेत बऱ्याच प्रमाणावर आयातीची गरज असते आणि आयातीची किंमत देण्याचे मार्ग म्हणजे परदेशीय मदत आणि निर्यात हेच असतात. आयतीची किंमत देण्याचा चांगला मार्ग निर्यात हाच होय. अशी किंमत दिल्याने परदेशीय कर्जाचा भविष्यकालीन बोजा वाढत नाही हे तर खरेच. पण, ह्या मार्गाने परदेशीय मदत मिळण्याच्या एकाच पुरवठा मार्गावर अवलंबून राहावे लागत नाही आणि आयात मालाचा दर्जा, किंमत आणि पुरवठा होण्याचा अवधी ह्या बाबतीत आंतरराष्ट्रीय स्पर्धेचाही फायदा घेता येतो. विकासाची पावलें जसजशी पुढे पडत जातात तसतशी आयात मालाऐवजीं देशी माल वापरता येऊ लागतो आणि देशांत होणाऱ्या गुंतवणुकींतील आयातीच्या मालाची घट होऊ लागते. भारताच्या विकासाच्या बाबतीत हे दिसून येते. हिंदच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आयात मालाच्या गुंतवणुकीची टक्केवारी २१.५ होती, ती दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात १४.३ टक्के आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या पहिल्या ४ वर्षांत ११.३ इतकी खाली आली. पण, ह्याचा अर्थ एका विवक्षित कालखंडात आयातीचे प्रमाणच एकंदरीने खाली येते असा नाही. उलट, सतत होत जाणाऱ्या विकासामुळे आयात अधिकच वाढते. फक्त आयात होणाऱ्या वस्तूंचे प्रकार पालटतात. विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत सर्व प्रकारची यंत्रसामुग्री आणि संपूर्ण प्रकल्पांची साधने ह्यांच्या आयातीला प्राधान्य असते. नंतर येणाऱ्या अवस्थेत कच्चा माल, अर्धापक्का माल, बदली लागणारे यांत्रिक भाग, इत्यादींना प्राधान्य येत जाते. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात ३,६१७ कोटी रुपयांची आयात करण्यात आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ४,८८२ कोटी रुपयांची व तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या चार वर्षांत ४,७२९ कोटी रुपये किंमतीची आयात करण्यात आली. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात तर ७,७५० कोटी रुपये किमतीची आयात होईल असा अंदाज आहे. पण, विकासाची क्रिया चालू राहिल्याने परदेशीय मदतीत हळुहळु घट होत जाईल. ह्याचा अर्थ असा की, आर्थिक विकासाबरोबर निर्यातीचीही वाढ होत राहिली पाहिजे. परदेशीय कर्जांचे परतफेडीचे हप्ते, त्यावरील व्याज आणि खाजगी परदेशी भांडवलावरील नफ्याची पाठवणी ह्या कारणांमुळे निर्यात वाढण्याची जरूरी अधिकच महत्त्व पावते. म्हणून, नियोजित विकास आणि त्याची अंमलबजावणी साधताना निर्यात बाबतच्या आर्थिक धोरणाला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत व नंतर भारताच्या निर्यात व्यापाराची स्थिती कशी राहील आणि जरूर ती निर्यात वाढ घडवून आणण्यासाठी कोणत्या परिस्थितीची आवश्यकता आहे हे पहाण्यापूर्वी, पहिल्या तीन पंचवार्षिक कार्यक्रमांच्या म्हणजे व १९६५ च्या मार्च अखेरपर्यंतच्या कालांत निर्यात मालाचे प्रकार, त्याची प्रवृत्ति आणि किंमत ह्या संबंधीचा आढावा घेणे उपयुक्त ठरेल.

पहिल्या दोन पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालात निर्यात व्यापार स्थितीशील होता. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळात मात्र निर्यात व्यापार गतिशील झाला आणि झपाट्याने वाढण्याची पात्रता त्यात दिसू लागली. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत निर्यातीची पंचवार्षिक सरासरी ६११ कोटी रुपयांची होती; दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ती ६०७ कोटी रुपयांची होती; तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या ४ वर्षांत निर्यातीची वार्षिक सरासरी ७५१ कोटी रुपयांची होती आणि पंचवार्षिक सरासरी ७६० कोटी रुपयापर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. तीच गोष्ट निर्यात मालाच्या प्रत्यक्ष वाढीची. पहिल्या १० वर्षांत म्हणजे दोन पंचवार्षिक कार्यक्रमात वाढीचा निर्देशांक १० टक्क्यापेक्षाही कमी होता तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या चार वर्षांत वाढीचा निर्देशांक जवळजवळ २९ टक्के झाला होता. निर्यातीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण ही कसोटी मानल्यास, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमात झालेली वाढ ही सुद्धा निर्यातीच्या प्रसरणशीलतेचे गमक मानता येणार नाही. १९५०–५१ च्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या मानाने निर्यातीची सरासरी ६·३ टक्के होती. १९५५–५६ साली ती ६·० टक्के झाली. १९६०–६१ साली सरासरी ४.५ टक्यापर्यंत खाली आली आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या ४ वर्षांत ती जवळपास तितकीच राहिली. तरी ह्या काळात निर्यातीत आणि किमतीत बरीच वाढ झालेली होती. ह्याचा अर्थ असा की देशात उत्पादन करण्यात येणाऱ्या मालाच्या किंमतीच्या मानाने निर्यातीच्या मालाच्या किंमतीत मोठी लक्षवेधक वाढ अजूनही व्हावयाची आहे. ह्या अवधीत निर्यात मालाच्या विस्तारात लक्ष वेधण्यासारखे बदल झाले; काही परंपरागत मालाची निर्यात घटली तर काही वाढली. ह्याच वेळी काही प्रकारचा नवा माल नव्याने निर्यात होऊ लागला आणि त्यामुळे निर्यात व्यापाराची बरीच वाढ झाली. पुढील कोष्टकात नियोजन सुरू होण्याच्या पूर्वीच्या १९५०–५१ सालामधील निर्यात मालाच्या प्रकाराचा आणि तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील तिसऱ्या वर्षांतील म्हणजे १९६३–६४ मधील मालाच्या प्रकाराचा तपशील दिलेला आहे.

कोष्टक १ आकडे कोटी रुपयांचे

| मालाचा प्रकार | १९५०-५१ | १९६३-६४ | फरक | १९६३-६४ मधील बदलाचा निर्देशांक १९५०-५१ =१०० |
|---|---|---|---|---|
| चहा | ८०·४ | १२३·४ | ४३·० | ५३·५ |
| कॉफी | १·३ | ८·३ | ७-० | ५३८·५ |
| मसाल्याचे पदार्थ | २३·८ | १६·९ | —०·८ | –३२·८ |
| वनस्पति तेले | २५·३ | १९·९ | –५·४ | –२१·३ |
| पेंड | विशेष नाही | ३५·४ | ३५·४ | नवीन |
| साखर | ,, | २६·१ | २६·१ | ,, |
| फळे व भाजी | १३·० | २९·९ | १६·८ | १३० |
| मासे | २·३ | ५-७ | ३·२ | १२८ |
| कातडी | २३·४ | ३६·२ | २·८ | १२ |
| कच्चीतंबाखू | १३·० | २१·१ | ८·१ | ६२·३ |
| लोखंडाचे खनिज | विशेष नाही | ३६·४ | ३६·४ | नवीन |
| मॅंगेनीझ | ८·० | ८·३ | ०·३ | ४ |
| पक्का ताग | १०८·६ | १५७·३ | ४८· | ४५ |
| लोकरीचा माल | ५·६ | ८·५ | २·९ | ५१·८ |
| सुती कापड | ११८·१ | ५४·४ | –६३·७ | –५३·९ |
| कृत्रिम रेशमी कापड | १·० | ९·९ | ८·९ | ८९० |
| काथ्याचा पक्का माल | १०·८ | ११·७ | ०·९ | ८·३ |

नूतन वर्ष आमच्या सर्व ठेवीदारांना व हितचिंतकांना सुखाचे व समृद्धीचे जावो

**नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड**

**केन्द्र कार्यालय : स्टेशन रोड, नांदेड**

**चेअरमन : श्री. शामराव कदम**

शाखा विस्तार

१) देगूलर (२) किनवट (३) बिलोली (४) हदगाव (५) भोकर (६) कंधार (७) मुखेड (८) लोहा (९) नायगाव (१०) हिमायतनगर (११) उमरी (१२) तामसा (१३) मुदखेड (१४) अर्धापूर (१५) धर्माबाद (१६) कुडंळवाडी. (१७) मुकरमाबाद (१८) इस्लापर (१९) कलंबर (२०) मरखेल (२१) कौठो (२२) लिंबगाव (२३) जांब बु. (२४) वाई (२५) मांडवी (२६) किनी (२७) निवघा (२८) मांजरम (२९) कुंटूर (३०) वेटमोगरा

शेती विकास व ग्रामीण औद्योगिक विकास यासाठी

**सतत जिव्हाळ्याने झटणारी एकमेव बँक मोठ्या प्रमाणात ठेवी स्विकारीत आहे**

**जनतेने या सुवर्णसंधीचा अवश्य फायदा घ्यावा**

**व्याजाचे आकर्षक दर : सेव्हिंग्ज खाते—द. सा. द. शे. ४ टक्के स्पेशल सेव्हिंग्ज खाते—द. सा. द. शे. ४·५० टक्के**

**मुदतींच्या ठेवी**

| | | | |
|---|---|---|---|
| १५ दिवसानंतर | ते | ९० दिवसापर्यन्त | ३·५० टक्के |
| ९१ दिवस | ते | ६ महिने | ५·१२ टक्के |
| ६ महिने | ते | १ वर्षे | ५·६२ टक्के |
| १ वर्षे | ते | २ वर्षे | ६·१२ टक्के |
| २ वर्षे | ते | ३ वर्षे | ६·३७ टक्के |
| ३ वर्षे | ते | ५ वर्षे | ६·७५ टक्के |
| ५ वर्षे | ते | ७ वर्षे | ७·१२ टक्के |
| ७ वर्षे | ते | ९ वर्षे | ७·६२ टक्के |

**या शिवाय बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

**वा. न. संत, मॅनेजर**



ही दिपावली आमच्या सर्व सभासदास, ठेवीदारास व ग्राहकास आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो हीच शुभेच्छा

**बँकिंगची सवय ही आजच्या अर्थव्यवस्थेत एक अत्यावश्यक बाब आहे.**

**तुमच्या हाती केव्हाही येणारे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी व हवे तेव्हा काढण्यासाठी**

जिल्ह्यातील ४० शाखामार्फत शेतकी व औद्योगिक संस्थांच्या विकास कार्यास मदत करीत असलेल्या

# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ठेवा

तेथे ते तुमच्याच विकासांत कार्यशील असतात व तुम्हाला पुरेसे व्याजही मिळवून देतात

**बँकेची सांपत्तिक स्थिती ( दि. २६–८–६६ )**

**( आंकडे लाखांत )**

| | |
|---|---|
| ( १ ) भरपाई झालेले भाग भांडवल | रु. ८८–३३ |
| ( २ ) ठेवी | रु. ४४५–७९ |
| ( ३ ) दिलेली कर्जे | रु. ७१९–८० |
| ( ४ ) खेळते भांडवल | रु. ९२९–७८ |

**— व्याजाचे आकर्षक दर —**

| | | |
|---|---|---|
| ( १ ) सेव्हिंग्ज | द. सा. द. शे. | ४ टक्के |
| ( २ ) मुदतीच्या ठेवी | द. सा. द. शे. | २॥ ते ७ टक्के |

**तु. मो. सोनवणे** — मॅनेजर
**मा. त्र्यं. पाटील** — व्हाईस चेअरमन
**व्यंकटराव भा. हिरे, एम्. एल्. ए.** — चेअरमन

| मालाचा प्रकार | १९५०–५१ | १९६३–६४ | फरक | १९६३-६४ मधील बदलाचा निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| पेट्रोलजन्य पदार्थ | २·३ | ७·४ | ५·१ | २२१·७ |
| रासायनिक माल | २·३ | ३·७ | १·७ | ८५ |
| मूलभूत धातू | ३·४ | ९·५ | ६·१ | १७९·४ |
| यंत्रसामुग्री | ०·५ | ५·९ | ५·४ | १०८० |
| इतर | ५२·२ | ८२·९ | ३०·७ | ५८·८ |
| एकूण | ५७३·५ | ७९०·२ | २१६·७ | ३७·८ |
| पुनर्निर्यात | २७·८ | ४·० | –२३·८ | –८५·६ |
| एकंदर बेरीज | ६०१·३ | ७९४·२ | १९२·९ | ३२·१ |

ह्याच कालखंडात भारताच्या निर्यात व्यापाराच्या दिशेंत काही अर्थपूर्ण बदल झाले. पहिल्या कार्यक्रमाच्या पूर्वीच्या १९५०–५१ पासून तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या तिसऱ्या म्हणजे १९६३-६४ पर्यंत बाजारपेठानिहाय भारताच्या निर्यातीचा प्रवाह कसा बदलला ते खालील कोष्टकावरून दिसून येईल.

कोष्टक २. आकडे कोटी रुपयांचे

| देश | १९५०-५१ | १९६३-६४ | १९६३-६४ व १९५०-५१ मधील फरक | १९६३-६४ मधील बदलाचा निर्देशांक १९५०-५१ = १०० |
|---|---|---|---|---|
| ब्रिटन | १३९·८ | १६३·७ | २३·९ | १७·१ |
| अमेरिका | ११५·३ | १३०·१ | १४·८ | १२·८ |
| कॅनडा | २३·८ | २१·२ | ७·४ | ५३·६ |
| प. जर्मनी | १०·९ | २०·१ | ९.२ | ८४·४ |
| इटली | १५·० | ११·४ | –३·६ | २४·० |
| फ्रान्स | ९·० | ११·१ | २·१ | २३·३ |
| रशिया | १·३ | ५२·३ | ५१·० | ३,९२३·१ |
| यु. ए. आर. | ५·९ | १२·६ | ६·७ | ११३·५ |
| पाकिस्तान | ३०·६ | ७·२ | –२३·४ | ७६·५ |
| आस्ट्रेलिआ | ३०·४ | १७·७ | –१२·७ | ४१·८ |
| जपान | १०·३ | ५८·९ | +४८·६ | ४७१·८ |
| ब्रह्मदेश | २२·४ | ६·४ | –१६·० | ७१·४ |
| इतर | १९६·६ | २८१·५ | ८४·९ | ४३·२ |
| एकूण | ६०१·३ | ७९४·२ | १९२·९ | ३२·१ |

या कोष्टकावरून एक गोष्ट ठळकपणे लक्षांत येते ती अशी की, रशियाला करण्यात येणाऱ्या भारताच्या निर्यातीत गेल्या १३ वर्षांत ३९ पटीने वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे जपानकडील निर्यातींत ४·५ पटीने, संयुक्त–अरब–प्रजासत्ताकाकडील निर्यातीत दुपटीने आणि पश्चिम जर्मनीकडील निर्यातीत जवळजवळ तितकीच वाढ झालेली आहे. ब्रिटन व अमेरिका ह्यांच्याकडील निर्यातीत वाढ झालेली असली तरी एकूण निर्यातीमधील टक्केवारी ब्रिटनच्या बाबतीत २३·३ टक्क्यांवरून २०·६ टक्क्यांवर आणि अमेरिकेच्या बाबतीत १९·२ टक्क्यांवरून १६·४ टक्क्यांवर घसरलेली आहे. पाकिस्तान, ब्रह्मदेश आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशांकडील निर्यातीत मात्र खूप घट झालेली दिसून येते. एकंदरीने असे म्हणता येईल की, भारताच्या निर्यातीचा ओघ पूर्व युरोप आणि आग्नेय आशिया ह्या भागाकडे अधिक वळत असून पश्चिम युरोप, अमेरिका अगर आफ्रिका ह्या भागाकडे त्या मानाने कमी निर्यात होत आहे. निर्यातीत वाढ होण्याची ही दिशा तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या ४ थ्या वर्षांत तशीच चालू राहिली; मात्र निर्यातीचा वेग काहीसा मंदावला. १९६३–६४ साली पुनर्निर्यात धरून एकूण निर्यातीची किंमत ७९३·२ कोटी रुपये होती ती ८१५·४ कोटी रुपये झाली. म्हणजे निर्यात २·८ टक्क्यांनी वाढली. त्यामुळे निर्यातीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असणारे प्रमाण घटले. १९६३–६४ सालातील निर्यातीच्या आकड्यांशी तुलना करता निर्यात मालाच्या प्रकाराबाबत असे फेरफार आढळून येतात. अखाद्य वनस्पती तेलाची निर्यात १९·९ कोटी रुपयांवरून ७·० कोटीपर्यंत घसरली. कृत्रिम रेशमाचे कापड ९·९ कोटींवरून ६·६ कोटीपर्यंत घसरले. साखरेची निर्यात २६·० कोटी रुपयांवरून १७·९ कोटी रुपयांपर्यंत खाली आली. याउलट पुढील वस्तूंच्या निर्यातीत वाढ झाली. सुती कापड ५४·३ कोटींपासून ५८·० कोटी; मसाल्याचे पदार्थ १६ कोटींपासून १६·७ कोटी; शेंगदाणा पेंड ३५·४ कोटीपासून ३९·७ कोटी; कच्ची तंबाखू २१·१ कोटीपासून २४·१ कोटी; फळे व भाजीपाला ३०·१ कोटीपासून ३६·८ कोटी; कॉफी ८·३ कोटीपासून १३·३ कोटी; चहा १२३·४ कोटीपासून १२४·७ कोटी; इतर पक्का माल ४० कोटीपासून ६८·८ कोटी. ह्यात एंजिनिअरिंगच्या मालाचा समावेश आहे.

१९६४–६५ सालीं पूर्व युरोप आणि रशिया ह्यांच्याकडील निर्यातीत मागील सालाच्या मानाने १३·७ टक्क्यावरून १८·२ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. पश्चिम युरोपकडील निर्यात ३१·६ टक्क्यांवरून ३०·२ टक्क्यांपर्यंत घसरली. अमेरिकेडील निर्यातीत वाढ होऊन ती २१·७ टक्क्यावरून २२·८ टक्क्यापर्यंत वाढली. आफ्रिकेकडील निर्यातीतही ५·९ टक्क्यांपासून ६·१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. निर्यातीबाबतचा ह्या ताजा इतिहास लक्षात घेऊन चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालात निर्यातीचे भवितव्य काय असू शकेल ह्याचा अंदाज बांधता येईल. नियोजन समितीने व्यापार-खात्याशी व निर्यातवाढ मंडळाशी चर्चा करून चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ५,१०० कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात करण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. १९६५–६६ साली ८४५ कोटी रुपयांची निर्यात होईल असा अंदाज आहे. १९७०–७१ साली ती १,११० कोटी रुपये होईल अशी अपेक्षा आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टांपेक्षा थोडी जास्तच निर्यात करावी लागेल. कारण १९६५–६६ मधील निर्यात ८४५ कोटी होईल अशी लक्षणे दिसत नाहीत. चौथ्या कार्यक्रमातील निर्यातीचे उद्दिष्ट १,३०० कोटी रुपयांनी अधिक आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील निर्यातीच्या अपेक्षित वाढीपेक्षा हे उद्दिष्ट १·७ पटीने अधिक आणि दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालात प्रत्यक्ष झालेल्या निर्यातवाढीपेक्षा ७६ पटीने अधिक आहे. नेहमीच्या निर्यात-मालाच्या वाढीतील हिस्सा फारसा आढणार नसला तरी शेतीच्या मालाच्या निर्यातीचा हिस्सा मात्र अधिक वाढेल अशी अपेक्षा आहे. लोखंडाचे खनिज, एंजिनिअरिंगचा माल, हस्तव्यवसायाचा माल, कृत्रिम रेशमाचे कापड, रसायने, पायतणे इत्यादींच्या निर्यातीत चांगली वाढ होण्याची शक्यता आहे. ह्याचा अर्थ असा की, निर्यातीमुळे प्राप्त होणाऱ्या परदेशीय चलनात तर वाढ अभिप्रेत आहेच; पण निर्यातीच्या आराखड्यातही क्रांतिकारक बदल होईल अशी अपेक्षा करण्यात येत आहे.

निर्यातीच्या ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी काही जरूरीच्या प्राथमिक अटी पाळल्याशिवाय गत्यंतर नाही. निर्यातीसाठी जरूर असणाऱ्या मालाचा पुरवठा करण्यात आला पाहिजे. निर्यातीच्या गरजा लक्षात घेऊन शेतीच्या व पक्क्या मालाच्या उत्पादनाची योजनापूर्वक आखणी केल्याशिवाय हे

शक्य होणार नाही. हे करण्यासाठी काही प्रकारच्या मालाची, काही प्रादेशिक विभागांची आणि कांही उत्पादक घटकांची काळजीपूर्वक निवड करावी लागेल; आणि शिवाय जरूर तर देशांतर्गत वापरावर निर्बंधही घालावे लागतील. निर्यातीचे सातत्य राखण्यासाठी जरूर त्या मालाचे साठे राखण्यात आले पाहिजेत. भारताच्या निर्यात मालापैकी बराच माल शेतीवर आधारित असल्याने आणि शेतीच्या मालाच्या उत्पादनातील चढउतार महशूर असल्यामुळे तर ह्या साऱ्याच्या धोरणाला फार महत्त्व आहे. शेती व उद्योगधंदे ह्या दोन्ही विभागातील भांडवल गुंतवणुकीला निश्चित दिशा लावून निर्यात मालाच्या वाढत्या पुरवठ्याची तरतूद करण्यात आली पाहिजे. संबंधित निर्यात उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल, सुटे भाग, इत्यादींचा पुरवठा कार्यक्षमतेने करण्यात आला पाहिजे. निर्यात माल तयार करण्यासाठी खास उत्पादकघटक उभारण्याचे धोरण स्वीकारण्यात आले पाहिजे. ही उत्पादक केंद्रे अगदी अद्यावत् पद्धतीची असली पाहिजेत आणि त्यांनी फक्त निर्यातीच्या व्यवहाराकडेच लक्ष पुरविले पाहिजे. असे उत्पादक कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागात उभारावे लागण्याची शक्यता आहे. भारतामधील सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांनी निर्यातीबाबत अधिक सक्रिय पाठिंबा दाखवून एकूण निर्यात वाढविण्याचे आणि निर्यातीच्या प्रती वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. खाजगी मालकीच्या क्षेत्रातील उद्योगधंद्यांना जर त्यांना लागणारे परदेशीय चलन त्यांनी स्वतःच मिळवावे असे सांगण्यात येते तर अशीच सूचना सार्वजनिक विभागातील घटकांना करण्यात का येऊ नये ? हिंदमधील बरीच भांडवल गुंतवणूक सार्वजनिक मालकीच्या विभागात होते. या विभागासाठी प्रारंभी आयातीची विशेष गरज असते आणि पुढेही त्याला परदेशीय चलनात खर्चाची अधिकाधिक गरज वाटते, म्हणून सार्वजनिक मालकीच्या विभागातील उद्योगधंद्यांना निर्यात व्यापारव्यवहाराच्या चौकटीत बसविणे आवश्यक झाले आहे. अर्थात, असे करतांना राष्ट्रीय गरजांची निर्यातीशी सांगड घालण्यात आली पाहिजे. दुसरे असे की, निर्यात वाढविण्यासाठी द्रव्यविषयक अगर इतर प्रकारचे जे उपाय योजण्यात यावयाचे ते चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात सतत चालू ठेवण्यात आले पाहिजेत. नाही तर ज्या निर्यातदारांकडून अगर कारखानदारांकडून निर्यातीचा माल उपलब्ध करून घ्यावयाचा त्यांच्याकडून ह्या बाबतीत जरूर असणाऱ्या प्रयत्नांत खंड पडण्याची शक्यता आहे. निर्यात वाढविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परदेशीय चलनाच्या पुरवठ्याबाबत सवलतीचे धोरण ठेवण्यात आले पाहिजे. निर्यातदारांना अगर त्यांच्या एजंटांना परदेशी प्रवासासाठी जरा मोकळेपणाने परदेशीय चलन देण्यात आले पाहिजे. त्याचप्रमाणे जाहिराती, बाजारपेठांबाबत संशोधन, नवीन डेपो उघडणे, नव्या कचेऱ्या स्थापन करणे ह्या बाबतीतही परदेशीय चलन देण्यात आले पाहिजे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालासाठी काही ठराविक रकमेचे परदेशीय चलन मंजूर करून त्याची वाटणी दरसाल हप्ते बंदीने योग्य त्या रीतीने करण्यात आल्यास ती अधिक सोयीची होईल. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शेती अगर यंत्र बांधणी हे धंदे जितके जरूरीचे गणले जातात तितकाच जरूरीचा धंदा म्हणून निर्यातीकडे पाहाण्यात आले पाहिजे. म्हणून निर्यात

---


# शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली

## ( जिल्हा—सांगली, महाराष्ट्र राज्य )

परमप्रिय सार्वभौम भारतीय स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी व अखिल मानव कल्याणकारी लोकशाहीच्या प्रगतीची उज्ज्वल आकांक्षा सफल करण्यासाठी प्राणपणाने आणि सहकार्याने भारतीय किसान—जवान—कामगार अविरत वाटचाल करीत आहेत. त्यांच्या पाठीशी आमच्या कारखान्याचे संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी यांच्या अखंड शुभेच्छा.

१. भारताचे संरक्षणमंत्री माननीय नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या शुभहस्ते दि. १० एप्रिल, ६६ रोजी उद्घाटन झालेल्या विस्तार-योजनेतून प्रतिदिनी २,६०० मे. टन ऊंस गळित करणारा.
२. सन ६५—६६ च्या गळित हंगामांत ३,२७,०९२ मे. टन ऊंस गाळून महाराष्ट्रात उच्चांक गांठणारा व ३,५२,९४२ पोती साखर उत्पादन करणारा.
३. विस्तार योजनेच्या भागीदारीतून मळीपासून प्रतिदिनी ६,५०० गॅलन्स रेक्टिफाइड स्पिरिटचे उत्पादन करणारा.
४. चार सहकारी साखर कारखान्यांचे सहकार्याने ( नियोजित ) २७ कोटी रु. च्या सहकारी कागद कारखान्यामध्ये प्रमुख भागीदारी असलेला.
५. दीड कोटी रुपयांच्या ६१ जलसिंचन योजनाद्वारे २४ हजार एकर जमीन जलसिंचनाखाली आणून शेतकऱ्यांच्या जीवनात उज्ज्वल भवितव्य निर्माण करून भारतामध्ये अग्रगण्य ठरलेला.
६. पाच हजार एकर जमीन हायब्रीड सीड्सच्या योजनेखाली आणून शेती क्षेत्रात आमूलाग्र बदल करीत असलेला.
७. निर्यातीसाठी कच्ची साखर उत्पादन करून भारतात सर्वश्रेष्ठ ठरलेला.

**शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड, सांगली**

भारतीय सहकारी क्षेत्रातील सर्वात मोठा आणि सांगली जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाचा केंद्रबिंदू व सहकारी चळवळीचे स्फूर्तिस्थान बनून भारतीय संरक्षण कार्यात आपला वाटा सहर्ष स्वाभिमानाने उचलीत आहे.

**दीपावलि व नूतन वर्षानिमित्त अखिल भारतीयांचे अभीष्ट चिंतन.**

| | | |
|---|---|---|
| **आ. र. उपाध्याय** | **दिनकरराव हिं. पाटील** | **वसंतराव पाटील, एम्. एल्. ए.** |
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हाइस चेअरमन | चेअरमन |

वाढविण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांना व उपायांना शेतीचे उत्पादन अगर भारी उद्योगधंद्यांचे उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांइतके महत्त्व देण्यात आले पाहिजे. हे सर्व उपाय चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांतील सर्वसाधारण आर्थिक धोरणाचे भाग झाले पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणीही योग्य रीतीने झाली पाहिजे; तरच भारताचे निर्यातीचे उद्दिष्ट गाठता येईल. ह्या उपायांची व आर्थिक निर्णयांची कार्यवाही करताना रुपयाच्या चलनात व परदेशीय चलनात बराच मोठा खर्च करावा लागेल हे उघडच आहे.

परदेशांतून मिळणारी साधनसामग्री मिळविण्यात अडचणी आहेत ह्यात शंकाच नाही. परंतु चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात सरकारने जो खर्च करावयाचा ठरविले आहे त्यासाठी, आणि कार्यक्रमाच्या बाहेरील कामांसाठी होणाऱ्या खर्चासाठी रुपयाच्या चलनातील रक्कम पुरेशा प्रमाणात उभी करणे हेही काम सोपे नाही. निर्यात-वाढीसाठी अनेक प्रकारची मदत सरकारला करावी लागणार आहे. त्यामुळे रुपयाच्या चलनावर अधिक ताण पडणार आहे. अशा परिस्थितीत खुद्द परदेशीय व्यापाराच ह्यापैकी काही बोजा स्वीकारील अशी व्यवस्था करता येईल कीं नाही असा प्रश्न साहजिकच उभा राहातो. ह्या संदर्भात आयात व्यापार आणि आयात परवाना-पद्धती ह्यांचा विचार करावा लागेल. त्याचप्रमाणे दुर्मिळ कच्चा माल व सुटे भाग ह्यांची परवानापद्धतीने आयात करून आणि त्याचा उपयोग करून परवानेदार देशातच जे मोठे नफे मिळवितात त्याचीही दखल घ्यावी लागेल.

गेली कित्येक वर्षे भारताला परदेशीय चलनाची टंचाई भासत आहे. नव्हे ही परिस्थिती देशाच्या अर्थव्यवस्थेचे एक खास लक्षणच बनून राहिली आहे. त्यामुळे आयातीवरपर वानापद्धतीने कडक नियंत्रण ठेवणे आवश्यक झालेले आहे. जो ग्राहकोपयोगी पक्का माल अत्यावश्यक नाही त्याच्या आयातीवर अतिशय कडक निर्बंध घालण्यात आलेले आहेत. सार्वजनिक मालकीच्या अगर खाजगी मालकीच्या विभागातील जे उद्योगधंदे कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत, त्यांच्यासाठी यंत्रसामग्रीची व इतर उपकरणांची आयात अधिक सढळपणे करण्यात येत आहे. चालू उत्पादनासाठी कच्चा माल व सुटे भाग ह्यांचा पुरवठा परदेशीय चलनाच्या अनुकूलतेप्रमाणे जास्तीत जास्त करण्याचे प्रयत्न होत आहेत; परंतु परदेशीय चलनाच्या अपुरेपणामुळे ह्या बाबतीतील सर्वच गरजा पूर्णपणे भागविल्या जाणे अशक्य आहे. पण ह्या गोष्टीला इलाज नाही. ह्याचा अर्थ असा की, ज्या सुदैवी कारखानदारांना टंचाई असलेल्या कच्च्या मालाची व सुट्या भागाची आयात करण्याची परवानगी मिळालेली आहे ते ह्या सामग्रीचा उपयोग करून बनविलेला माल देशात चढ्या किंमतींना विकून भरमसाट नफे कमावीत आहेत.

आता हे खरे आहे की, ज्यांना आयात परवाने दिले गेले त्यांनीच त्यांचा प्रत्येक वेळी स्वतःच वापर केलेला नाही. किंवा ज्यासाठी असे परवाने देण्यात आले त्यासाठीही ते काही वेळा वापरण्यात आलेले नाहीत. अशा तऱ्हेने होणारा परवान्याचा गैरवापर टाळण्यासाठी उपाय योजले गेलेले आहेत, अगर योजण्यात येत आहेत; परंतु, परवान्यांचा योग्य वापर करण्यात येत असला तरी सुद्धा परवानेदार दुर्मिळ साधन-सामुग्रीचा उपयोग करून अवाच्या सवा नफे कमावतात हा खरा महत्त्वाचा मुद्दा आहे. परवानेदार कारखानदारांनी परवान्यांचा वापर करणे ह्यात काहीच गैर नाही. परंतु ते जे भरमसाठ नफे मिळवतात ते समाजाच्या जिवावर मिळविण्यात येतात. उच्च दर्जाच्या कार्यक्षमतेने ते मिळविलेले नसतात. परंतु, आयात परवाने देणाऱ्या सरकारला मात्र ह्या जादा नफ्यापैकी काहीही हिस्सा मिळत नाही. तेव्हा ह्या जादा नफ्यापैकी कांही हिस्सा सरकारला समाजाच्या हितासाठी टिपून घेणे कितपत शक्य होईल असा प्रश्न उपस्थित होतो. ह्या विषयासंबंधी अलीकडे सार्वजनिक चर्चा होत आहे. सरकारला ह्या जादा नफ्यातील वाजवी भागाची प्राप्ती व्हावी म्हणून सूचनाही करण्यात आलेल्या आहेत. परवान्यांचा जाहीर लिलांव करण्यात यावा अशी एक सूचना करण्यात आली आहे. अशा लिलावांत सर्वांत अधिक रक्कम देणाऱ्यालाच परवाने मिळतील आणि सरकारलाही अधिक उत्पन्न मिळेल.

ज्या देशांत मुक्त अर्थव्यवस्था प्रचलित आहे आणि ती पूर्णपणे निर्बंधरहित आहे, त्या देशांत परवान्यांचा असा लिलाव करणे कदाचित तर्काला धरून होईल. परंतु संमिश्र आणि विकसनशील नियोजित अर्थव्यवस्थेत ह्या योजनेला जागा असणार नाही. त्यापेक्षा सध्या चालू असलेली आयातीच्या अग्रक्रमाची आणि परवान्याची पद्धतच नियोजित अर्थव्यवस्थेत अधिक चांगली ठरेल. परंतु निर्यात वाढविण्यासाठी जो पैसा लागेल त्यापैकी कांही हिस्सा तरी परदेशीय व्यापाराच्या व्यवहारातूनच उपलब्ध होईल अशी काही तरी व्यवस्था शोधून काढण्यात आली पाहिजे. कारण, चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधींत भारताची साधन-सामुग्रीची परिस्थिती अवघड राहणार असल्याने कार्यक्रमांत ठरविलेल्या प्रमाणावर निर्यात करण्यासाठी लागणारा पैसा जमविणे बिकट होणार आहे. म्हणून आयात केलेल्या वस्तूंच्या विक्रीमुळे अगर जुळणी केलेल्या वस्तूंच्या विक्रीमुळे होणाऱ्या जादा नफ्यातील काही वाटा निर्यात वाढीसाठी. लागणाऱ्या मदतीसाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात निर्यात वाढीसाठी अशा काही उपायांची अंमलबजावणी करण्यावर निर्यात वाढ अवलंबून असली तरी निर्यात वाढ होऊन सुद्धा समाधान मानण्यास फारशी जागा नाही. कारण, विकसनशील अर्थव्यवस्थेत औद्योगिक विस्तार होत राहिल्याने आयात सारखी वाढतच जाते, व कालांतराने अशा अर्थव्यवस्थेला परदेशात भांडवल गुंतवावे लागते. ते काहीही असले तरी आयातीसाठी लागणाऱ्या द्रव्याकरता परदेशी मदतीच्या कुबडीवर अवलंबून चालणार नाही. भारतापुढे आंतरराष्ट्रीय देण्याघेण्यांतील समतोलपणा राखण्याचा आणि परदेशीय चलनाच्या गरजेचा जो प्रश्न आहे तो दीर्घकाल टिकणारा आहे. देशांत उत्पन्न होणाऱ्या मालापैकी अधिकाधिक भाग निर्यातीसाठी उपलब्ध करून देणे आणि त्याची प्रत्यक्ष निर्यात करणे ह्या एकाच मार्गाने हा प्रश्न सोडविता येईल. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात ठरविण्यात आलेले उद्दिष्ट गाठले गेले तरी सुद्धा हा प्रश्न सुटणार नाही, हे पुढील कोष्टकावरून लक्षांत येईल.

| वर्ष | निर्यात आकडे कोटी रुपयांचे | चालू किंमतींना राष्ट्रीय उत्पन्न | निर्यातीची राष्ट्रीय उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९५०–५१ | ६०१ | ९,५३० | ६.३ |
| पहिला कार्यक्रम | | | |
| १९५१–५२ | ७४३ | ९,९७० | ७.५ |
| १९५२–५३ | ५७८ | ९,८२० | ५.९ |
| १९५३–५४ | ५३१ | १०,४८० | ५.१ |
| १९५४–५५ | ५९३ | ९,६१० | ६.२ |
| १९५५–५६ | ६०९ | ९,९८० | ६.० |
| दुसरा कार्यक्रम | | | |
| १९५६–५७ | ६२० | ११,३१० | ५.५ |
| १९५७–५८ | ५६१ | ११,३९० | ४.८ |
| १९५८–५९ | ५७३ | १२,६०० | ४.६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९५९–६० | ६४० | १२,९५० | ४·९ |
| १९६०–६१ | ६४३ | १४,१४० | ४·५ |
| तिसरा कार्यक्रम | | | |
| १९६१–६२ | ६६१ | १४,८०० | ४·५ |
| १९६२–६३ | ७१४ | १५,४०० | ४·६ |
| १९६३–६४ | ७९४ | १७,२०० | ४·६ |
| १९६४–६५ | ८१५ | १८,११० | ४·५ |
| १९६५–६६ | ८४५ | १९,३०० | ४·३ |
| चौथा कार्यक्रम अंदाज | | | |
| १९७०–७१ | १,११० | २५,००० | ४·४ |

निर्यातीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण जर ४·५ टक्यापासून निदान ६·५ टक्यापर्यंत वाढवावयाचे असेल तर भारताच्या एकूण निर्यातीत आणि त्याच्या किंमतीत क्रांतिकारी वाढ झाली पाहिजे. हे प्रमाण गेली पाच सात वर्षे तरी ४·५ टक्क्यावरच थबकून राहिलेले आहे. परंपरागत मालाच्या निर्यातीने अगर निर्यातीला मदत देण्याच्या इतर उपायांनी ही वाढ घडवून आणता येणार नाही. त्यासाठी मालाच्या स्पर्धात्मक गुणवत्तेवर अवलंबून राहावे लागेल. प्रगत देशात नव्या सधन समाजाची निर्मिती होत आहे. त्या समाजाच्या वाढत्या गरजा भागविण्याकडे लक्ष देण्यात आले पाहिजे. अजून कित्येक वर्षे तरी शेती हा एकच व्यवसाय असा राहील की जो भारताच्या निर्यात मालाची दुपटीने अगर तिपटीने वाढ करू शकेल. भारताइतकी विविध फळे आणि भाज्या इतर कोणत्याही देशात होत नाहीत. पश्चिमेकडील अनेक देशांत औद्योगिक मालाचे विविध प्रकार छत्तीस पडत असले तरी फळे व भाजी ह्यांच्या बाबतीत त्यांना काही निवडक मालावरच विसंबावे लागते. ह्यापैकी बऱ्याच पदार्थांची चव युरोपियन, अमेरिकन अगर जपानी लोकांना माहीत नाही हे खरे, पण त्याच बरोबर हेही खरे आहे की ठराविक फळे व भाज्या खाऊन त्यांच्या जिभा अगदी विटल्या आहेत. अशा परिस्थितीत नवनवी फळे व भाज्या ह्यांचे ते स्वागतच करतील.

कुशल विक्रय कला, समजूत पटविणारी प्रात्यक्षिके आणि चांगल्या मालाचा नियमित पुरवठा ह्यांच्या साह्याने कोट्यावधि रुपयांची ताजी व संस्कारित फळे व भाज्या परदेशांना निर्यात करणे भारताला शक्य आहे. पण हे साध्य करण्यासाठी इंग्रजीखेरीज इतर परदेशी भाषा शिकणे आवश्यक आहे. निर्यातीच्या राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेल्या प्रमाणात वाढ करण्यासाठी आणखी काही उपाय करता येण्यासारखे आहेत. निर्यातीचा माल उत्पादन करण्यासाठी खास उत्पादन विभाग आणि बाजार संघटना काढण्यात आल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे परदेशांतील वाटप संस्थांशी व आयात संघटनांशी सहकार्य करण्यात आले पाहिजे. परदेशी बाजारपेठा खूप मोठ्या व विस्तार पावणाऱ्या आहेत; पण, त्यात भारताचा हिस्सा अल्पतर आहे. म्हणून ह्या बाजारपेठांचा अभ्यास करण्यात आला पाहिजे, त्यांची काळजीपूर्वक जोपासाना करून माल विकण्याचे कल्पक, व आक्रमक प्रयत्न सतत करण्यात आले पाहिजेत. निर्यातवाढीबाबत भारतापुढे उभे ठाकलेले हे आव्हानच आहे.


## अगदी आवश्यक तेव्हाच....

जीवनावश्यक समजल्या जाणाऱ्या अनेक गोष्टींत आज खरोखर काही अनावश्यक वस्तू आहेत काय ?
होय – तुम्ही खरेदी करीत असलेली वस्त्रप्रावरणे, चप्पल्स, बूट, सौंदर्य-साधने, चैनीच्या शेकडो वस्तू, प्रवास, हे सर्व करताना ' हे अगदी अत्यावश्यक आहे का ' असा विचार केलात तर तुम्हीच त्याचं नकारार्थी उत्तर द्याल. तेवढी पैशाची बचत करणं एक राष्ट्रीय कार्य समजा.

बचतीसाठी आणि आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंग गरजांसाठी

# दि बेळगांव बँक लिमिटेड

**राजि. ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव**

महाराष्ट्र, म्हैसूर राज्य आणि गोवा भागात एकूण ३८ शाखा कार्यरत आहेत.

# आत्महत्यांची कारणे व त्यावर उपाय

## कौटुंबिक, शारीरिक व आर्थिक दुःस्थिती

गुजरात सरकारच्या आत्महत्या चौकशी मंडळाने प्रसिद्ध केलेल्या आकड्याप्रमाणे, मद्रास राज्य हे आत्महत्यांच्या बबातीत आघाडीवर आहे. दहा संघराज्ये आणि दिल्ली ह्यांचे बाबत त्यांच्या इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसांनी मे १९६० ते एप्रिल १९६४ अखेरच्या पुरविलेल्या माहितीवरून दिसून येते, कीं मद्रासच्या खालोखाल म्हैसूरचा अनुक्रम येतो.

**दर लक्ष लोकसंख्येगणिक आत्महत्या**

| राज्य | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|
| राजस्थान | ०·६७ | ०·९६¼ | १·६३¼ |
| ओरिसा | २·६१ | २·५० | ५·११ |
| दिल्ली | २·८९½ | १·८७½ | ४·७७ |
| मध्यप्रदेश | २·७७ | २·३२ | ५·०९ |
| महाराष्ट्र | २·८३ | २·५० | ५·३३ |
| आंध्रप्रदेश | ३·९९½ | ४·१८ | ८·१७½ |
| प. बंगाल | ४·२५ | ३·४८ | ७·७३ |
| पंजाब | ०·८९½ | ०·८० | १·६८½ |
| म्हैसूर | ५·४९½ | ४·६० | १०·०९½ |
| मद्रास | ११·३८ | ८·२७ | १९·६५ |
| गुजरात | २·५० | २·९९½ | ५·४९½ |

आत्महत्येची कारणे तपासून आत्महत्या टळण्यासाठी उपाय-योजना सुचविण्यासाठी गुजरात सरकारने १९६४ साली श्री. पुष्पाबेन मेहता, एम. पी., ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली होती, तिचा अहवाल नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. कमिटीने एकूण ४,५३७ प्रकरणांची चौकशी करून आपले निष्कर्ष काढले आहेत.

सबंध भारतात गुजरातमध्ये सर्वात जास्त आत्महत्या होतात, ही कल्पना भ्रामक आहे, असे कमिटीने नमूद केले आहे.

४,५३७ आत्महत्यांपैकी २,४७२ पुरुषांच्या व २,०६५ स्त्रियांच्या होत्या.

२०–२४ वयाच्या लोकांत आत्महत्येचे प्रमाण सर्वात अधिक आढळले. ६५ वर्षांपेक्षा ज्यास्त वयाच्या कोणींही आत्महत्या केली नाही.

आत्महत्या करणारांपैकी ८५० पुरुष व १५३१ स्त्रिया निरक्षर होत्या, तर ५६ पुरुष व १६ स्त्रिया मॅट्रिक पास, पाच पुरुष पदवीधर आणि दोन पुरुष व एक स्त्री पदव्युत्तर शिक्षण घेतलेले होते.

पाण्यात बुडून आत्महत्या करण्याचा प्रकार सर्वांत (विशेषतः स्त्रियात) लोकप्रिय होता. ८१६ पुरुषांनी आणि १३४८ स्त्रियांनी ह्या प्रकारे जीव दिला. वस्त्रे पेटवून घेण्याचा प्रकार त्या खालोखाल येतो. हाही प्रकार स्त्रियांत विशेष आढळतो. ४७७ पुरुषांनी आत्म-हत्येच्या ह्या प्रकाराचा अवलंब केला, तर ६५४ स्त्रियांनी तो प्रकार पसंत केला. २१० पुरुषांनी आगगाडीच्या रुळावर जीव दिला, त्याप्रकारे फक्त २९ स्त्रियांनी आत्महत्या केली.

एकूण १७५४ आत्महत्यांच्या बुडाशी कौटुंबिक कारण होते.

एकूण १०३० प्रकरणात आत्महत्येचे कारण शारीरिक दुःख हे होते. ३२० लोकांना आत्महत्येस आर्थिक दुःस्थितीने प्रवृत्त केले.

### कमिटीच्या शिफारशी

(१) क्रिमिनल प्रोसीजर कोडचे १७४ वे कलम बदलण्यात येऊन, स्त्रीने हत्येचा प्रयत्न केला असल्यास त्याची खबर समाज-कल्याण संस्थेस देण्याची पोलिसांवर जबाबदारी टाकण्यात यावी. समाजकार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पोलीस चौकशी व्हावी.

(२) आत्महत्येच्या प्रयत्नाला शासन न करता, खास मानसिक उपचारासाठी अशी प्रकरणे पाठविण्याचा कोर्टांना अधिकार देण्यात यावा.

(३) तरुण-तरुणींना आपला जीवन साथीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असावे. पालकांनीच त्यांची निवड केली असल्यास, वधु-वरांची त्या निवडीला संमती घेण्यात यावी.

(४) एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये, तरुण-तरुणींना जुन्या पिढीने अधिक स्वातंत्र्य द्यावे.

(५) बालविवाह बेकायदा असले तरीही ते अजून घडून येत आहेत. ही पद्धत बंद पडायला हवी. जेथे पडदा पद्धति चालू आहे, तिला आळा घालण्याचा सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला पाहिजे.

(६) मुलींच्या शिक्षणाकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे; त्याला अग्रस्थान मिळावे.

(७) माध्यमिक शाळांतून लैंगिक शिक्षण सुरू करावे.

(८) कौटुंबिक स्वास्थ्यविषयक सल्ल्याची जिल्हानिहाय सोय करावी.

(९) म्हाताऱ्यांना आर्थिक सुरक्षिततेसाठी पेन्शनची व्यवस्था करावी.

(१०) बेगर्स ॲक्ट मोठ्या शहरांतून अमलात आणावा.

---


दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बीड
(केंद्र कार्यालय, बीड)

—० सांपत्तिक स्थिती ०—

| | लक्ष रु. |
|---|---|
| वसूल भांडवल | ४४·६८ |
| राखीव निधी | ७·९५ |
| एकूण ठेवी | १७४·५१ |
| खेळते भांडवल | ४१०·०५ |

एकूण कर्ज व्यवहार ३ कोटीचे वर.

व्याजाचे दर

| | |
|---|---|
| चालू खाते | ½ टक्के |
| सेव्हिंग्ज खाते | ४ टक्के |
| कॉल ठेवी | २½ ते ३ टक्के |
| मुदतीच्या ठेवी | ४½ ते ७ टक्के |

जिल्ह्यात बावीस शाखा

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ना. वि. पांडे, बी. ए., व्यवस्थापक.

श्रीपतराव कदम, बी. ए., एल्. एल्. बी., ॲडव्होकेट, एम. एल. ए. अध्यक्ष

दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना सुखाचे व भरभराटीचे जावो !

सेवा — सहकार — सचोटी

हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत.

# दि बेळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस : : १५० भांदुर गल्ली, बेळगांव.

## प्रगतीचे पाऊल

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ४०,००,००० |
| वसूल झालेले | रु. ३४,९५,७०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. १७,४६,६०० |
| ठेवी | रु. २,६४,७३,००० |
| खेळते भांडवल | रु. ५,६६,२०,००० |

ही बँक शहरी व ग्रामीण जीवन सुधारणेच्या कामी, त्याचप्रमाणे अधिक धान्य पिकविणेच्या मोहिमेसाठी शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देऊन सर्वतोपरी साहाय्य करीत आहे. तसेच, त्यांच्या मालास योग्य किंमत येऊन त्यांचा धंदा किफायतशीर व्हावा यासाठी सेल सोसायट्या व विविधोद्देश संस्थामार्फत विक्री करून देण्याच्या कामी त्यांना मदत करीत आहे.

या बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू व सेव्हिंग्ज बँक ठेवी, एक महिन्यापासून पाच वर्षांवरील मुदती ठेवी व तसेच रिकरिंग ठेवी स्वीकारण्यांत येतात. तसेच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहारही केले जातात.

बेळगांव बझार, बैलहोंगल व सौंदत्ती येथील शाखांमध्ये मौल्यवान जिनसांच्या सुरक्षिततेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आमच्या २३ शाखा आहेत.

विशेष माहिती बँकेचे ऑफिसमध्ये मिळेल.

जी. व्ही. घोडगेरी,
व्हाईस प्रेसिडेंट.

एम्. एम्. होसमनी,
प्रेसिडेंट.



# दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., अहमदनगर

टेलिफोन ३२३ : ३८६ स्टेशनरोड तार—सहकार बँक

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भाग भांडवल | १५० लक्ष |
| (२) वसूल भाग भांडवल | ११८ लक्ष |
| (३) गंगाजळी व इतर फंडस | ३७ लक्ष |
| (४) ठेवी | ६११ लक्ष |
| (५) शेती उत्पादन कर्जे | ८०० लक्ष |
| (६) बिगर शेती कर्जे | ३०० लक्ष |
| (७) खेळते भांडवल | १४ कोटीचे वर |

— वैशिष्ट्ये —

★

कृषि औद्योगिक नियोजन.
संशोधन व विकास मंडळाची स्थापना.
भारताच्या प्रमुख शहरी बँकिंगचे संबंध.
ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दर.

## बचत करून देशाची सेवा करा

शेतीचा योजनाबद्ध आर्थिक विकास करून राष्ट्रीय उत्पादनात भर टाकण्याचे महान उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेऊन बँक प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. ठेवीदारांनी दिलेल्या सतत व सक्रीय पाठिंब्यामुळे व जिल्ह्यातील शेतकरी बांधव देत असलेल्या आंतरिक सहकार्यामुळे बँकेची आर्थिक स्थिती सुस्थिर व मजबूत पायावर उभी आहे. हे नमूद करण्यास आम्हास अत्यानंद व अभिमान वाटत आहे.

आपल्या ४५ शाखांनिशी तुमच्या सेवेस सिद्ध असलेली ‘ एकमेव जिल्हा सहकारी बँक ’

जी. एम. जोशी
मॅनेजर

भा. ना. देशमुख
व्हा. चेअरमन

भा. सं. थोरात
चेअरमन

# भारतीय नौकानयनाची वाढ

## परदेशीय चलनाच्या प्राप्तीचा मार्ग

हिंदुस्थान देशाला ६,००० मैल लांबीचा किनारा लाभलेला आहे. ह्या देशाच्या अर्थव्यवस्थेत प्राचीन काळापासून किनाऱ्यालगतच्या दर्यावर्दी वाहतुकीला महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. भारतात ब्रिटिश राजवट असतांना देशाच्या दर्यावर्दी वाहतुकीला एक प्रकारची अवकळा आलेली होती. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाल्यावर देशाच्या आर्थिक पुनरुज्जीवनास पहिल्या व तांतडीच्या प्रश्नाचे स्वरूप प्राप्त झाले. कारण, आर्थिक स्वातंत्र्य आणि राजकीय स्वातंत्र्य ह्यांची तशीच सांगड आहे. ह्या संदर्भात निर्यात व्यापाराचा विस्तार आणि तदनुषंगिक बोट वाहतुकीचा विकास ह्या विषयांना साहाजीकच महत्त्व प्राप्त झाले. अलीकडे भारताची परदेशीय चलनाच्या बाबतीत बिकट परिस्थती झाल्याने तर ह्या दोन्ही विषयाकडे विशेष लक्ष जाऊ लागले आहे. ताग्याचा माल, चहा, सुती कापड, इत्यादी माल भारतामधून निर्यात होत असतो. ह्या परंपरागत मालाच्या निर्यातीत वाढ व्हावी म्हणून भारत सरकारने अनेक उपायांची योजना केली आहे. पण त्याशिवाय अर्ध संस्कारित माल आणि पक्का माल ह्यांच्या निर्यातीलाही उत्तेजन देण्यांत येत आहे. ह्या मालात औद्योगिक यंत्रसामुग्री व उपकरणे, घरगुती भांडी, कातड्याचे सामान, विजेचे सामान, पंखे, शिवणाची यंत्रे, तयार कपडे, इत्यादी वस्तूंचा अंतर्भाव आहे. ह्या वस्तूंच्या निर्यातीमुळे देशाला अधिक परदेशीय चलन मिळण्यास वाव आहे. निर्यात होणाऱ्या मालात विविधता आल्याने बोट वाहतुकी बाबत अनेक प्रश्न नव्याने उत्पन्न झाले आहेत. उदाहरणार्थ, चालू दर्यावर्दी मार्गावर अधिक बोटी सुरू करणे, नवीन मार्गावर बोटींची वहातूक सुरू करणे, वाहतुकीचे वाजवी दर ठरविणे, इत्यादि. भारतामधील अनेक प्रकारचा अर्ध संस्कारित आणि पक्का माल अविकसित देशांतील बाजारपेठांत खपू शकेल. म्हणून ह्या देशांकडे जाणाऱ्या सागरी मार्गावर हिंदी बोटींचे मार्ग खुले करण्याची आवश्यकता आहे. आर्थिक विकास ही बाब परदेशीय चलन मिळविण्याच्या पात्रतेशी निगडित अशी आहे. भारताला मिळू शकणाऱ्या परदेशीय चलनाला साहजिकच मर्यादा पडतात; आणि म्हणून भारतामधील भविष्यकालीन आर्थिक विकास, हा निर्यात करण्याबाबत देश कोणता पुढचा पल्ला गाठतो ह्यावर अर्थातच अवलंबून आहे. निर्यातीमधील वाढीकडे लक्ष देण्यासाठी अनेक संस्थांची उभारणी करण्यात आली आहे. बोर्ड ऑफ ट्रेड, एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल्स, इत्यादी. ह्याशिवाय स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन आणि मिनरल्स अँड मेटल्स ट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्या संघटनाही निर्यातीला वळण लावण्याचे कार्य करीत असतात. निर्यातीला उत्तेजन देण्यासाठी अनेक योजना चालू करण्यात आल्या आहेत. ह्या सर्वांचा परिणाम होऊन भारताच्या निर्यातीत सालोसाल वाढ होत चालली आहे. ह्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे निर्यात वस्तूंच्या प्रकारांत आणि त्या घेणाऱ्या देशांच्या संख्येत चांगली वाढ झालेली आहे. अर्थात ही सर्व निर्यात समुद्रमार्गानेच करण्यांत येत असते. १९६४–६५ सालातील निर्यातीची देशवार वर्गवारी पुढील कोष्टकावरून दिसून येईल.

| आयात करणारा देश | निर्यात मालाची किंमत कोटी रुपये |
|---|---|
| युनायटेड किंग्डम् ( ब्रिटन ) | १६९·३६ |
| अमेरिका ( यू. एस्. ए. ) | १५०·६४ |
| रशिया ( यू. एस. एस. आर. ) | ८२·३८ |
| जपान | ६२·१८ |
| ऑस्ट्रेलिया | २०·६५ |
| कॅनडा | १७·८५ |
| फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी ( पश्चिम जर्मनी ) | १७·७४ |
| नेपाळ | १६·५६ |
| युनायटेड अरब रिपब्लिक | १६·३९ |
| झेकोस्लोव्हाकिया | १६·२० |
| मलेशिया | १५·३८ |
| सीलोन | १४·४७ |
| जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिक ( पूर्व जर्मनी ) | १२·९९ |
| फ्रान्स | ११·९१ |
| पोलंड | ११·२२ |
| युगोस्लाव्हिआ | ११·१३ |
| इटाली | १०·१४ |
| इतर | १५६·१८ |
| एकूण निर्यात ... | ८१३·१७ |

निर्यात मालात आलेली विविधता आणि वाहतुकीच्या खर्चाच्या पायी द्यावे लागणारे परदेशीय चलन ह्या दोन मुद्यांचा विचार करता बोट वाहतुकीसंबंधी सुसंगत धोरण ठरविण्याची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत बोटींच्या साह्याने होणाऱ्या वहातुकीने आपले काम योग्य रीतीने करावे म्हणून बोट वहातुकीचा वाढ करावयाचे भारत सरकारने ठरविले असून त्यासाठी अनेक उपाय योजण्यात आले आहे. बोट वाहतुकीसंबंधी सरकारला सल्ला देण्यासाठी नॅशनल शिपिंग बोर्ड ह्या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. त्याशिवाय किनाऱ्यालगतची वाहतूक हिंदी बोटींतूनच करणे, सार्वजनिक विभागांत शिपिंग कॉर्पोरेशनची स्थापना करणे, नव्या बोटी मिळविण्यासाठी स्वस्त व्याजाच्या दराने कर्जे देणे, सरकारी मालकीच्या अगर सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या मालाची सागरी वाहतूक करतांना हिंदी बोटीचाच वापर करणे, इत्यादि उपायही अमलात आणण्यात येत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी हिंदी बोटी मुख्यतः किनाऱ्याजवळची वाहतूकच करीत असत आणि अशा बोटीचे वजन अवघे १·९२ लाख टन होते. आता बहुतेक महत्त्वाच्या समुद्र मार्गावरून हिंदी बोटी ये-जा करीत आहेत आणि त्यांचे एकूण वजन १४ लाख टनांच्या घरात गेले आहे. १ जून १९६५ ह्या दिवशी निरनिराळ्या मार्गावर वाहतूक करणाऱ्या हिंदी बोटीसंबंधी पुढील कोष्टक पहा.

| व्यापार | बोटींची संख्या |
|---|---|
| किनाऱ्यालगतचा व्यापार | १०६ |
| समुद्रपार व्यापार | |
| भारत–मॅलेशिया | |
| भारत–पूर्व आफ्रिका | १ |
| भारत–तांबडा समुद्र | ४ |
| भारत–ऑस्ट्रेलिया | ३ |
| भारत–जपान अतिपूर्व | १० |
| टॅंकर्स | ३ |
| भारत–रशिया | १३ |
| भारत–अमेरिका | २० |
| भारत–ब्रिटन युरोप | ३३ |
| एकूण | २१८ |

नूतन वर्ष आपणा सर्वांना आनंदाचे व सुखसमृद्धीचे जावो.


**शेतकरी सहकारी संघ लिमिटेड, कोल्हापूर.**

जुना राजवाडा, कोल्हापूर.

फोन नं. १२५ तार–शेतकरी

सहकाराने अंगी येई बंधूभाव थोर
सहकाराने मानवतेचे गाठूया शिखर.

कॅ. ग. स. घाटगे — जनरल सेक्रेटरी
वि. शं. शिंदे, नेसरीकर — कार्यकारी संचालक
दा. गो. माने — अध्यक्ष



**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**


मुख्य कचेरी· सातारा (महाराष्ट्र)




बोट वाहतुकीच्या बाबतीत भारताची हळूहळू प्रगति होत असली तरी भारतात नोंदण्यात आलेल्या बोटीचे वजन जगांतील बोटींच्या वजनांच्या अवघे १ टक्का आहे. ह्या बाबतीत जगाच्या यादीत भारताचा अनुक्रम १७ वा लागतो. सध्या भारतापाशी असणाऱ्या बोटींतून देशाच्या परदेशी व्यापारांपैकी अवघी १५ टक्के वाहतुकच करता येण्यासारखी आहे. ह्या बाबतीत अजून खूपच मजल मारावयाची आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांच्या आखेरीस भारतातील बोटी १५ लाख टनापर्यंत पोचतील आणि ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभी त्या २० लाखापर्यंत पोचतील असा अंदाज करंण्यात आला आहे. ४ थ्या कार्यक्रमाच्या अखेरीस त्या ४० लाख टनापर्यंत पोचतील आणि भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या ३० टक्के वाहतूक करू लागतील अशी अपेक्षा आहे. ही वाहतूक ५० टक्के पर्यंत करण्याची कायदेशीर मुभा भारतास आहे.

तथापी आंतरराष्ट्रींय वाहतुकीचे स्वरूप पाहता असे दिसते की कांही प्रगत देशांची ह्या वाहतुकीवर प्रामुख्याने पकड आहे. त्यामुळे अविकसित देशापुढे असलेले सागरी वाहतुकीचे प्रश्न राष्ट्रीय पातळी वरून प्रयत्न करून सुटण्यासारखे नाहीत. त्यासाठी अशा प्रयत्नांबरोबरच अविकसित देशांनी प्रादेशिक तत्त्वावर आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे प्रयत्न होण्याचीही आवश्यकता आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय वाहतुकीसंबंधी भरणाऱ्या परिषदेतून भारत, अविकसित देशांना समान असणाऱ्या सागरी वाहतुकीच्या प्रश्नावर लक्ष केंद्रीत करण्याची खटपट करीत असतो. जिनीव्हा येथे मार्च ते जून १९६४ मध्ये संयुक्त-राष्ट्र संघटनेतर्फे व्यापार व विकास परिषद भरविण्यात आली होती. त्यावेळी अविकसित देशांच्या सागरी वाहतुकीसंबंधी प्रामुख्याने विचारविनिमय करण्यात आला. ह्या परिषदेत भारताने पुढाकार घेऊन चर्चेत भाग घेतला होता. परिषदेने अशीं शिफारस केली की सागरी वाहतुकीबाबत देशादेशात सहकार्य घडवून आणण्यासाठी आणि एकमेकांचे प्रश्न समजून घेण्यासाठी योग्य अशी कार्यपद्धति निरनिराळ्या सरकारांच्यां दरम्यान सुरू करण्यात यावी. जरूर तर एकाद्या कायमच्या मंडळाचीही स्थापना करण्यात यावी. दर्यावर्दी वहातुकी संबंधी उपस्थित होणाऱ्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करून त्यासंबंधी शिफारसीही कऱ्यात याव्या. त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या व्यापार आणि विकास मंडळाने एक कायम स्वरुपाची कमिटी स्थापन केली आहे. जागतिक व्यापाराची वृद्धी होण्यासाठी आंतरराष्ट्रीय बोट वाहतुक कोणत्या प्रकारचे सहकार्य देऊ शकेल ह्यासंबंधी मंडळाने सूचना करावयाच्या आहेत. त्यातही अविकसित देशांची बोट वहातूक आणि व्यापार ह्या संबंधी मंडळाने विशेष लक्ष पुरवावयाचे आहे. ह्या सर्व घडामोडीकडे भारत आस्थेने लक्ष देत आहे. वसाहतवादाच्या कक्षेंतून बाहेर पडलेले अविकसित देश आणि प्रगत देश ह्यांच्या दरम्यान सागरी वाहतूकीसंबंधी अनेक वादग्रस्त समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्या सोडविण्यासाठी अविकसित देश व्यापार व विकास मंडळाचा भरपूर फायदा घेतील आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची समतोल वाढ होण्यासाठी प्रगत देश आपला सहकार्य मनापासून देतील अशी आशा भारताला वाटत आहे.

---



ही दिवाळी आमच्या भागीदारांना, ठेवीदारांना आणि हितचिंतकांना

—: सुखसमृद्धीची जावो :—

अल्पावधींत जनता जनार्दनाचे अंतःकरणात मानाचे स्थान पटकावलेली आणि प्रगतीपथावर असलेली

# जनता सहकारी बँक लि., सांगली

हेड ऑफिस ( कराळे बिल्डिंग, हायस्कूलरोड, सांगली ) शाखा मार्केट यार्ड

फोन २४४ फोन ४८४

**प्रगतीपथावरील बोलके आंकडे :—**

| | | | |
|---|---|---|---|
| ( ज ) | अधिकृत शेअर भांडवल | रु. | ५,००,००० |
| ( न ) | वसूल झालेले शेअर भांडवल | रु. | २,९५,६०० |
| ( ता ) | रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,५६,६०० |
| ( बँ ) | एकूण ठेवी | रु. | २१,६९,२०० |
| ( क ) | एकूण खेळते भांडवल | रू. | ३९,३९.००० |

( सां ) आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात.

( ग ) बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

( ली ) बँक ५ टके डिव्हिडंड देत असून सुरवातीपासून " अ " वर्गांत आहे.

बा. ए. कबाडे — असि. मॅनेजर

रमणलाल म. शहा — व्हा. चेअरमन

आण्णासाहेब कराळे — चेअरमन



STUSA

## दीपावली अभीष्टचिंतन...



ही दिवाळी आणि नूतन वर्ष

आमच्या ग्राहकांना, विक्रेत्यांना आणि हितचिंतकांना

सुखसमृध्दीचें जावो

किर्लोस्कर

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी, जिल्हा-सांगली.

# सरकारी कारखान्यांतून खासगी कारखान्यांकडे तज्ज्ञांचा लोंढा

सरकारी मालकीच्या कारखान्यांतून खासगी मालकीच्या कारखान्यांकडे जाणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. पब्लिक सेक्टरमधील १४,००० अधिकाऱ्यांनी अशा रीतीने सरकारी छत्राचा त्याग करून प्रायव्हेट सेक्टरमध्ये प्रवेश मिळविला आहे. १९६१ आणि १९६२ मध्ये त्यांची वार्षिक सरासरी २,००० होती, पण १९६३,१९६४ आणि १९६५ मध्ये ती ३,००० वर गेली आहे. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि.ने २,१९७; इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीजने १,४७५; हिंदुस्थान स्टील लि. ने १,२०५ आणि फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. ने १,०६५ अधिकारी गमावले आहेत.

प्रायव्हेट सेक्टरमधील पगार व इतर फायदे पब्लिक सेक्टरच्या तुलनेनें सरसरीनें १००% जास्त आहेत. ही काही नवीन घटना नाही. परंतु प्रायव्हेट सेक्टरचे आकर्षण गेल्या तीन वर्षांत खूपच गतीनें वाढले आहे. इनकम टॅक्स खात्यांतील वरिष्ठ अधिकारी तेथील नोकरी सोडून खाजगी उद्योगधंद्यांतील नोकरी पत्करतात. ह्यासाठी इनकम टॅक्स अधिकाऱ्यांचा पगार वाढविणे जरूर आहे, असे भूतपूर्व अर्थ मंत्री, श्री. टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनी म्हटले होते. औद्योगिक विकासाच्या काळांत सरकारी नोकरीच्या शाश्वतीपेक्षा खाजगी कारखानदारीतील भरपूर पगाराचे आणि मोकळ्या हवेचे आकर्षण जास्त वाटणे स्वाभाविकच आहे. कारण अनुभवी इंजिनिअर्स व मॅनेजर्स ह्यांची मागणी त्यांच्या पुरवठ्यापेक्षा एकसारखी वाढत जात असते. पब्लिक सेक्टरमधील कारखान्यांत प्रवेश मिळवायचा, तेथे अनुभव घ्यावयाचा व त्याच्या आधारे प्रायव्हेट सेक्टरमधील कारखान्यांत अधिक चांगल्या पगाराची व आकर्षक अटींची नोकरी मिळवावयाची, असे चालू आहे. त्यांना बाजारभावाइतके तरी वेतन सरकारी कारखान्यांत मिळाल्याखेरीज हा प्रवाह थांबणे शक्य नाही. पण, सरकारी कारखाने आज बहुतेक नुकसानीतच चालू आहेत, त्यात ह्या पगारवाढीने भरच पडणार आहे. त्या कारखान्यांची कार्यक्षमता सुधारल्याखेरीज अधिक पगार देणे परवडणार नाही आणि अधिक पगार दिल्याखेरीज चांगले इंजिनिअर्स व मॅनेजर्स टिकून राहणार नाहीत, अशी ही समस्या आहे.

---

## रणगाड्याच्या कारखान्यांची प्रगति

आवडी येथील रणगाड्यांच्या कारखान्याने चांगली प्रगति केली आहे. रणगाड्यांत वापरण्यांत यावयाचे कांहीं परदेशी सुटे भाग मिळण्यास विलंब लागला. तरीही कारखान्यांतील उत्पादन ठरल्यावेळेपेक्षा लवकर सुरू झाले. लष्कराला रणगाडे पुरविण्यास आता प्रारंभ करण्यात आला आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्यात सुधारणा झाल्यामुळे उत्पादनाची गतीही वाढत चालली आहे. परदेशी सुट्या भागांचा वापर कमी कमी होत आहे. पुढील तीन चार वर्षांत फक्त २० टक्केच भाग परदेशी वापरावे लागतील; जरूर पडल्यास कोणत्याही प्रकारचे रणगाडे कारखान्यात तयार होऊ शकतील.


सभासद, ग्राहक व हितचिंतक यांना

नूतन वर्षाभिनंदन

★

सहकार तत्त्वाचे संपूर्णपणे पालन करून व्यापारात अग्रेसर काटकसरीने चोख व्यापार करणारी—

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रतिनिधींने प्रशंसा केलेली— एकमेव सहकारी सोसायटी

●

दि पूना रिटेलर्स (गुड्स-सप्लाय) को-ऑप. सोसायटी लि.


२०५ गणेश पेठ पुणे २


★


मॅ. डायरेक्टर जयंतीलाल बी. शहा — चेअरमन एम. एस्. तापडिया — अध्यक्ष ल. गो. सहस्रबुद्धे

Quality Vices at Reasonable Cost

3 designs—but one superb feature: UNSHAKABLE GRIP




Shivaji Pipe Vices hold pipes firmly, help threading cutting and other operations, easier and quicker.

Shivaji Carpenter's Vices hold wooden jobs in a Tight Grip, help make every job easier.

Shivaji Drilling Machine Vices hold jobs in an unshakable grip, promote accurate workmanship in workshop operations.

Whatever the design, when you choose Shivaji Vices, you choose Perfect Grip.

"A KIRLOSKAR GROUP INDUSTRY"

SHIVAJI WORKS LIMITED
SHIVASHAHI, DIST., SHOLAPUR.

TOM & BAY SWL: 6672

तारेचा पता— मुख्य कार्यालय, दूरध्वनी क्र. २६१४९७
" मॉर्गेज " उपकार्यालय, दूरध्वनी क्र. २५६५२७

## मुंबअी राज्य सहकारी भूतारण बँक लि.

## मुंबअी.

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबअी—नं. १.

( स्थापना—१९३५ )

महाराष्ट्र राज्यांतील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखालीं विहिरी, ऑईल एंजिन्स, पंपिंग सेटस्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेंच जमीन, सुधारणें करितां कर्ज वांटपचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६६ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटीं रु. ४६ कोटी येणे आहेत.

रा. गो. गोखले. व्यवस्थापक. ग. रा. पालकर. कार्यकारी संचालक. नी. आ. कल्याणी. अध्यक्ष.



## सरदारगृह

## मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

★ आमची वैशिष्ठ्ये ★

- **हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.**
- **टिळक जन्म—शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.**

फोननं. :—३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



## कोल्हापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित

### कोल्हापूर.

४९० इ, साई कृपा, स्टेशन रोड,
शाहूपुरी, कोल्हापूर
फोन नं. ५८९

शेतकऱ्यांनो,

उद्योगधंद्याप्रमाणे शेतीसाठीहि भरपूर भांडवली गुंतवणूक करावी लागते.

शेतीच्या अनेकविध कारणासाठी आमच्या बँकेकडून दीर्घ मुदतीची कर्जे दिली जातात.

लक्षात असू द्या:—१) आमच्या बँकेची कर्जे त्वरित मिळण्याची सोय आहे. (२) व्याजाचा दर अत्यंत अल्प आहे. (३) बँकेकडून घेतलेल्या पंपिंग सेट व नवीन विहिरी यासाठी सबसिडी पण दिली जाते. (४) गरीब शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात कर्जे दिली जातात.

अधिक माहिती बँकेच्या मुख्य कचेरीत अगर बँकेच्या शाखांतून मिळू शकेल.

**एस्. जी. जाधव** इनचार्ज मॅनेजर — **ग. शं. भोगांवकर** चेअरमन



आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, ठेवीदार व सभासद यांना ही **दीपावली व आगामी वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो**

## दि आष्टा अर्बन को-ऑप. बँक लि. आष्टा

र. नं ९५१८ र. ता. २०—१—१९४७

**बँकेची अर्थव्यवस्था ता. ३०।६।१९६६ची**

१) वसूल भाग भांडवल २०४७३०
२) फंड्स् ६४३२३
३) ठेवी ७८७३३८
४) गुंतवणूक १२८४००
५) कर्जे ८९२६२५
६) खेळते भांडवल १२४०८४३

ऑडिट वर्ग 'अ'

ठेवीवर आकर्षक व्याज, अद्यावत बँकिंग, स्वतःचे आलिशान इमारतीत काम करीत असलेली या वाळवे तालुक्यातील एकमेव बँक.

ठेवीवरील व्याजासाठी समक्ष भेटा

एन्. ए. रुकडे मॅनेजिंग डायरेक्टर — दादा रामा चोगुले चेअरमन

# अशा आहेत जपानमधील बँका !

## संस्थेच्या ध्येयाशी समरस झालेले कार्यतत्पर व विनयशील कर्मचारी

टोकियो शहरांत सुंदर इमारती पुष्कळ आहेत; पण, बँकांच्या कचेऱ्यासारख्या भव्य, अलिशान आणि ऐटदार वास्तु मात्र फारशा नाहींत. गिऱ्हाइकांनी आपणाकडे आकृष्ट व्हावे म्हणून आपल्या भोंवती सुखकारक आणि कार्यक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी जपानमधील बँका नेहमीच प्रयत्नशील असतात. बँकिंगचे व्यवहार चालणाऱ्या दालनांत पुष्पलतांची मनोहर रचना केलेली असते, ठिकठिकाणी शिल्पाच्या व इतर कलात्मक वस्तु ठेवलेल्या असतात. आणि सुंदर सुंदर पक्षी कोपऱ्याकोपऱ्यातून कूजन करीत असतात. अशा वातावरणाशिवाय बँकेचे दालन सापडतच नाही; दालनांतील कोच इतके मऊ असतात की त्यावर बसताच त्यावरील गाद्यांत तुम्ही ६ इंच बुडून जाता. काम होईपर्यंत थांबावे लागल्यास अगदी ताजी अमेरिकन व जपानी नियतकालिके मनोरंजनार्थ ठेवलेली असतात. त्याशिवाय, कलाविषयक पुस्तकांनी दालनाच्या सर्व बाजू भरलेल्या असतात. एखाद्याला चहाचा आस्वाद घ्यावासा वाटल्यास तीही सोय केलेली असते. इतक्या प्रकारचे मनोविनोदन कमी पडेल म्हणूनच जणू कांहीं शास्त्रीय संगीताच्या धुंद लहरी हवेत तरळत असतात. बँकेच्या इमारतींत शस्त्रधारी पहारेकरी कोठेही दृष्टीस पडणार नाहीत. त्यांची जागा हंसतमुख सेवकांनी घेतलेली असते. हे सेवक गिऱ्हाइकांच्या गरजांकडे लक्ष तर पुरवतातच; पण अनोळखी इसमाला सुद्धा मार्गदर्शन करतात. जपानी बँकांच्या कचेऱ्यांनी सुखदायकत्वाची मोठीच कीर्ती संपादन केलेली आहे; बँकांचे नोकरही सेवातत्परतेबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यामुळे जपानमध्ये नव्यानेच आलेल्या एखाद्या प्रवाशाला विश्रांतीची आणि मार्गदर्शनाची आवश्यकता असेल तर प्रवाशांचे मार्गदर्शक त्यांनी निकटच्या बँकेंतच जाण्याचा सल्ला देतात.

बँकेच्या गिऱ्हाइकांच्या शक्य असेल ती सर्व सेवा करण्याचे प्रयत्न भारतामधील बँकाही करतात. परंतु जपानी बँका आपल्या गिऱ्हाइकांची जशी सेवा करतात तशी सेवा करणे भारतामधील बँकांना जमत नाही. ह्या बाबतींत भारतामधील बँका अद्याप ध्येयापासून खूपच दूर आहेत. जपानी बँकांच्या कौंटरवर स्त्रिया काम करतात. त्या नेहमी हसतमुख असतात आणि त्यांच्या मुखांतून सभ्यता व शिष्टाचारदर्शक शब्द एकसारखे बाहेर पडत असतात. बँकेतून गिऱ्हाइकांना फार महत्त्व दिले जाते. कित्येक बँकांतून तर मुख्य मॅनेजर प्रमुख दालनांत बसलेला असतो आणि खोल्या व केबिन्स ह्यातून गिऱ्हाइकांना बसविण्यात येते. जपानमधील बँकांची कामाची पद्धत कमीत कमी वेळ घेणारी असते. आशियांतील इतर देशांशी तुलना करता जपानमधील बँकांची सचोटी व प्रामाणिकपणा खूपच उच्च दर्जाची असतात. अर्थात् जपानी नागरिकांचे कांहीं राष्ट्रीय स्वभावविशेषच ह्याला कारणीभूत असतात. कामाची पद्धत अशी असते की पुन्हा पुन्हा वळून पहाण्याची गरजच भासत नाही. पण, ह्याचा अर्थ कामकाजाची गलथान पद्धत असा मात्र नाही. जपानमधील बँकांत यांत्रिकीकरणाने आश्चर्यकारक रीतीने काम करण्यात येते. कौंटरवर हजर केलेल्या चेकचेच उदाहरण घ्या. खातेदाराची सही आणि त्याच्या खात्यातील शिल्लक अजमावण्यासाठी चेक कौंटरच्या मागे असलेल्या तक्त्यावर ठेवण्यात येतो. तेथे बसविलेले दूरदर्शन यंत्र चेकची प्रतिमा खतावणी खात्याकडे पाठविते; तेथील कारकून सहीबद्दल अगर सीलबद्दल खात्री करून घेतो. सहीचा नमुना अगर सील लेजर कार्डालाच जोडलेले असते. इतके झाल्यावर तो सही व शिल्लक ह्यांची खातरजमा करणारे एक विजेचे बटन दाबतो. हे सर्व कांहीं सेकंदातच होते; आणि चेक कौंटरवरच असतो. गिऱ्हाइकाला चेकची रक्कम एका पाकिटांतून सत्वर देण्यांत येते. दूरदर्शन यंत्र आपले काम करीत असतांनाच चेकची रक्कम मोजण्यांत येऊन पाकिटांत भरली जाते.

जपानमधील बँकातगणक यंत्रांचे युग सुरू झाले आहे. बँकेत येणाऱ्या प्रत्येक माणसाला गणक यंत्राचा विभाग मोठ्या अभिमानाने दाखविला जातो. ह्या गणक यंत्राकडून काही ठराविक प्रकारची कामे सर्वच बँका करवून घेतात. चालू खाती अद्याप गणक यंत्राकडे सोपविण्यात आलेली नाहीत. परंतु बहुतेक सर्व सेव्हिंग्ज खाती मात्र ह्या यंत्रणाकडूनच हाताळली जातात. हे काहीसे विचित्र वाटण्यासारखे आहे. पण, त्याचं कारण असे आहे की, जपानमधील बँका मधून सेव्हिंग्ज खात्यातील व्यवहारच फार मोठ्या प्रमाणावर चालतो; टोकिओतील काही मोठ्या बँकातून १० लाखावर सेव्हिंग्ज खाती असतात. ह्या खात्यातील रकमांवर रोजच्या रोज व्याज आकारण्याची पद्धत आहे. गणक यंत्रांच्या मदतीशिवाय हे करता येणे अशक्यच आहे. बँकांच्या निरनिराळ्या शाखांकडील देण्याच्या व्यवहारांची सर्व व्यवस्था गणका यंत्राद्वारे पाहण्यात येते. त्यामुळे शाखांवर ह्या कामाचा बोजा पडत नाही. शाखेतील प्रत्येक गिऱ्हाइकांच्या देण्यासंबंधी एक पत्रक दर दहा दिवसांनी मुख्य कचेरीकडून पाठविण्यात येते. सर्व कर्जाची खाती, बिलखाती, उधारउसनवार खाती गणकयंत्राकडून चालविली जातात. ही यंत्रे हिशेबपत्रके तयार करतात, मुदतीच्या तारखा टिपतात, नोटिसा पाठवितात, मुदत भरलेली व वळून गेलेली कर्जे नोंदतात. ही सर्व कामे केवळ एका बटनाच्या साह्याने करण्यात येतात. त्याशिवाय अनेक प्रकारची आकडेवार माहितीही यंत्रे तयार करून देतात. यांत्रिकीकरणामुळे कामाचे केंद्रीकरण करता येणे शक्य झाले आहे. कारण गणक यंत्रांची कामाची भूक अमर्याद असते. जपानमधील एखाद्या बँकेच्या २५० ते ३०० शाखा एक घटक म्हणून काम करू शकतात. कारण, मुख्य कचेरीस सर्व शाखांच्या कामाची माहिती तावडतोब होऊ शकते. हिशेब चटकन करण्यात येतात; व आकडे भरभर मिळू शकतात; नोंदी शास्त्रीय पद्धतीने करण्यात येतात. रोजच्या रोज बँकांच्या व्यवहाराची दिशा समजून घेणे, निर्णय घेणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे, इत्यादी कामे अगदीं थोड्या वेळात करता येतात. बँका चालविण्यात जपानी बँकांच्या मुख्य कचेऱ्या महत्त्वाची कामगिरी बजावत असतात. तशी स्थिती भारतात नाही. तेथील बहुतेक मुख्य कचेऱ्या शाखांचे दैनंदिन काम स्वतःकडे घेतात. त्यामुळे शाखांना धंद्याचा विस्तार व विकास करण्यास अधिक वेळ मिळतो. मुख्य कचेरीत दोन खाती विशेष महत्त्वाची असतात. एक नियोजन खाते आणि दुसरे विकासखाते. ठेवी वाढविण्याबाबत आणि धंद्याचा विकास साधण्याबद्दल प्रत्येक बँक आपले उद्दिष्ट ठरविते. मुख्य कचेरीतील नोकर हे उद्दिष्ट गाठण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात. त्यासाठी ते शाखांना वारंवार भेटी देतात आणि जरूर तेथे त्यांना मदतही करतात. उद्दिष्टांची विभागणी प्रादेशिक पद्धतीने करण्यात येते.

गेल्या कांहीं वर्षांत जपानच्या बँकानी विलक्षण प्रगति केलेली आहे. कांहीं मोठ्या बँकातील ठेवींच्या रकमा ४०० कोटी अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढल्या आहेत. त्यांनी दिलेल्या कर्जाऊ रकमांचा आकडा तर ह्याहीपेक्षा अधिक आहे. बँकांतील नोकरांचा उत्साह आणि कर्तव्यनिष्ठा ह्यांच्यावांचून ही प्रगति शक्यच झाली नसती. जपानच्या बँकांत काम करणाऱ्या प्रत्येक नोकराला त्या त्या बँकेचे बोधचिन्ह दिलेले असते. हे बोधचिन्ह म्हणजे कांहीं शोभेची फीत नसते. ज्या बँकेंत तो काम करीत असतो तिची निशाणी दाखविणारे ते एक बाह्य चिन्ह असते. बँकांचे नोकरहि अतिशय एकनिष्ठ असतात. एका बँकेतील काम सोडून दुसऱ्या बँकेंत नोकरी धरणारे लोक फारच क्वचित आढळून येतात. एकनिष्ठेपेक्षांही कर्तव्यतत्परता अधिक दिसून येते. बँकेचे काम चोख बजावण्यातच आपले हित सामावलेले आहे अशी

त्याची मनोमन भावना असते. जपानी बँक-कर्मचाऱ्यांच्या ठिकाणी आढळून येणारी लीनता, सभ्यता आणि विनय ही कांहीं पैशाच्या लालचीने उत्पन्न झालेली नाहीत. प्रत्येक कर्मचाऱ्याची अशी खात्री झालेली असते की, आपण बँकेचाच एक भाग आहो. म्हणूनच तो निष्ठेने काम करीत असतो. प्रत्येक कर्मचाऱ्याला आपल्या बँकेच्या इभ्रतीची व तीवद्दलच्या जबाबदारीची जाणीव असते. गिऱ्हाइकांशी आपण कसे वागतो ह्यावर बँकेची प्रतिष्ठा अवलंबून असते हे त्याला पक्के ठाऊक असते. जपानी बँकेत चढ्या आवाजात बोलणारा अगर संतप्त चेहऱ्याचा माणूस कधींही दिसणार नाही. गणयंत्राचा आवाज अगर बँकेंत सगळीकडे दिसणारी पुष्परचना ह्याच्यापेक्षाही माणुसकीच्या वागणुकीमुळे जपानी बँकेचा गिऱ्हाइकांवर फार मोठा अनुकूल प्रभाव पडतो.

---

## रशियांतील आर्थिक सुधारणांमुळे फायदा

रशियाच्या सरकारने केलेल्या आर्थिक सुधारणा रशियातील कंपन्यांच्या पथ्यावर पडल्या आहेत. त्यांचे नफे २० टक्क्यांनी वाढले आहेत. सप्टेंबर १९६५ पासून करण्यात आलेल्या ह्या सुधारणात मध्यवर्ती आर्थिक नियोजनाऐवजी वैयक्तिक कंपन्यावर अधिक जबाबदारी टाकण्यात आली होती. त्यांना आपली विक्री व नफे वाढविण्यासाठी उत्तेजन देण्यात आले होते.

## चीन—पाकिस्तान बँकिंग करार

पाकिस्तानच्या स्टेट बँकेच्या गव्हर्नरांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानी बँकवाल्यांचे एक मंडळ चीनचा दौरा करीत आहे, व चीनच्या बँक अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करीत आहे. उभयता देशात बँकिंगसंबंधी एखादा करार होण्याची शक्यता आहे.त्यामुळे बँक ऑफ चायनाला पाकिस्तानात शाखा उघडता येतील.

## रशियात हिंदी बोलपट दाखविणार

बर्लिन येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सत्यजित् रे ह्यांच्या 'महानगर' या बोलपटाला दिग्दर्शनाबद्दल पहिले बक्षिस देण्यात आले होते. हा चित्रपट रशियांत दाखविण्यासाठी त्याची खरेदी रशियाने केली आहे. बोलपटातील मूळच्या संवादाच्या ठिकाणी रशियातील विविध भाषातील संवाद जोडण्याचे काम सध्या चालू आहे.

## मानव एकाकी नाही

डॉ. शार्पले ह्या प्रख्यात अमेरिकन ज्योतिर्विदाच्या मताने जीवसृष्टीचे अस्तित्व फक्त पृथ्वीपुरतेच मर्यादित नाही. विश्वाच्या अफाट पसाऱ्यात निदान १० कोटी ग्रहावर तरी गवत, झाडे आणि माणसे आहेत असे त्यांचे मत आहे. त्यांच्या ह्या मताला आणखी तिघा शास्त्रज्ञांनी दुजोरा दिला आहे.

---


दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि.
श्रीशिवाजीनगर, ता. राहुरी, जि. अहमदनगर
दूरध्वनी क्र.–१०३ श्रीरामपूर तार–छत्रपती–राहुरी–श्रीरामपूर
स्थापना–१९५४ सभासद संख्या–२५८८

— आमचे आम्ही —

भारत सरकारने कारखान्यास १५०० टन मशिनरी वाढीची परवानगी दिलेली असून उत्पादक सभासदांनी स्वखुषीने ठेवलेल्या ठेवी व शेअर्स भांडवल जमवून व कारखान्याचे स्वतःच्या भांडवलातून १५०० टन मशिनरी वाढीसाठी लागणारे सुमारे १ कोट रुपयाचे भांडवल जमवून मशिनरी वाढीचे काम पूर्ण करीत असून चालू सिझनमध्ये कारखाना १५०० टन क्रशिंग प्रतिदिनी करू शकेल.

मशिनरी वाढीचे कामाकरिता कारखान्याने कोणत्याही प्रकारचे वाहेरील कर्ज घेतलेले नाही, हे जाहीर करण्यास आम्हांस दीपावलीच्या मंगल प्रसंगी आनंद होत आहे.

— गेल्या तीन सीझनमधील उत्पादनाबाबत माहिती —

| सिझन | ऊस गळीत टन | साखर उत्पादन पोती |
|---|---|---|
| १९६३-६४ | १,८२,२०७ | २,२२,७७८ |
| १९६४–६५ | १,९८,२६३ | २,२५,२७० |
| १९६५–६६ | २,०३,८१० | २,३४,८४८ |

कारखान्याचा सन १९६६–६७ चा गळीत हंगाम दि. २३–१०–६६ रोजी विजयादशमीच्या शुभमुहुर्तावर सुरू झालेला आहे.

— सिझन १९६६–६७ ची उद्दिष्टे —

ऊस गळीत मे.टन २,२५,००० साखर उत्पादन पोती २,६०,०००

— दीपावलीच्या मंगल प्रसंगी सर्वांना प्रणाम —

| पां. वा. पवार | मा. बा. पाटील | बी. बी. तनपुरे |
|---|---|---|
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

सिमेंट पाअीप तयार करा.
४" ते ४८" पाअीप तयार करणेची
उत्कृष्ठ दर्जाची मशिनरी
आम्ही तयार करितों
उत्पादक भिडे अँड सन्स प्रा. लि.
फोन नं १६९ सांगली.

ही दिवाळी आमच्या असंख्य ग्राहकांस
व
आमचे व्यवसाय बंधूस आनंदाची जावो !

# परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीच्या मर्यादा

**क्रांतिपूर्व रशिया आणि १९४७ चा स्वातंत्र्यपूर्व भारत ह्यांच्यापुढील औद्योगिक विकासाचे प्रश्न बहुतांशी सारखेच होते. आर्थिक विकास साधतांना परदेशीय मदत न मिळाल्यास अगर मिळून तिचा वापर नीट न झाल्यास होणाऱ्या परिणामांची कल्पना व्हेरा माईल्सडीन ह्यांनी लिहिलेल्या लेखांच्या पुढील गोषवाऱ्यावरून येईल.**

भारत आणि रशिया हे दोन मोठे देश पाश्चिमात्य देशांच्या कक्षेबाहेरचे असून दोन्हीही देश आपापल्या इतिहासक्रमात अगदी निराळ्या प्रकारचे वळण घेण्याच्या अवस्थेत आहेत. त्या दृष्टीने त्यांची एकमेकांशी तुलना करून उभयता देशांत असणारे फरकही लक्षात घेण्यासारखे आहेत. भारत हा देश उद्योगप्रधान बनण्याच्या पूर्वीच्या परिस्थितीतून २० व्या शतकाच्या उत्तरार्धात पदार्पण करीत आहे. भारतापुढे एक मूलभूत प्रश्न खडा आहे तो असा की, देशाची भरभराट शांततेच्या मार्गांनी घडवून आणता येईल की त्यासाठी दूरगामी क्रांतीची कठोर किंमत द्यावी लागणार आहे ? ते काहीही असले तरी हे काम प्रचंड आणि बिकट आहे ह्यात मात्र शंका नाही. अमेरिकेचा दोन शतकांचा अनुभव लक्षात घेऊन काही अमेरिकन लोक असे म्हणतात की, भारताच्या अर्थव्यवस्थेत अहिंसात्मक पद्धतीने बदल घडवून आणणे शक्य आहे. मात्र त्यासाठी प्रगत देशांनी–विशेषतः अमेरिकेसारख्या देशांनी–वेळेवर आणि परिणामकारक मदत दिली पाहिजे. स्वातंत्र्य–प्राप्तीनंतरच्या कालातील भारताच्या पुढाऱ्यांना असा विश्वास वाटतो की, हिंदी लोक कडक उपाय न योजता आपल्या परिस्थितीत बदल घडवून आणू शकतील. तथापि हा विश्वास एका विशिष्ट समजुतीवर आधारलेला आहे. अमेरिकेने ज्या परिस्थितीत आपली अर्थव्यवस्था बदलली ती परिस्थिती भारतात अल्प काळात निर्माण करता येईल. निदान तत्सादृश्य परिस्थिती तरी जुळविता येईल, अशा समजुतीवर हा विश्वास आधारलेला आहे. परंतु, अमेरिकेला आलेल्या अनुभवाशी भारताच्याच काय, पण २० व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास स्वतंत्र झालेल्या कोणत्याच वसाहतीच्या अनुभवाची तुलना करता येणार नाही. हे सर्व देश अविकसित होते व अजूनही आहेत. १७ व्या शतकात अमेरिकेत आलेले लोक मुख्यतः ब्रिटन व फ्रान्स ह्या देशांतून आले. त्या दोन्ही देशांत आर्थिक विकासाला गती मिळालेली होती. त्यामुळे तेथून आलेल्या लोकांत एक प्रकारची धडाडी होती. त्यानंतरही मध्य, दक्षिण आणि पूर्व युरोपातून अशा प्रकारच्या लोकांची रीघ जुन्या जगातून उठून अमेरिकेच्या नव्या जगात एकसारखी येत राहिली. अमेरिकेच्या विकासाला ज्या प्रकारच्या लोकांनी गती दिली तशा प्रकारच्या लोकांचा अविकसित देशांना फायदा होण्याची शक्यता आजही नाही आणि पुढेही होण्याचा संभव दिसत नाही. शिवाय अमेरिकेंत वसाहती स्थापन करण्यासाठी जेव्हा पहिल्या प्रथम लोक आले त्या वेळी त्यांना अमेरिकेतील वहुविध साधनसंपत्ती आयतीच मिळाली. पुन्हा अमेरिकेतील मूळचे रेड इंडियन्स सोडले तर सर्व खंड जवळ जवळ निर्मनुष्यच होते. ह्या परिस्थितीची पुनरावृत्ती अविकसित देशांत करता येण्याची शक्यता नाही. खुद्द अमेरिकेच्या त्या वेळच्या परिस्थितीतही नव्या घटनांशी जुळवून घेताना राजकीय, आर्थिक आणि सामाजिक उपायांची जरूर भासलीच. दक्षिण अमेरिकेतील शेतीव्यवसायात निग्रो गुलामांची झालेली आयात हे ह्याचे प्रमुख उदाहरण आहे. अशा नव्या घटनांमुळे गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होऊ शकते, हे अमेरिकेत १८६० साली भडकलेल्या यादवी युद्धावरून उघडच होते. आज १०० वर्षांनंतरही ह्या वारशाची विल्हेवाट लावण्याचे प्रयत्न करावे लागत आहेतच.

भारत आगामी भविष्यकाळात काय करू शकेल अगर शकणार नाही ह्या बाबतीत अमेरिकेपेक्षा रशियाचा अनुभव अधिक मार्गदर्शक ठरण्यासारखा आहे. पश्चिम युरोपचाही अनुभव भारताला उपयोगी पडण्यासारखा नाही. भविष्यकाळात भारत रशियाच्या अनुभवापासून धडे घेईल किंवा नाही हा प्रश्न महत्त्वाचा नाही. भारताचे पुढारी आपल्या अनुभवाचे मूल्यमापन करताना रशियाच्या अनुभवाची दखल घेऊन निर्णय घेतात की नाही हा मात्र महत्त्वाचा प्रश्न आहे. कम्युनिस्ट क्रांती होण्यापूर्वीचा रशिया आणि स्वातंत्र्यपूर्व कालातील भारत ह्या देशात दोन महत्त्वाचे फरक आहेत. रशियावर पश्चिमेकडून आणि पूर्वेकडून अनेकदा आक्रमणे झाली. तरी सुद्धा रशिया पश्चिम युरोपातील वसाहतवाल्या कोणत्याही देशाच्या अमलाखाली पूर्णपणे गेलेला नव्हता. त्यामुळे रशियाला दीर्घकालीन परकीय अंमलाच्या ओझ्याचा अनुभव नव्हता. त्याचप्रमाणे पाश्चिमात्य राजकीय व आर्थिक संस्थांच्या प्रभावालाही रशिया मुकलेला होता. १९४७ पूर्वीच्या भारताची स्थिती अशी नव्हती. त्याला परकीय राजवटीचे ओझे व पाश्चिमात्य समाजरचना ही दोन्हीही परिचित होती. दुसरे असे की, आर्थिक व सामाजिक विकासाच्या नाड्या रशियाच्या स्वतःच्या हुकमतीत होत्या. तरी सुद्धा पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभी रशियातील सार्वजनिक उपयुक्ततेच्या उद्योगधंद्यांत परदेशी भांडवलाचा शिरकाव झालेला होताच. उदा. रेल्वेमार्ग, ट्रॅममार्ग, वीज, इत्यादी. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या उत्पादनातही परकीय भांडवल गुंतवलेले होते. असा कच्चा माल व धान्य रशिया पश्चिम युरोपातील देशांना निर्यात करीत असे. ह्याच अर्थव्यवस्थेला लेनिननें ' वसाहतीची अर्थव्यवस्था ' असे म्हटले आहे. १९१४ च्या जवळपास रशियातील उद्योगधंदे मुख्यतः हलक्या स्वरूपाचे होते. ते म्हणजे कापड आणि साखर. भारत स्वतंत्र झाला त्या वेळी भारतामधील उद्योगधंदेही प्रामुख्याने ह्याच स्वरूपाचे म्हणजे हलके होते. १९१७ साली रशियात क्रांती झाली आणि रशियाचे पश्चिम युरोपशी असलेले आर्थिक संबंध तुटून गेले. १९३० च्या सुमारास काही व्यापारी संबंध पुन्हा थोड्याबहुत प्रमाणात जुळवले गेले. त्याचप्रमाणे धरणासारख्या काही मूलभूत विकासाच्या कामांत पाश्चिमात्य देशांतील औद्योगिक तज्ज्ञांचे साह्यही घेण्यात आले. त्यानंतर रशियाच्या लोकांना खडतर जीवन जगावे लागले. दुसऱ्या महायुद्धात रशियाचे दोन कोटी लोक कामास आले आणि नैसर्गिक साधनसंपत्तीची नाझी जर्मनीच्या फौजांनी अपरिमित हानी केली. दुसऱ्या महायुद्धात झालेली हानी सोसावी लागली नसती तर रशियाचा आर्थिक विकास कितपत झाला असता हे पाहणे मनोरंजक होण्यासारखे आहे.

कम्युनिस्ट क्रांतीचा क्रूर अनुभव भारताला यावा असे भारताच्या कोणाही मित्राला वाटणार नाही. आजच्या रशियाचे पुढारी लेनिन अगर स्टॅलिनसारखे राजकीय तत्त्वज्ञ नसून कॉसिजिन ब्रेझनॉव्हसारखे तंत्रज्ञ आहेत. आफ्रिकेतील व आशियांतील काही अविकसित देशातही हे अवस्थांतर घडून येत आहे. औद्योगिक विकास घडवून आणताना आलेल्या दुःखद अनुभवांचा फायदा रशियाला मिळू लागण्याची लक्षणे आता दिसू लागली आहेत, आणि म्हणूनच सशस्त्र संग्रामात गोवले जाण्यापासून दूर राहण्याची रशियाची वृत्ती दिसत आहे. व्हिएटनाममधील युद्धांत गुंतवून न घेण्याचे रशियाचे धोरण ह्या वृत्तीचेच द्योतक आहे. कारण अशा प्रकारच्या युद्धात गोवले गेल्यास अत्यंत कष्ट करून साधलेल्या प्रगतीला सुरुंग लागण्याचा धोका रशियाला वाटत आहे. भारताप्रमाणेच रशियालाही असा कटु अनुभव आला आहे की, विकसनशील देशांतील खेडी ही शहरापासून अगदी अलग ठेवणे अशक्य कोटीतील आहे. भारतामधील ग्रामीण भागातील लोक खेड्यातील जीवनाविषयी अनेक प्रकारच्या तक्रारी वाढत्या प्रमाणात करीत आहेत. त्यात सुधारणा करण्यात याव्यात अशा तातडीच्या मागण्या करीत आहेत. राजकीय व पक्षपुढारी ह्या मागण्यांना व तक्रारींना साद देत आहेत. रशियात परिचित असलेल्या भाषेत बोलावयाचे तर भारतात वाढत्या अपेक्षांची क्रांतीच घडून येत

आहे. रशियाच्या पुढच्या पंचवार्षिक कार्यक्रमात औद्योगिक मालाचे उत्पादन वाढविण्यात येणार असून त्याचा दर्जाही उच्च प्रतीचा राखण्यात येणार आहे. रशियात अगदी अलीकडच्या काळापर्यंत खेड्यांच्या गरजांकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. भांडवलाची प्रमुख गुंतवणूक उद्योगधंद्यात आणि शस्त्रास्त्रांच्या उद्योगधंद्यात करण्यात येत होती. अण्वस्त्रांच्या उत्पादनाचाही ह्यातच समावेश आहे. आता मात्र रशियन सरकारने खेड्यांतील लोकांचे राहणीचे मान उंचावण्याचे ठरविले आहे. शहरांत राहणाऱ्या लोकांना ज्या सुखसोयी उपलब्ध आहेत त्या खेड्यांतील लोकांनाही मिळवून देण्याचा रशियन सरकारचा उद्देश आहे. त्यांना पैशांतील उत्पन्नापासून, सिनेमाच्या तिकिटापर्यंत सर्व प्रकारचे फायदे देण्याची इच्छा आहे. पुढच्या पंचवार्षिक कार्यक्रमात ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनाचा वेग वाढविण्यात येणार आहे. त्यासाठी उत्पादनाकरिता लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन दुप्पट करण्यात येणार आहे. शेतीइतके अन्नोत्पादक उद्योगधंदे, व्यापार, घर-बांधणी, सांस्कृतिक सुखसोयी इत्यादींच्या उपलब्धतेला उत्तेजन देण्यात येणार आहे. हे शहरांप्रमाणेच खेड्यांतही करण्यात येणार आहे. गेल्या कांही वर्षांत अवजड उद्योगधंद्यांच्या उत्पादनाशी तुलना करता ग्राहकोपयोगी मालाच्या उत्पादनाचे प्रमाण खूपच वाढविण्यात आलेले आहे. शहरे आणि खेडी ह्यांच्यामध्ये सध्या जो फरक दिसून येतो तो शक्य तितक्या लवकर नाहीसा करण्याचा रशियाचा हेतू आहे. त्यासाठी खेड्यातील लोकांची भौतिक आणि सांस्कृतिक पातळी वाढविण्यात यावयाची आहे. त्यामुळे ते लोक शहरी जीवनाच्या अधिक जवळ येतील आणि खेड्यात तंत्र-विद्येचीं स्थापनाही होईल. येत्या ५ वर्षांच्या कालात औद्योगिक उत्पादन ५० टक्क्यांनी वाढविण्याची खटपट करण्यात येणार आहे.

रशियातील खेड्यांच्या लोकांच्या दृष्टीने दोन उपाय विशेष महत्त्वाचे आहेत. सामुदायिक शेतावर काम करणाऱ्या लोकांना ह्यापुढे नक्त पगारच देण्यात येणार आहे. आतापर्यंत त्यांना शेतवाडीच्या उत्पन्नातील ठराविक भाग मेहनताना म्हणून मिळत असे. ह्या प्राप्तीत हवापाण्यातील फरकामुळे आणि पिकातील कमी-जास्त प्रमाणामुळे बराच चढउतार होत असे. ग्रामीण भागातील सोयीही वाढविण्यत येणार आहेत. रशियातील स्त्रिया अशा सोयींची जोराने मागणी करीत. असून त्यांच्यामुळे राहणीच्या मानावर अनुकूल परिणाम घडून येत आहे. कपड्यांची कोरडी धुलाई, केसांची निगा राखणारी दुकाने, बुटांची दुरुस्ती इत्यादी अनेक प्रकारच्या सोयींची मागणी ग्रामीण भागातील स्त्रिया करीत आहेत. शहरातील आणि ग्रामीण भागातील वैद्यकीय आणि शिक्षणविषयक सवलतींचीही मागणी वाढत चाललेली आहे. आपल्या देशातील नागरिकांना अधिक चांगला राहणीचा दर्जा मिळवून देण्याचे आश्वासन देण्यासाठी रशियाला ५० वर्षांचा काळ लागला. ह्या काळातून युद्धाचा जवळजवळ १० वर्षांचा काळ आणि त्यानंतरची फेरबांधणीचा काळ अर्थातच वजा करावा लागेल. हे साध्य करण्यासाठी रशियाला पूर्व युरोपातील देशांच्या साधनसामुग्रीचा आणि औद्योगिक प्रगतीचा आधार घ्यावा लागला. अजूनही रशियाला स्वतःजवळचे सोने देऊन परदेशांतून गहू विकत घ्यावा लागतो. कारण, काही वर्षे नापिकी गेली तर देशातील गव्हाची मागणी पुरी करण्याइतका गहू रशियात अद्याप पिकू शकत नाही. आतापर्यंत तरी रशियाने पाश्चिमात्य देशांकडून दीर्घ मुदतीची कर्जे काढण्याचा मार्ग स्वीकारलेला नाही. विकासाचा स्वतंत्र मार्गच चोखाळण्याचे ठरविण्यात आले असून ह्या निःसंशय अवघड कामात लोकांना सहभागी करून घेण्यात येत आहे. मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंदे काढण्याच्या बाबतीत पाश्चात्य देशांकडून तांत्रिक साहाय्य मिळविण्याचे प्रयत्न अगदी अलीकडे रशियाने केले आहेत. इटालीतील फियाट मोटारगाड्या व फ्रान्समधील रेनो मोटारगाड्या रशियात बनविण्याचे घाटत असून तयार करण्याच्या कामी ब्रिटनची मदत मिळविण्याची खटपटही होण्याची शक्यता आहे.

भारत व रशिया ह्यांच्यापुढील आर्थिक विकासाचे प्रश्न काय आहेत ह्यासंबंधी त्या देशांच्या इतिहासाच्या व सद्यःपरिस्थितीच्या संदर्भात आतापर्यंत विचार केला. आता अर्थव्यवस्थेचे आधुनिकीकरण करतांना उभयता देशांनी परदेशी मदतीचा कितपत व कसा फायदा घेतला ते पाहावयास पाहिजे. कारण, दोन्ही देशांत घडून येणाऱ्या सामाजिक बदलांशी त्याचा संबंध आहे. १९०४-५ मधील रशिया


# धुळे जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, धुळे

टेलिफोन नं. ८६ ✱ जय जवान — जय किसान ✱ र. नं. ७३०३

धुळे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना उत्पादनासाठी दीर्घ मुदतीचा व स्वल्प व्याजाच्या दराचा कर्ज पुरवठा करून अन्न-धान्याची कठीण समस्या सोडविण्यासाठी व बागायत पिकांचे उत्पादनासाठी लांब मुदतींचा कर्ज पुरवठा करणारी धुळे जिल्ह्यातील व महाराष्ट्र राज्यात उत्पादन-वाढीच्या मोहिमेत ठरवून दिलेली लक्ष्ये गाठून " अग्रेसर " ठरलेली भू-विकास बँक...

## तगाई कर्ज वाटपातून जिल्ह्यातील विकास कार्यात आजवर केलेली प्रगती

| तपशील | कर्ज वाटप रुपये |
|---|---|
| १. नवीन विहीर | ३५,५८,८९०-०० |
| २. जुनी विहीर | २,१०,४००-०० |
| ३. ऑईल एंजीन | ४०,६८,१००-०० |
| ४. ट्रॅक्टर्स | ६,८०,९००-०० |
| ५. बंडिंग | १,१०,२००-०० |
| ६. जमीन खरेदी | १,२०,४००-०० |
| ७. पाईप लाईन | २३,९५०-०० |
| ८. इलेक्ट्रीक मोटार | ५९,५००-०० |

## — सांपत्तिक परिस्थिती —

| | |
|---|---|
| १. भागभांडवल | ४६,५४,७८०-०० |
| २. राखीव निधी | २,३३,०९२-०० |
| ३. इमारत निधी | २,१८,४८४-०० |
| ४. खेळते भांडवल | ४,६५,२६,४७३-५५ |

बँक आपले मुख्य कार्यालय व इतर १० शाखामार्फत शेतकऱ्यांची अविरत सेवा करीत आहे.

व्यवस्थापक — सी. वि. राजे चेअरमन — ग. तु. पाटील, एम्. एल्. ए.

जपानचे युद्ध झाल्यापासून रशियातील झारची सत्ता प्रागतिक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले होते आणि रशियातील प्रागतिकांना त्या कामी यश घेऊन रशियात लोकशाही पद्धतीचे संसदीय सरकार अधिकारावर येते तर १९१७ च्या क्रांतीची गरजही पडली नसती. पहिले महायुद्ध सुरू झाल्यावर तर रशियात शांततामय मार्गाने शासनव्यवस्था बदलण्याची शक्यताच नाहीशी झाली. ह्या शतकात झालेल्या दोन महायुद्धांच्या दरम्यान रशियाने जागतिक कम्युनिझमचे पुढारीपण आपणाकडे घेतले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्घटना व विकास करण्यासाठी सर्व रशियन जनतेला वेठीला धरले. १९२८ साली रशियाच्या पंचवार्षिक कार्यक्रमांना प्रारंभ करण्यात आला. ह्या कार्यक्रमात स्वतःच्या हिंमतीवर आर्थिक विकास साधण्यावर भर देण्यात आला. लोकांना त्याग करण्यास भाग पाडण्यात आले. त्यांच्या अगदी साध्यासुध्या गरजाही लांबणीवर टाकण्यात आल्या आणि त्यांना सरकारी शेतवाड्यांवर व सामुदायिक शेतवाड्यांवर शिस्तीने कामास जुंपण्यात आले. सरकारी मालकीच्या कारखान्यातही त्यांच्याकडून सक्तीने काम करवून घेण्यात आले; पण आर्थिक विकास साधण्याची ही पद्धत अतिशय कठोर होती, ह्या काळांत, रशियन सरकारने काही थोडी तांत्रिक मदत परदेशाकडून घेतली, पण ती सर्व सरकारी मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखालीच वापरण्यात आली. दुसऱ्या महायुद्धांत झालेली हानि भरून काढण्यासाठी अमेरिकेने पूर्व युरोपमधील देशांना देऊ केलेली मार्शल योजनेची मदत घेण्याचे रशियाने नाकारले. युद्धोत्तर पुनर्घटना करण्यासाठी रशिया स्वतःच्या प्रयत्नावर विसंबून राहिला. पूर्व युरोपमधील देशांची साधनसंपत्ति रशियाने ह्या कामी वापरली. असाच वापर पाश्चिमात्य देशांनी केला असता तर मात्र रशियाने त्यांना वसाहतवादी म्हटले असते. रशियाशी तुलना करता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने साधनसंपत्तीचे राष्ट्रीयीकरण केले नाही, अगर खाजगी भांडवलाला विकासाच्या कामांत सहभागी होण्यास मना ही केले नाही. मात्र अर्थव्यवस्थेतील काही क्षेत्रे भारताने संर्वस्वी अगर प्रामुख्याने सरकारी मालकीची केली. पोलाद व खते हे धंदे ह्या धोरणाचे निदर्शक म्हणता येतील. परिणामी, भारतात आज सार्वजनिक व खाजगी मालकीचे असे दोन विभाग आहेत, आणि कोणताही उद्योगधंदा एका विभागातून दुसऱ्या विभागांत घालण्याची शक्यताही आहे. कांही खाजगी उद्योगधंद्यांना, विशेषत: छोट्या खाजगी उद्योगधंद्यांना सरकारचे उत्तेजनही मिळत आहे. रशियाशी तुलना करता ह्या फरक फार मोठा आहे. कारण रशियांत सर्व जमीन व साधनसंपत्ती सरकारच्या मालकीची आहे. तेथील सरकारच सर्व उद्योगधंदे चालविते आणि सरकारी शेतवाड्यांची व्यवस्थाही पाहते.अलीकडे मात्र सरकारी शेतवाड्या मुख्यत: प्रादेशिक शेतवाड्याच झाल्या आहेत. सामुदायिक शेतवाड्यांवरील शेतकऱ्यांनाही आता नक्त पगारच देण्यात येत असतो. ह्या शेतकऱ्यांना स्वतःच्या मालकीची थोडी जमीनही देण्यात येते. तीवर ते घरेही बांधतात; पण जमीन मात्र सरकारच्या मालकीचीच असते. ह्या खाजगी शेतावर तयार होणारा अनेक प्रकारचा माल शेतकरी बाजारात विक्रीसाठी आणतात. अंडी, कोंबडी, भाजीपाला, दूध इत्यादी विविध प्रकारचा शेतीमाल ते उत्पादन करतात व विकतात. त्याच बाजारात सामुदायिक शेतवाडीवर तयार झालेला मालही विक्रीस आलेला असतो. शेतकऱ्याला अधिक उत्पादन करण्यास प्रलोभन म्हणून ही पद्धत स्वीकारण्यात आलेली आहे. बाजारांत विक्रीस येणाऱ्या वरील मालापैकी तीन चतुर्थांश माल शेतकऱ्यांच्या खासगी शेतांत तयार झालेला असतो असा अंदाज करण्यात आलेला आहे. त्यावरून ह्या पद्धतीचा अर्थ लक्षात येतो. कारखान्यांत तयार होणाऱ्या काही प्रकारच्या मालाच्या उत्पादनावरील नियंत्रणे रशियाचे सरकार भविष्यकाली सैल करण्याची शक्यता अलीकडे दिसू लागली आहे. कापडासारख्या रोज खपाच्या वस्तूंच्या दर्जाबद्दल व प्रसाराबद्दल गिऱ्हाइकांच्या पसंती. नापसंतीचाही विचार करण्यात येण्याचा संभव आहे. हलक्या उद्योगधंद्यांच्या बाबतीत सरकारी नियंत्रणे शिथिल होण्याचा संभव असला तरी अवजड उद्योगधंदे मात्र सरकारच्याच नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली चालू राहतील.

तसे पाहिले तर कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेची तुलना इतर देशांच्या अर्थव्यवस्थेशी संपूर्णतया करता येणार नाही. कारण, प्रत्येक देशातील परिस्थिती अनेक तऱ्हांनी भिन्न असते. हवापाण्याचीच बाब घेतली तर असे म्हणता येईल की, रशियातील हवामान एकंदरीने वर्षभर काम करण्यास सोयीस्कर आहे. भारताचे हवामान तसे नाही. तथापी एक बाब मात्र अशी आहे की ती सर्व देशांना सारखीच लागू आहे. अविकसित देशांनी परदेशीय मदत घ्यावी की नाही आणि घेतल्यास तिला किती प्राधान्य द्यावे, ही ती बाब होय.

जगांत प्रगत झालेल्या देशाचा एक छोटासा गट आहे. ह्या गटाकडून मोठ्याप्रमाणात अगर बेतशीर प्रमाणात मदत घेऊन जगातील अविकसित देशांनी आपला विकास त्वरित घडवून आणण्यात फायदा आहे हे कोणीहि नाकबूल करणार नाही. प्रगत देशात मुख्यतः अमेरिका, पश्चिम युरोपीय देश, जपान व रशिया ह्यांचा समावेश होतो. तथापि हे देश मदत देतांना मदत घेणाऱ्या देशांच्या हितसंबंधाबरोबर आपल्याही हितसंबंधाची दखल घेणार हे उघडच आहे. मदत देणारा देश हुकूमशाही राज्यपद्धतीचा असो अगर लोकशाही राज्यपद्धतीचा असो वरील गोष्ट खरीच आहे. लोकशाही राज्यपद्धतीच्या सरकारांना आपआपल्या कायदेमंडळांना मदतीबद्दल जाब द्यावा लागतो. अशी मदत देशाच्या गरजांकडे दुर्लक्ष करून देण्यात येत नाही ह्याबद्दल लोकांची खात्री त्यांना करून द्यावी लागते. तेव्हा रशियासारख्या हुकूमशाही राज्यांपेक्षा लोकशाहीवर आधारलेले देश आपआपल्या जनतेच्या दडपणात अधिक प्रमाणात असतात. ह्या संबंधीचे अमेरिकेचे उदाहरण लक्षात घेण्यासारखे आहे. पुष्कळ अमेरिकन नागरिक मदतीदाखल होणाऱ्या खर्चाला सर्वसाधारणपणे अनुकूल असतात. पण काही विशिष्ट मदतीच्या कार्यक्रमाला ते विरोध करतात. काही वेळा अशा विरोधाची कारणे राजकीय असतात. उदा. इस्राएल देशाबाबत संयुक्त–अरब–प्रजासत्ताकाचा विरोध असल्याने त्या देशास मदत करण्यास अमेरिकेत विरोध होतो. काही वेळा ही कारणे देशांतर्गत असतात. उदा. अमेरिकेतील निग्रो लोकांना आर्थिक दृष्ट्या मदत करण्याची गरज असतांना देशाबाहेरील परक्यांना मदत करण्यास काही अमेरिकन लोक नाखूष असतात. मदत देणाऱ्या प्रगत देशांचे व भारताचे संबंध फलदायी आणि दोषारोपापासून मुक्त असावयास पाहिजे असतील तर एक मूलभूत मुद्दा लक्षांत ठेवण्यात आला पाहिजे. जगांत राष्ट्रीय भावनेवर अधिष्ठित अशी राज्ये जोवर अस्तित्वांत आहेत तोपर्यंत दुसऱ्या देशांना मदत करणारी त्या त्या राज्यांची सरकारे मदत घेणाऱ्या देशांतील लोकांचेच फक्त हितसंबंध राखतील असे नाही. स्वदेशांतील लोकांचे हितसंबंधही मदत देणारे देश लक्षांत घेणारच घेणार. नजीकच्या भविष्यकाळांत जगांत क्रांतिकारक घटना घडून न आल्यास राष्ट्रीय भावनेवर आधारलेले देश विसाव्या शतकाच्या उरलेल्या अवधीत आहेत तसेच राहतील असेच धरून चालावयास पाहिजे. प्रगत देशांच्या मदतीवर अवलंबून राहण्याचा काळ शक्य तितका कमी करण्याच्या हेतूने मदत घेणाऱ्या देशांनी त्यांना देण्यात येणाऱ्या मदतीचा उपयोग अतिशय कार्यक्षमतेने आणि तत्परतेने केला पाहिजे हेही उघड आहे. कारण, कोणत्याही तऱ्हेचे परावलंबन ही काही चांगली गोष्ट नाही. देशांच्या परस्परसंबंधांत तर ही गोष्ट चांगली नव्हेच नव्हे. स्वातंत्र्याच्या आभासापेक्षा खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याची त्यांना अधिक जरूर असते आणि तसे त्यांचे प्रयत्नही चाललेले असतात. देशांनी एकमेकांना सरकारी पातळीवरून केलेल्या मदतीला आणखी एक पर्याय आहे; आणि तो म्हणजे जागतिक बँकेसारख्या संस्थांनी आणि संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या तांत्रिक शाखांनी केलेली मदत. ह्या मदतीच्या बाबतीत एखाद्या देशाचे दडपण येण्याची शक्यता नसते किंवा असलीच तर ती फार कमी असण्याचा संभव असतो. ह्या संस्थांमार्फत देण्यात येणारी मदत प्रगत देशांनीच एकत्र केलेली असते; पण ती आंतर राष्ट्रीय संस्थांतर्फे देण्यात येते येवढेच. अशी मदत सरकारापासून सरकारांना मिळणाऱ्या मदतीपेक्षा अर्थातच बरीच कमी असणार हे

ओघानेच आले. एकंदरीत, दीर्घ दृष्टीने पहाता अविकसित देशांनी स्वतःचा कारभार सुधारून त्याची घडी नीट बसविली पाहिजे आणि विकास साधण्याचा सोपा मार्ग उपलब्ध नाही ह्याची जाणीव ठेवली पाहिजे. देशाच्या जीवनात काय अगर व्यक्तीच्या जीवनात काय जरूर तेव्हा त्याग करण्याची तयारी दाखविणे आणि आपल्या मगदुराप्रमाणे जास्तीत जास्त काम करणे ह्या गोष्टीला फार महत्त्व आहे. ह्या गोष्टीची स्पष्ट जाणीव अविकसित देशांनी स्वतः करून घेतली पाहिजे. पश्चिम युरोपमधील देश आणि जपान ह्यांनाही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागलेले आहे. औद्योगिक विकास होईपर्यंत त्यांनी आर्थिक व सामाजिक सुधारणा धिमेपणानेच केल्या. आजही त्या देशांतून सामाजिक संघर्ष आणि आणीबाणीचे प्रसंग उद्भवत असतातच आणि सर्व जगांतील लोकांचे जीवनमान वाढविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. ह्या प्रयत्नात अविकसित देशांनीही आपली कामगिरी निश्चियाने बजावली पाहिजे. असे काही असतांनासुद्धा प्रगत देशांनी आणि आंतरराष्ट्रीय संघटनांनी त्यांच्या तातडीच्या गरजा भागविण्याचे कर्तव्य पार पाडले नाही, तर मात्र भारत व त्याच्याच परिस्थितीत असलेल्या इतर देशांना आर्थिक विकास साधण्यासाठी रशियाने गतकाली उपयोग केलेल्या कडक उपायांची कास धरणे भाग पडण्याची शक्यता आहे. अर्थात देशकालमानाप्रमाणे त्यात काही फरक करावे लागतील, नाही असे नाही.

■ ■


## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

रजिस्ट्रेशन नं. १९३८८ ] स्थापना १९३५ [ दूरध्वनी क्र. ५३

मुख्य कार्यालय : हरभट पथ, सांगली

शाखा कार्यालय : (१) माधवनगर जि. सांगली
(२) खणभाग सांगली
(३) गावभाग सांगली
(४) बुधगाव
(५) विश्रामबाग
(६) बीड, जि. बीड
(७) परभणी, जि. परभणी

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ३,३२,७१० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७,२४,०९४ |
| ठेवी | रु. १,००,७३,७०० |
| खेळते भांडवल | रु. १,१४,९४,४३३ |

ऑडिट वर्ग "अ"

### संचालक मंडळ

(१) श्री. वा. वि. वाटवे बी. ए., एलएल. बी.
(२) श्री. ग. का. दांडेकर डी. एम. इ. इ. कारखानदार, चेअरमन
(३) श्री. प्र. रा. भिडे कारखानदार
(४) श्री. के. वि. तथा दादूकाका भिडे कारखानदार
(५) श्री. वि.ह.माईणकर बी.एस.सी.एल.एल.बी., व्हा.चेअरमन
(६) श्री. गं. गो. बिनीवाले
(७) श्री. म. ह. गोडबोले बी. ए. एलएल. बी., वकील
(८) श्री. ज्ञा. आ. येडके जमीनदार
(९) श्री. मा. न. कालेंकर, वकील

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात

ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर



"यंदाची दिवाळी आमचे सभासद, ठेवीदार व अन्य सहकारी बंधूंना सुखाची व समृद्धीची जावो"

कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑप. बँक. लि., कोल्हापूर.

स्थापना १९३८

तार-कोडीकोबँक) (फोन नं. ३४२

| | |
|---|---|
| १) खपलेले भांडवल | १ कोटी ४२ हजार. |
| २) ठेवी | ४ कोटी ५६ लाख. |
| ३) रिझर्व्ह व इतर फंडस् | २५ लाख. |

४) जास्तीत जास्त संस्था सभासद असलेली जिल्ह्यातील अग्रगण्य बँक.
५) मालरूपाने कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना दर एकरी वाढत्या प्रमाणांत कर्ज पुरवठा केला आहे.
६) मागासलेल्या भागांतील गरीब शेतकऱ्यांनी "खावटी" कर्ज देणारी भारतातील पहिली सहकारी बँक.
७) जिल्ह्याचा सर्वांगिण विकास साधण्यासाठीं ही संस्था एकूण २७ शाखाद्वारे आपल्या सेवेस सदैव तयार आहे.

मा. ह. भडभडे, मुख्य व्यवस्थापक
व्ही. के. चव्हाण-पाटील चेअरमन



इचलकरंजीच्या वाढत्या उद्योगधंद्यास ३६ वर्षे सतत भांडवल पुरविणारी व सार्वजनिक विश्वस्त निधीच्या ठेवी स्वीकारण्यास सरकारमान्य व मध्यम वर्गीयांची आधारस्तंभ असलेली इचलकरंजीतील एकमेव नागरी बँक

◎ ◎ ◎

## दि इचलकरंजी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, इचलकरंजी

स्थापना : १९३०) (फोन नं. ३६

ऑडिट वर्ग : अ.

| | रु. | ठेवींचे दर : | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ३,००,००० | चालू | १ टक्का |
| भरलेले भांडवल | २,९९ ३०० | सेव्हिंग्ज | ४ टक्के |
| रिझर्व्ह फंड | २,७०,७०० | मुदत ठेव | ५ ते ८ टक्के |
| इतर फंडस | ४,५५,००० | कॉल डिपॉझिट | ५ ते ६॥ टक्के |
| खेळते भांडवल | ६६,४५,९०० | कर्जाचे दर | ८ ते ११ टक्के |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.
अधिक चौकशी बँकेचे कार्यालयात करावी.

श्री. ज. दांडेकर मॅनेजर
दत्तात्रय बाबुराव कदम चेअरमन

सत्फलाय सहकारिता

फोन नं. २५१९३ **पुणे जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि. पुणे** रजि. नं. ७२९९

१०७, भवानी पेठ, पुणे २

पुणे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी बँकेच्या शाखा आहेत. १३ शाखा व २ उपशाखांमार्फत शेतकरी बंधूंची दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज भागवीत आहे.

बँकेच्या प्रगतीचे बोलके आकडे

( दि. ३०–६– १९६६ अखेर )

| | | |
|---|---|---|
| १ ) सभासद संख्या | | १३,२८१ |
| २ ) अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| ३ ) खपलेले भाग भांडवल | रु. | ३२,७६,८३३ |
| ४ ) रिझर्व्ह व इतर फंड | रु. | १,४६,४२५ |
| ५ ) सभासदांना दिलेले कर्ज | रु. | २,६३,५९,४३२ |
| ६ ) खेळते भांडवल | रु. | ३,०४,३२,००० |

— आमच्या बँकेमार्फत मिळणाऱ्या कर्जाची वैशिष्ठ्ये —

१ ) कमी व्याजाचा दर. २ ) समान वार्षिक हप्त्याने फेड. ३ ) दीर्घ मुदतीने कर्जफेड.

कर्तबगार गरजू शेतकऱ्यांनी आपली व त्याचबरोबर राष्ट्राची प्रगती करुन घेण्यासाठी बँकेकडून मिळणाऱ्या सवलतीचा फायदा घ्यावा. शेती उत्पादन वाढवून आपली भूमी सुजलाम् सुफलाम् करण्यास सिद्ध व्हा.

जि. मु. कर्णे
बी. ए. ( ऑनर्स ), एच्. डी. सी.
जी. डी. सी. अँन्ड ए.
मॅनेजर

मा. शंकरराव म. भेलके
बी. ए., एम्. एल. ए.
चेअरमन



बँकेचे ग्राहकांना नूतन वर्ष सुखाचे जावो !

**दि बँक ऑफ कराड लि.**

रजिस्टर्ड ऑफिस-१५ रविवार पेठ, कराड

शाखा—मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटे व कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ५,४२,००० |
| रिझर्व्हज् | रु. | २,२८,००० |
| डिपॉझिट्स् | रु. | एक कोटीचे वर |

सेव्हिंग्ज् ठेव–४%. मुदत ठेवीवर १ वर्ष ते ५ वर्षे–६½ ते ७½%. कराड ऑफिसमध्ये अद्यावत् सेफ डिपॉझिट् व्हॉल्टची सोय. कॉल व शॉर्ट टर्मस् डिपॉझिट्स् आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारली जातील.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड

म. वि. खंडकर
जनरल मॅनेजर



**सातारा जिल्हा**

**मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, सातारा**

मुख्य कार्यालय : शिवाजी सर्कल, सातारा.

ही बँक आपल्या २२ शाखांमधून आणि ३१० अनुभवी कर्मचाऱ्यांच्या मदतीने सातारा जिल्ह्याचा आर्थिक कायापालट करण्यास सदैव सिद्ध आहे.

या बँकेची आर्थिक सुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) भाग भांडवल व निधी | रु. | ६९,००,००० |
| २) ठेवी | रु. | ३,६३,००,००० |
| ३) बाहेरील कर्जे | रु. | १,५७,००,००० |
| ४) रोख रकमा व गुंतवणुका | रु. | १,१४,००,००० |
| ५) दिलेली कर्जे | रु. | ४,६५,००,००० |
| ६) खेळते भांडवल | रु. | ६,१४,००,००० |

आपणही या बँकेच्या सेवेचा लाभ सदैव घ्या.

व्यंकटराव ज्ञानोबा भोसले
बी. कॉम., जी. डी. सी. ॲ.
व्यवस्थापक

किसन महादेव ऊर्फ आबासाहेब वीर
एम. पी.
अध्यक्ष

तार – दूधसाखर कोल्हापूर. फोन } ५७८ कोल्हापूर } ११६६ फॅक्टरी साईट

## सत्फलाय सहकारिता

## श्री दूधगंगा–वेदगंगा

## सहकारी साखर कारखाना लि., बिद्री.

( मौनीनगर ), ता. कागल, जिल्हा कोल्हापूर.

१) कृषि–औद्योगिक समाज निर्मितीत सहकारी साखर कारखाने हे भारतात पहिल्या प्रतीचे द्योतक.

२) कर्तव्यदक्ष संचालक मंडळ, कार्यकुशल सेवक वर्ग, आणि उत्साही सभासद यांचे त्रिवेणी संगमामुळे कारखान्याची यशोमंदिराकडे वाटचाल.

३) अधिकाधिक गळीत करून शुभ्र दाणेदार साखरेच्या निर्मितीने देशाच्या आर्थिक विकासात भर.

४) अपुऱ्या पाणी पुरवठ्याच्या परिस्थितीतही सन१९६५-६६ चे गळीत हंगामात १,९४,५७५ पांढऱ्या साखर पोत्यांचे उत्पादन.

५) कारखान्यास खात्रीलायक पाणी पुरवठ्यासाठी भोगावती नदीतून पाणी, दूधगंगेत सोडण्याची योजना.

'दीपावली निमित्त जवान व किसान यांचे अभीष्ट चिंतन.'

| बाबूराव ज्ञा. देसाई | कृष्णाजी गं. मोरे | हिंदुराव ब. पाटील. |
|---|---|---|
| इन. कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन. |

## महाराष्ट्रातील एक अग्रेसर नागरी बँक

## शिवाय नगर जिल्ह्यात मध्यवर्ती बँक म्हणून काम करीत असलेली

**नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बँक लि.,**

मुख्य कार्यालय :– अहमदनगर

शाखा –: संगमनेर, श्रीरामपूर, वांबोरी, श्रीगोंदा, शेवगाव, बेलापूरगाव, पाथर्डी, नेवासा, जामखेड, मिरजगाव, अकोला, जि. अहमदनगर, जालना–जि. औरंगाबाद, परळी वैजनाथ–जि. बीड.

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | ६,५८,२३०–०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ९,९२,३६४–७६ |
| ठेवी | १,३३,६९,७६९–२१ |
| खेळते भांडवल | १,५२,७५,४२७–८३ |

अहमदनगर येथील मुख्य कचेरीत व श्रीरामपूर येथील शाखा कचेरीमध्ये सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. आकर्षक व्याजाचे दर.

महाराष्ट्रातील व इतर प्रमुख ठिकाणावरील डिमांड ड्राफ्टस् मिळण्याची सोय.

| त्र्यं. वि. निसळ | हे. भो. बोरा | भो. कुं. फिरोदिया |
|---|---|---|
| जनरल मॅनेजर | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

## दि कोल्हापूर मराठा मंडळाच्या विद्यमाने चाललेली

**दि कोल्हापूर मराठा को- ऑप. बँक लि., कोल्हापूर.**

स्थापना १९३३ ) ऑडिट. वर्ग 'अ' ( फो. नं. ७१३

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) | अधिकृत शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| ( २ ) | खपलेले शेअर भांडवल | रु. | २,००,००० |
| ( ३ ) | रिझर्व्ह फंड | रु. | १,०१,७६४ |
| ( ४ ) | इतर फंडस् | रु. | ५५,८३१ |
| ( ५ ) | खेळते भांडवल | रु. | १४,७५,५२० |
| ( ६ ) | एकूण व्यवहार | रु. | ८२,९७,१७२ |
| ( ७ ) | सभासद संख्या | | ३६४७ |

## बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो.

| डी. के. पाटील | दत्ताजीराव सखाराम माने |
|---|---|
| मॅनेजर | प्रेसिडेंट |

## भारतातील अग्रेसर

## श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

## गंगानगर–इचलकरंजी

## एक दृष्टिक्षेप

–३०-६-१९६६ अखेर भांडवली खर्च रु. १,५६,१०,७९६

–१९६५-६६ गळीत हंगामातील ऊस गाळप २,४६,६२६ टन

–१९६५-६६ हंगामातील साखर उत्पादन २,६८,५०७पोती

–१९६५-६६ अखेर सभासद संख्या २,७२१


व त्यांचेकडून जमा झालेले शेअर भांडवल रु. ३८,७९,०५४

–दैनिक २,६०० गाळपशक्तीविस्तार

योजनेचा अंदाजे भांडवल खर्च रु. २,१९,००,०००

| बी. एन्. गरगटे | एम्. व्ही. सुलतानपुरे | रत्नाप्पा कुंभार |
|---|---|---|
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.




निस्य नवे, फॅशनेबल आणि प्रशंसनीय

# ठाकरसी फॅब्रिक्स्

फॅशनसाठी सर्वोत्तम निवड

·SANFORIZED·

सॅनफोराइज्ड लेबल असलेले कापड




THACKERSEY FABRICS

**ठाकरसी ग्रूप**

- धी हिंदुस्तान स्पिनिंग अॅण्ड विव्हिंग मिल्स कं. लि.
- धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि.

TH-55 MR






# दीपावली शुभचिंतन


दिवाळी व नूतन वर्ष
आमच्या ग्राहकांस व
हितचिंतकांस सुखसमृद्धीचे
व आनंदाचे जावो.

किर्लोस्कर
रजिस्टर्ड ट्रेडमार्क

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स, लिमिटेड.
रजि. ऑफिसः एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY






# दीपावली शुभचिंतन

*दिवाळी व नूतन वर्ष*
*आमच्या ग्राहकांस व*
*हितचिंतकांस सुखसमृद्धीचे*
*व आनंदाचे जावो.*

किर्लोस्कर
रजिस्टर्ड ट्रेडमार्क

किर्लोस्कर ऑईल एजिन्स, लिमिटेड.
रजि. ऑफिस: एलफिन्स्टन रोड, पुणे-३ (भारत)

TOM & BAY